
CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १५ एप्रिल २०२६। युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १३७ । पाने १२+८ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आज निजानंदमग्नदिन



अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ

### विचारपुष्प



स्वामी विवेकानंदांच्या भाषणांमुळे, साहित्यामुळे भारतातील स्वातंत्र्य चळवळीतील अनेक महान नेत्यांना कशाप्रकारे प्रेरित केले होते, त्यांना कार्यप्रवृत्त केले होते या संबंधातील काही महत्त्वाची उदाहरणे आपण पाहिलीत. पण स्वामी विवेकानंद हे केवळ स्वातंत्र्याची प्रेरणा देणारेच पुरुष नव्हते, तर स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रत्यक्ष कार्यवाही करणाऱ्यांपैकी एक होते.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

# चौधरी बिहारचे 'सम्राट'

## प्रदीर्घ कालावधीनंतर भाजपाचा मुख्यमंत्री

**◆ पाटणा, १४ एप्रिल**

राज्यसभेवर निवडून गेलेले जदयूचे नेते नितीशकुमार यांनी मंगळवारी मुख्यमंत्रिपदाचा मंगळवारी राजीनामा दिल्यानंतर भाजपा आमदारांच्या विधिमंडळ नेतेपदी सम्राट चौधरी यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यानंतर चौधरी यांनी राज्यपालांची भेट घेऊन सत्तास्थापनेसाठी दावा सादर केला. ते बुधवारी सकाळी अकरा वाजता शपथ घेणार आहेत.

पाटणा येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा विधिमंडळ पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत विजय सिन्हा, मंगल पांडे आणि दिलीप जयस्वाल यांनी भाजपा विधिमंडळ नेतेपदी सम्राट चौधरी यांच्या नावाचा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावाला उपस्थित आमदारांनी उत्स्फूर्त अनुमोदन दिले.

भाजपाच्या विधिमंडळ बैठकीनंतर रालोआची बैठक झाली. त्या बैठकीतही सम्राट चौधरी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. नंतर सम्राट चौधरी यांनी राज्यपाल लेफ्टनंट जनरल (निवृत्त) सय्यद अता हुसैन यांची भेट घेत सत्ता स्थापन करण्यासाठी दावा सादर केला. सम्राट चौधरी यांच्या या निवडीमुळे बिहारच्या राजकारणात भाजपाच्या नव्या पर्वाला सुरुवात होणार आहे.

सम्राट चौधरी हे दोन वेळा बिहारचे उपमुख्यमंत्री राहिलेले आहेत. सम्राट चौधरी मुख्यमंत्री व्हावेत, अशी नितीशकुमार यांचीही इच्छा आहे. नितीशकुमार यांच्या आग्रहास्तव भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी सम्राट चौधरी यांच्या नावाला अंतिम मंजुरी दिल्याची चर्चा बिहारच्या राजकारणात रंगली आहे.

सम्राट चौधरी यांना राजकारणाचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांचे वडील शकुनी चौधरी हे तारापूर मतदारसंघातून सहावेळा आमदार म्हणून निवडून आले होते. त्यानंतर त्यांच्या आई पार्वतीदेवी यांनीही विधिमंडळात लोकप्रतिनिधी म्हणून काम केले आहे. या राजकीय वारसामुळे सम्राट चौधरी यांचा राजकारणात अत्यंत कमी वयात प्रवेश झाला. त्यांनी १९९९ मध्ये राष्ट्रीय जनता दलातून (राजद) राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. (वृत्तसंस्था)



मुख्यमंत्रिपदासाठी निवड झाल्यानंतर सम्राट चौधरी यांचे अभिनंदन करताना जदयूचे प्रमुख नितीशकुमार

### नवीन सरकारला भक्कम पाठिंबा : नितीशकुमार

**राज्यसभा सदस्य आणि जदयूचे अध्यक्ष नितीशकुमार यांनी मंगळवारी राज्यपालांकडे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा सुपूर्द केला. एक्सवरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, मी मंत्रिमंडळ बैठकीनंतर राज्यपालांची भेट घेऊन राजीनामा सोपवला. आता नवे सरकार काम बघेल. नव्या सरकारला माझा भक्कम पाठिंबा राहणार आहे. सरकारने सुरुवातीपासूनच सर्व समाज घटकांचा विकास करण्यावर भर दिला. बिहारच्या विकासामध्ये केंद्र सरकारचेही पूर्ण सहकार्य मिळत आहे. यापुढे खूप चांगले काम होत राहील आणि बिहार खूप पुढे जाईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.**

# चीनपुढे अमेरिकेने टाकली नांगी

## नाकाबंदी झुगारत होर्मुझमधून जहाजे रवाना

**◆ दुबई, १४ एप्रिल**

शांतता चर्चा अयशस्वी ठरल्यानंतर, अमेरिकेने इराणवर दबाव वाढवण्यासाठी होर्मुझ सामुद्रधुनीत नौदल तैनात केले. होर्मुझमधून जहाजांच्या वाहतुकीवर प्रतिबंध घालण्यासाठी त्यांनी नाकाबंदी सुरू करण्याची घोषणा केली. मात्र चीनवर याचा कुठलाही परिणाम झालेला नाही. चीनची जहाजे आणि तेल टँकरची वाहतूक होर्मुझमधून सुरळीत सुरू असून, इराणकडून तेल खरेदी सुरू राहणार असल्याचे देखील चीनने स्पष्ट केले आहे.

अमेरिकेचे नौदल तैनात असतानाही मंगळवारी चीनची जहाजे आणि तेल टँकरने होर्मुझ जलमार्ग पार केला. रिच स्टारी या चिनी जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली. विशेष म्हणजे, अमेरिकेने या जहाजावर आधीच निर्बंध लादले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नाकेबंदीच्या घोषणेनंतर या मार्गावरून प्रवास करून आखातातून बाहेर पडणारे हे पहिले जहाज आहे. हे जहाज शांघाय झुआनरुन शिपिंग कंपनी लिमिटेडच्या मालकीचे आहे. या जहाजाने संयुक्त अरब अमिरातीमधील (युएई) हमरिया बंदरात नैसर्गिक वायू भरला आणि होर्मुज पार केले.



**सार्वभौमत्वाचा आदर करावा : जिनपिंग**

**मध्यपूर्वेतील सर्व देशांच्या सार्वभौमत्व, सुरक्षा आणि प्रादेशिक अखंडतेचा पूर्णपणे आदर केला पाहिजे, असे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी म्हटले आहे.**

**हल्ला झाल्यास कठोर प्रत्युत्तर मिळेल : डोंग जून**

होर्मुझ जलमार्गावरील सुरक्षा आणि स्थिरता आंतरराष्ट्रीय समुदायाच्या हिताची आहे. आमच्या जहाजांवर हल्ला झाल्यास किंवा कारवाईचा प्रयत्न केल्यास कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून यांनी अमेरिकेला दिला आहे. आमची जहाजे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून विनाअडथळा प्रवास करत आहेत. चीनचे इराणसोबत ऊर्जा आणि व्यापार करार आहेत. कोणाच्याही दबावामुळे करार मागे घेतले जाणार नाही. (वृत्तसंस्था)

### अमेरिका-इराणमध्ये होणार चर्चेची दुसरी फेरी

**वॉशिंग्टन :** इराण आणि अमेरिकेला पुन्हा वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यासाठी पाकिस्तान प्रयत्न करत आहे आणि दोन्ही पक्ष पुढच्या आठवड्यातच इस्लामाबादमध्ये चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी पुन्हा भेटणार असल्याची माहिती समोर आली आहे. १६ एप्रिल रोजी होणार असल्याचे संकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले. विशेष म्हणजे संघर्षविराम संपण्यापूर्वी पाकिस्तान आणि तुर्कीच्या मध्यस्थीने वाटाघाटी पुन्हा सुरू झाल्या.

**फ्रान्सने घेतला पुढाकार**

अमेरिका-इराणमध्ये मध्यस्थीचे फ्रान्सनेही प्रयत्न सुरू केले आहे. राष्ट्राध्यक्ष इमॅन्यूएल मॅक्राँ यांनी ट्रम्प आणि पेझेश्किअन यांच्याशी स्वतंत्रपणे संवाद साधत इस्लामाबादमध्ये पुन्हा चर्चा सुरू करण्याचा प्रस्ताव दिला. (वृत्तसंस्था)

# कॅब-रिक्षाचालकांसाठी १ मेपासून मराठी अनिवार्य



### प्रताप सरनाईक यांची माहिती

**◆ ठाणे, १४ एप्रिल**

**१ मे पासून महाराष्ट्रातील परवानाधारक रिक्षा आणि कॅब चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य असेल तसेच परिवहन विभागाच्या कार्यालयांमार्फत राज्यव्यापी मोहीम राबवली जाईल, असे कॅबिनेट मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी सांगितले.**

मराठीचे पुरेसे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द केले जातील, असा इशारा सरनाईक यांनी दिला आहे. १ मे म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य असेल. चालकांना मराठी भाषा लिहिता अथवा वाचता येते की नाही याची पडताळणी करण्यासाठी परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक आणि उपप्रादेशिक कार्यालयांमध्ये तपासणी केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

परवाना देण्यासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान असावे हा नियम आधीपासूनच असला, तरी त्याचे सर्रास उल्लंघन केले जात आहे, असा इशारा सरनाईक यांनी दिला. चालक प्रवाशांसोबत मराठीत संपर्क साधण्यात अपयशी ठरत आहेत किंवा टाळाटाळ करीत आहेत याच्या असंख्य तक्रारी नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई महानगर प्रदेशातून असल्याचे त्यांनी सांगितले. व्यवसाय करतो, त्या प्रदेशातील भाषा शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणे महत्त्वाचे असले, तरी तिथे काम करीत असताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणे तितकेच महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)




### परिवहन अधिकाऱ्यांवरही कारवाई


**कारवाई केवळ चालकांवरच केली जाणार नाही. या प्रस्थापित नियमांकडे दुर्लक्ष करून, चुकीच्या पद्धतीने परवाने दिल्याप्रकरणी दोषी आढळणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई केली जाईल, असे सरनाईक यांनी सांगितले.**

# प्रत्येक गरिबाला सामाजिक न्याय मिळण्यासाठी कटिबद्ध : मोदी

**डेहराडून, १४ एप्रिल -**

काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० निष्प्रभ करण्यात आल्यानंतर आता संपूर्ण देशभरात संविधान पूर्णपणे लागू झाले तसेच प्रत्येक गरिबाला खरोखर सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी रालोआ सरकार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. देशातील जनतेच्या वतीने मी बाबासाहेबांना विनम्र अभिवादन करतो. मागील दशकात आमच्या सरकारने आखलेली धोरणे आणि घेतलेले निर्णय यामुळे संविधानाची प्रतिष्ठा पुनर्स्थापित झाली आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थांच्या
१४८ व्या
पुण्यतिथीनिमित्त
कोटी-कोटी प्रणाम


श्री स्वामी समर्थ


स्वामी सेवक
कै. कल्याणराव शि. इंगळे

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता
अक्कलकोट नगरीत येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांचे हार्दिक स्वागत



✻ स्वागतोत्सुक ✻
श्री. महेश क. इंगळे
चेअरमन
श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट
मा. नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक

देवस्थानच्या अधिपत्याखालील मंदीरे वदेवस्थानच्या वतीने राबविले जाणारे उपक्रम

- ✻ श्री. वटवृक्ष मंदिर वातानुकूलीत गाभारा व मंडप
- ✻ श्री. वटवृक्ष मंदिरात कै. कल्याणराव इंगळे सभा मंडप
- ✻ श्री. मुरलीधर मंदिर येथे नियोजीत भक्त निवास व दर्शन रांग
- ✻ भक्तांच्या सोईसाठी भक्त निवास
- ✻ तंत्र निकेतन विद्यार्थी वस्तीगृह
- ✻ बालकांकरीता शिशू विकास मंदिर
- ✻ वर्षभरातील सण, उत्सवप्रसंगी प्रसाद वाटप
- ✻ श्री. वटवृक्ष मंदिर वातानुकूलीत परिसर
- ✻ श्री. राम मंदिर
- ✻ श्री. विठ्ठल मंदिर
- ✻ रुग्णांच्या सेवेसाठी रुग्णालय
- ✻ भक्त निवास येथे गाईची गोशाळा
- ✻ तंत्र निकेतन महाविद्यालय
- ✻ वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना सेवेकऱ्यांना दैनंदिन मोफत भोजनप्रसादाची सोय

मंदिर परिसरातील उत्सव, यात्रा, सामुदायिक विवाह सोहळे यासाठी देवस्थानच्या वतीने धान्य स्वरुपात मदत, तसेच परगांवाहून येणारे दिंडी व पालखी सोबत पायी चालत येणाऱ्या भक्तांना तसेच पारायण सप्ताह, हरीनाम सप्ताह, व्रतवैकल्य, होमहवन, दत्तयाग, भजनकरी, वर्षभरातील सण, वटवृक्ष मंदिरात व मंदिराच्या अधिपत्याखाली असलेले मुरलीधर मंदिर, विठ्ठल मंदिर, राम मंदिर, येथे सालाबादाप्रमाणे होणाऱ्या उत्सवात सर्व भाविकांना भोजन महाप्रसादाची सोय इत्यादी उपक्रम देवस्थानच्या वतीने राबविले जातात.

आपले नम्र
श्री. महेश क. इंगळे — चेअरमन
श्री. आत्माराम मा. घाटगे — सेक्रेटरी
श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट
विश्वस्त मंडळ
श्री.म.व्यं. गोगी | श्रीम.उ. क. सरदेशमुख
श्री.द.सि. हिरेमठ | श्री.वि.रा.दास
श्री.सं.न.शिंदे | श्री.प्र.ग. झपके
ट्रस्ट रजि.नं.ए ८५,
फोन - ०२१८१-२२०३२१, भक्त निवास ०२१८१-२२१९०९,
रुग्णालय - ०२१८१-२२२२७२,
Email - shrivsmdevasthan@gmail.com
टीप - देणगीदारास ८० जी कलमान्वये आयकरात सवलत आहे.

# राज्यात अकोला, सोलापूर सर्वाधिक उष्ण


### अमरावती, वर्ध्यातही लाट

### शासनाच्या तीन एसओपी लागू

**नागपूर, १४ एप्रिल**

संपूर्ण महाराष्ट्रात उष्णतेची प्रखर लाट निर्माण झाली असून, मंगळवारी विदर्भातील अकोला शहर राज्यात सर्वाधिक उष्ण ठरले. येथे ४४ अंश तापमानाची नोंद झाली आहे. कर्नाटकच्या लकबुर्गी येथेही तापमान ४४ अंश होते. त्याखालोखाल अमरावती आणि वर्धेत अनुक्रमे ४३.८ आणि ४३.५ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. तिथेच सोलापुरात ४३.२ अंश तापमान नोंदविले गेले. विदर्भात चौथ्या क्रमांकाचे उष्ण शहर गडचिरोली व यवतमाळ ठरले.

येथे ४२.६ इतके तापमान होते. त्यानंतर वाशिम येथे ४२.४, नागपूर आणि चंद्रपूर येथे ४२.२, ब्रह्मपुरी येथे ४२, बुलढाणा येथे ४१.६ आणि गोंदियात ४१.१ अंश तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भातील वाढत्या तापमानाच्या पृष्ठभूमीवर नागरिकांच्या संरक्षणासाठी राज्य शासनाने उष्णतेच्या लाटांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती (एसओपी) जाहीर केल्या आहेत. विशेषतः विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४४ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत असल्याने या उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या ठरत असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. महाजन म्हणाले, या एसओपीमुळे उष्णतेशी संबंधित आजार आणि मृत्यू कमी होण्यास मदत होईल. विशेषतः विदर्भातील असंघटित कामगार, शेतमजूर, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना याचा मोठा फायदा होणार आहे. विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ आणि वाशिम हे जिल्हे उष्णतेच्या उच्च जोखमीमध्ये आहेत. बाहेर काम करणाऱ्यांसाठी दिलासा पहिल्या एसओपीमध्ये बांधकाम मजूर, रस्त्यावरील विक्रेते, वाहतूक पोलिस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कामगार आणि रिक्षाचालक यांच्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. दुपारी ११ ते ४ या वेळेत कामाचे नियोजन बदलणे, पाण्याचे ब्रेक, ओआरएस वितरण, सावली व्यवस्था आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर आहे.



## डॉ. बाबासाहेबांना अभिवादन



### जि.प. शाळा नं. २ उपळाई (ठों), बार्शी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) येथे साजरी करण्यात आली. प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर शाळेतील विध्यार्थी स्वरा खोडवे, आनंदी माळी, आरोही ठोगे, वैष्णवी माळी, तन्वी ठोगे या विध्यार्थ्यांची भाषणे झाली. शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे, आनंद घाडगे, प्रभाकर काटे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन आनंद घाडगे यांनी तर ते आभार प्रभाकर काटे यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक हरिभाऊ दळवी, वैशाली खुने, मीरा गरड व दिपाली गोरे उपस्थित होत्या.




### अंनिस शाखा, सोलापूर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शहर शाखा सोलापूरतर्फे मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमास कार्याध्यक्ष आर. डी. गायकवाड, प्रधान सचिव सुजित हावळे, व्ही. डी. गायकवाड, दीपक पांडगळे, लता ढेरे, यशवंतभाई फडतरे, सुनीता गायकवाड, अरुण गायकवाड, मिलिंद ताकपिरे उपस्थित होते.



### स्वेरी महाविद्यालय, पंढरपूर

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण घेताना अनंत अडचणी आल्या. त्यातूनही त्यांनी उच्चशिक्षण घेवून समाजासाठी सर्वस्व अर्पिले. डॉ. आंबेडकर यांनी समाजाला शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा अतिशय मोलाचा मंत्र दिला, असे प्रतिपादन शिक्षणतज्ञ प्रा. आर.वाय.पाटील यांनी केले. स्वेरीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून सुळंबी (ता.राधानगरी, जि. कोल्हापूर) मधील आर.वाय. पाटील जनजागृती प्रशिक्षण केंद्राचे संस्थापक व वक्ते प्रा. आर.वाय पाटील हे मार्गदर्शन करत होते. प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून प्रास्तविक केले. यावेळी स्वेरीच्या इंजिनिअरिंग व फार्मसीमधील विविध स्पर्धा, प्रोजेक्ट आणि विविध कलाकौशल्य, क्रीडा, इ. विभागात यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉ. नीता तळवलकर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांच्या नावांचे वाचन केले. यावेळी अभियंता व शिवाजीराव रानमळे, साहेबराव भुसे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, डॉ.नीता तळवलकर पस्थित होते. डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे सचिव डॉ.सुरज रोंगे यांनी आभार मानले.



### बेंबळे येथे डॉ. बाबासाहेब यांना अभिवादन

बेंबळे (ता. माढा) येथे भारतरत्न यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बेंबळे येथे अभिवादन कार्यक्रम पार पडला. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवालाअभिवादन केले. प्रसिद्ध वक्ते संतोष शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समाधान सलगर, पोलीस पाटील बिभीषण किर्ते तसेच बौद्धाचार्य दत्तात्रय किर्ते यांनी समाजप्रबोधनपर विचार मांडले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी अभिमान किर्ते, उपाध्यक्षपदी विद्याधर किर्ते यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच इतर सदस्यांचीही निवड करण्यात आली. कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य पोपट तात्या अनपट, सरपंच विजय पवार, कैलास भोसले, मनु आबा पवार, माऊली पवार, लक्ष्मण गळगुंडे भाऊसाहेब, माणिक किर्ते, दिपक किर्ते, नामदेव कांबळे, विश्वजीत भोसले, अनिल अवताडे, अतुल अनपट, बबलू काळे, किशोर कदम, खंडू कांबळे, दादा लोंढे, अशोक काळे, अशोक देवकर, पोपट अवताडे, मदन क्षीरसागर, यश भगत उपस्थित होते. शुभम किर्ते, मरिचंद्र किर्ते, रोहित किर्ते, अभिजित किर्ते, अभिजित दादा किर्ते,आनंद ताकतोडे, गणेश कांबळे, भैय्या ताकतोडे, अमोल किर्ते, साहिल किर्ते, नवनाथ किर्ते, किशोर ताकतोडे, नागनाथ किर्ते, उमेश कांबळे, योगेश किर्ते, सौरभ किर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन बिभीषण किर्ते यांनी केले.

# अकलूजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

## विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ एप्रिल-**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



अकलूज येथीलभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने माजी उप मुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, खा.धैर्यशील मोहिते-पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, नगरसेवक क्रांतीसिंह माने-पाटील, विशाल मोरे, नासिक सोनवणे,विलास क्षिरसागर,सचिन देशमुख, नामदेव गलांडे, मोहसीन शेख, मिलिंद कोतमिरे, योगेश गांधी, मृदुला सुर्यवंशी, प्रियंका गायकवाड, रेश्मा तांबोळी, प्रतिभा गायकवाड, मनिषा तिकोटे, शितल बंदपट्टे, नम्रता जगताप, वैशाली भोसले, मंदाकिनी पाडोळे, उज्वला विटकर, माजी सरपंच विठ्ठलराव गायकवाड, दादासाहेब मोरे, किरण धाईंजे, सुशांत गायकवाड, दादा तांबोळी, डॉ. अमोल माने, विशाल फुले, मोहन तिकोटे उपस्थित होते.

अकलूज शहर मुस्लिम समाजाच्यावतीने नाजीम खान इम्रान मोहोळकर, साहील बागवान, अब्रार मोहोळकर, इसाक बागवान,नंदकुमार सोनवणे, हरी मोरे आदी सह मुस्लिम समाज बांधवांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. अकलूज परीसर धनगर समाज उन्नती मंडळाच्या वतीने दिलीप होनमाने, लक्ष्मीकांत वाघे, निलेश ठोंबरे, परशुराम माने, कुणाल होनमाने, प्रा. अमोल बंडगर, राजू गोरे यांच्यासह धनगर समाज बांधवांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आ. राम सातपुते यांच्यासह शहराध्यक्ष महादेव कावळे, नगरसेवक राहुल लोंढे, महेश शिंदे, जयश्री एकतपुरे, दिपाली वाघमोडे, विक्रांत देशमाने, अक्षय वाईकर, बाबा गायकवाड, अशोकराव गायकवाड, सुशांत शिंदे, महावीर खंडागळे, भैय्या चंदनशिवे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# जिल्हा नदी संवर्धन समूहाने मांडल्या नद्यांच्या समस्या

**जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी लक्ष घालण्याचे केले मान्य**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. १४ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सोलापूर जिल्हा नदी संवर्धन समूहच्यावतीने जिल्हाधिकारी कार्तिकेयन तसेच जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांना भेटून जिल्ह्यातील नद्यांची झालेली दुरावस्था व त्यावरील विविध विभागाच्यावतीने अपेक्षित उपाय यावर नद्यांच्या वेदना मांडल्या.



याप्रसंगी शिवाजीराव पवार, अनिल पेठकर, वैजिनाथ घोंगडे, दत्ता पाटील, प्रवीण तळे, हनुमंत कादे, साक शेख, श्रीनिवास गंगणे, संजय पोळ, गणेश जाधव, सिद्धांत बाबरे उपस्थित होते. यावेळी नव्याने रुजू झालेले जिल्हाधिकारी तसेच जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात दहा जलदूत व त्यावर एक जलप्रेमी असे १२० हून अधिक कार्यकर्ते सामाजिक कार्याच्या माध्यमातून स्थानिक नद्या, पाणी, पर्यावरण यावर काम करत आहेत. परंतु दिवसेंदिवस नद्यांची अवस्था अधिक बिकट होत चालली आहे. तसेच महसूल विभागाच्यावतीने नद्या ओढ्यातील अतिक्रमणे काढली, नदीपात्र स्वच्छ ठेवले आणि अवैध वाळू उपशावर प्रतिबंधनात्मक उपाययोजना केली तर प्रत्येक नदी ८० टक्के पुनर्जीवित होईल, असे मत नदी संवर्धन समूहाचे प्रतिनिधी वैजिनाथ घोंगडे यांनी मांडले. याबाबत जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी नदी विकासाबाबत लक्ष घालण्याचे मान्य केले. नदीकाठच्या ग्रामपंचायती मार्फत गावच्या हद्दीतील नदीपात्र दरवर्षी स्वच्छ करण्यात यावे यासाठी ग्रामपंचायतींना आदेश द्यावेत. त्याकरिता वित्त आयोगाकडून मिळणाऱ्या निधीतून नदीकाठच्या गावच्या नदी स्वच्छतेसाठी ठराविक निधी राखीव ठेवावा, अशी मागणी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्याकडे करण्यात आली.

## आंबेडकर जयंती उत्साहात



### पंचशील सामाजिक संस्था, वैराग

येथील इंदिरा नगर, वैराग (ता.बार्शी) येथे पंचशील बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद मंगल धनंजय सोनवणे यांनी भूषवले. त्यांच्या अध्यक्षतेखाली जयंतीचा सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी धाराशिव जिल्हा आरोग्य विभाग पप्पू लोंढे, प्रविण म्हत्रे, पप्पू गायकवाड, भारत रेड्डी, पट्टुशेटजी, बप्पा मोरे, अकबर सय्यद, शहाजी अंधारे, युसूफ शेख, गणेश पांढरमिसे, अमिन पठाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन एनपीसी परिवार, इंदिरा नगर, वैराग (ता. बार्शी) यांच्या वतीने करण्यात आले होते.



### मुस्लिम ब्रिगेड, सोलापूर

संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने पुष्पहार अर्पण करण्यात आले. भारतीय संविधानामुळेच आज देशात विविध धर्म एकत्र गुण्यागोविंदाने राहत आहेत. आपण सारे संविधानास अभिप्रेत आचरण करणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरी आदरांजली ठरेल असे मत शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान यांनी व्यक्त केले. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे राम गायकवाड, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ॲड. गोविंद पाटील, भटक्या विमुक्त जमातीचे विष्णू गायकवाड, विद्रोही सांस्कृतिक मंचचे संजय जोगीपेठकर, हासिब नदाफ, मुस्लिम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, बशीर सय्यद, तन्वीर गुलजार, कादर भागानगरी, गफूर शेख, रिजवान शेख, रियाज पैलवान, रिझवान दंडोती, सादिक शेख, हारिस शेख, शेरु उस्ताद, झाकीर नदाफ, कय्युम मोहोळकर, अफवान बागवान, बावा बागवान उपस्थित होते.



# भाजपाचे शहाजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त २०१ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तसेच भाजपा माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मार्डी येथे रुक्मिणीदेवी पतसंस्था मर्या.भारतीय जनता पार्टी उत्तर सोलापूर तसेच शहाजी पवार युवा मंच मार्डी यांच्यामार्फत रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. तसेच वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी २०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी पवार यांनी वाढदिवसानिमित्त आवाहन केले होते की हार गुच्छ ना आणता शालेय विध्यार्थ्यांसाठी वही पेन घेऊन येण्यासाठी सांगितले होते त्यास उत्तम असा प्रतिसाद मिळाला व जवळपास १० हजार वह्या भेट म्हणून दिल्या. यावेळी भाजपा जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, काशिनाथ कदम, तालुकाध्यक्ष संभाजी दडे, उपाभापती सुनिल भोसले, विनायक सुतार, कमलाकर माने, कदीर कुडले, श्रीकांत वैदकर, रंगनाथ गुरव, संभाजी पवार, रुकमोद्दीन शेख, मल्हारी काळे, बापूसाहेब तोडकर, अंबीर बोगे, युवराज पवार, गणेश पवार, अझहर शेख, प्रभाकर फुलसागर, संजय इनामदार, नागनाथ भालेराव, पांडुरंग शेणमारे, हरिदास बंडपट्टी, मनगिन भालेकर, दीपक गिरे, तात्या नागणकरे, लक्ष्मण बनसोडे, कुमार भिंगारे, श्रीमंत बंडगर, सचिन भिंगारे, श्रीकांत पाटील, बाबुराव भोरे, अविनाश शिरसाठ, सुशांत गरड, योगेश गवळी, दिनेश गणपाटील, तेजस्विनी बोराडे, प्रांजली पवार, सौसरोजनी जगताप उपस्थित होते.

# 'जय भीम'च्या घोषणांनी दुमदुमले बार्शी शहर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी भीमसैनिकांची गर्दी**

**बार्शी, दि. १४ एप्रिल-**

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश देणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बार्शी शहरात उत्साह, शिस्त आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडवत उत्सव साजरा करण्यात आला.



जयंतीच्या पूर्वसंध्येला मध्यरात्री ठीक १२ वाजता न्यायालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ हजारो भीमप्रेमी नागरिक एकवटले होते. विद्युत रोषणाईने उजळलेल्या परिसरात पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. सकाळपासूनच शहरातील विविध भागांत जयंती साजरी करण्यात आली. वृत्तपत्र संपादक पत्रकार संघाच्या वतीनेही कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. पुतळा परिसरात द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया यांच्यावतीने सकाळपासून दुपारपर्यंत भीमगीतांचा सुरेल कार्यक्रम सादर करण्यात आला. गायक पंडित राजगुरु, मिलिंद ताकपिरे आणि नयना राजगुरु यांनी सादर केलेल्या गीतांनी वातावरण भारावून गेले. तसेच पुतळा परिसरात डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या वतीने भिमसैनिकांना पाणी वाटप करण्यात आले. संभाजी ब्रिगेडच्यावतीने भीमसैनिकांना लाडू वाटप करण्यात आले. जयंतीनिमित्त अनेक मान्यवरांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यामध्ये आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, तहसीलदार एफ.आर. शेख, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, माजी सभापती युवराज काटे, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, रणवीर राऊत, कृष्णराज बारबोले आदींचा समावेश होता.

**मध्यवर्ती जयंती उत्सव भिम नगरची भव्य मिरवणूक**

दुपारनंतर भीमनगर येथील मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्यावतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासोबतच तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, शाहीर अण्णाभाऊ साठे, राजर्षी शाहू महाराज यांचे पुतळे उभारण्यात आले होते. पारंपारिक वाद्यांचा गजर, हलगी, संबळ, ढोल-ताशा, बँड पथक आणि आकर्षक सजावटींसह ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरुन उत्साहात पार पडली. विशेष आकर्षण म्हणून मिरवणुकीच्या अग्रभागी दोन उंट सहभागी झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# लाल-निळ्या झेंड्यांसह माकपने केले बाबासाहेबांना अभिवादन

**जय भीम जय संविधानच्या घोषणा देत काढली मानवंदना रॅली**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) - माकपच्या वतीने सोलापूरात भव्य मानवंदना रॅली मोठ्या उत्साहात जोषपूर्ण वातावरणात काढण्यात आली. लाल, निळे आणि तिरंगा ध्वज हातात घेत कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

रॅलीची सुरुवात दत्तनगर येथील लालबावटा कार्यालयातून करण्यात आली. यावेळी डॉ. अशोक ढवळे यांच्या हस्ते तसेच ज्येष्ठ नेते, माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यानंतर कार्यकर्त्यांनी लाल रंगाचे शर्ट परिधान करून शिस्तबद्ध पद्धतीने रॅली काढली. दत्तनगर येथून सुरू झालेली ही रॅली तानाबाना चौक, विववो प्रोसेस, रंगभवन मार्ग, हरीभाई देवकरण प्रशाला मार्गे मार्गक्रमण करत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे पोहोचली. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. या रॅलीमध्ये मनुस्मृती मुर्दाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, लोकशाही जिंदाबाद, संविधान जिंदाबाद, संविधान की रक्षा कौन करेगा - हम करेंगे अशा घोषणांनी वातावरण दणाणून सोडले.

दरम्यान, पक्षाच्या वतीने भव्य लाल सैनिक तरुणांची मानवंदना रॅली देखील काढण्यात आली. या रॅलीचे नेतृत्व पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) यांनी केले. कार्यक्रमास पक्षाचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. एम. एच. शेख, नसीमा शेख, शेवंता देशमुख, ॲड. अनिल वासम, शकुंतला पाणीभाते, अशोक बल्ला, दीपक निकंबे, अखिल शेख, दाऊद शेख, नरेश दुगाणे, विक्रम कलबुर्गी, विल्यम ससाणे, बापू साबळे, बाबू कोकणे, मल्लेशम कारमपुरी, वीरेंद्र पद्मा, बाळकृष्ण मल्याळ, विजय हारसुरे, रफिक काझी, हसन शेख, शहाबुद्दीन शेख, अमित मंचले, बालाजी तुम्मा, आसिफ पठाण आदी उपस्थित होते.



# भटक्यांच्या पालावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

येथील भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या वतीने भटक्यांच्या पालावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंती निमित्त भटक्या चे प्रत्येक मुल शाळेत दाखल करण्याचा निर्धार भटके विमुक्त समाजातील महिलांनी केला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची सुरुवात म्हणून मुलांना वह्या पुस्तके व शाळेची स्कूल बॅग देण्यात आली ,या वेळी विविध समविचारी संस्था, संघटना व्यक्तिंना निमंत्रित करण्यात आले होते या, यशवंत फडतरे मल्लेश सूर्यवंशी प्रा. यशोधरा धोत्रे. वैशाली बनसोडे. युवराज मूळमाने. कीर्तीपाल शिवशरण विश्वास नागटिळक सुगत कांबळे राजेश सुरवसे, मुतप्पा भारती, राजू तेली, मारुती भारती, संतोष भारती, वेंकटेश भारती, लिंगप्पा तेली, हिराम्मा तेली, गौरम्मा भारती, कस्तुरी तेली, बायका तेली उपस्थित होते. रोहिणी गायकवाड यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## डॉ. आंबेडकर जयंती साजरी



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूल

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची व संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते. विनायक हत्तुरे, अण्णाराया तुप्पद, बसवराज कोरे, भारत राऊत, गंगाराम घोडके यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. श्रावस्ती गायकवाड, श्राविका केसकर, सुश्मिता तडलगी, प्रणाली चव्हाण, आदर्श जगदाळे, सर्वेश नवलाखे, श्रीधर तोळणुर, वेदांत बगले, संचिता खमितकर, रितिका जेऊरे, श्रावणी पाटील, वैष्णवी येणगुरे, भाग्यश्री स्वामी, सर्वज्ञा स्वामी, वेदिका शिंदे, श्रावणी गाडेकर या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यावेळी सुनिता गंगौडा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी गुरुसिद्धप्पा पाटील,दत्तात्रय अगरखेड, विद्याधर हुलगेरी, सुकेशनी गंगौडा, संतोष हिरेमठ, गणेश कोरे, संतोष स्वामी, अमरनाथ कदारे, प्रतीक्षा बिडवे, प्रिया प्रसारे उपस्थित होते. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. अनिता हौदे यांनी आभार मानले.



### उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय

येथील श्राविका संकुलातील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती प्रशालेच्या वरिष्ठ दीप्ती शहा व मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे यांच्या मार्गदर्शनानुसार साजरी करण्यात आली.अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख माधवी खोत, प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक सुकुमार वारे यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगीविद्यार्थिनी श्रद्धा कांबळे व आरोही कुचेकर यांनी भाषण केले. सहशिक्षिका पल्लवी खांडवे यांनी मनोगत व्यक्त केले. कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी आपल्या कुशल हस्तकौशल्याद्वारे साकारलेले डॉ. आंबेडकर यांचे अप्रतिम चित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. सहशिक्षिका सोनाली उंडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रियंका जैन यांनी आभार मानले.



### महावितरण कार्यालय

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालय येथे साजरी करण्यात आली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर शहर ई उपविभाग अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, निलकंठ कांबळे, अनिलकुमार बनसोडे, मल्लिनाथ मुन्नोळी, बालाजी वराडे, मेहबूब बागवान, दिनेशकुमार बळवंत, आनंद फुलारी, गुंडाप्पा बनसोडे, संभाजी रुपनर, प्रदीप मुलादे, नितीन कोळी, धनराज पारेकर, प्रमोद गुमल, अक्षय देशमुख, हिना बागवान, चंद्रकला शिंदे उपस्थित होते.



### कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय

कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली त्यानंतर प्रशालेचे सहशिक्षक राजशेखर स्वामी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. बाबासाहेब तर नसते तर या बहुजन समाजाचे काय झाले असते यावर आधारित असलेली प्रा. विनायक पवार यांची एक कविता सादर केली. कार्यक्रमासाठी श्रीनिवास देव्हारे यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर सुंदर फुलांची आरास केली होती. यावेळी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर,उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते.

### पांडुरंग सावंत यांचे निधन



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ एप्रिल -**

सांगोल्यातील वृत्तपत्र विक्रेते व सावंतवस्ती येथील रहिवाशी पांडुरंग लक्ष्मण सावंत (वय-६१) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, बहिणी, पत्नी, एक मुलगा, दोन मुली, भाऊ, भाऊजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.

# १ मे पासून सोलापूर-पुणे विमानसेवा

## अवघ्या पाऊण तासात पुण्यात पोहोचणार

## पर्यटन विकासाला मिळणार चालना




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

पुण्याहून सोलापूरला आता अवघ्या ४० ते ४५ मिनिटांतच पोहोचणे शक्य होणार आहे. पुणे विमानतळावर सोलापूरसाठी सेवा देणाऱ्या स्टार एअर कंपनीला स्लॉट मंजूर झाले असून, १ मेपासून ही विमानसेवा सुरू होणार आहे. पुण्याहून पहिल्यांदाच सोलापूरशी हवाई कनेक्टिव्हिटी होत असून, या निमित्ताने पुण्याशी जोडलेले सोलापूर हे पश्चिम महाराष्ट्रातील पहिले शहर ठरले आहे. दरम्यान, या हवाई सेवेमुळे सोलापूरच्या पर्यटन विकासाला चांगलीच चालना मिळणार असल्याची चर्चा सोलापूरच्या जाणकार नागरिकांतून होत आहे.

पुणे विमानतळाचा उन्हाळी हंगाम सुरू झाला असून, १ मेपासून पुणे विमानतळाला मंजूर झालेले १५ स्लॉटचा वापर सुरू होत आहे. त्यामुळे पुणे शहराच्या प्रादेशिक आणि राष्ट्रीय कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी वाढ होत आहे. १५ अतिरिक्त स्लॉटमुळे आता दररोजच्या एकूण स्लॉटची संख्या २२० वरून २३५ झाली आहे. नवीन स्लॉटमध्ये पुण्याहून सोलापूर, मंगळूरू व बागडोगरा या शहरांसाठी पुण्याहून पहिल्यांदाच विमानसेवा सुरू होत आहे. उड्डाणांना मंजुरी मिळाली असून, महाराष्ट्र दिनापासून (१ मे) सोलापूर, मंगळुरू, बागडोगरासाठी थेट विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी दिली. नव्या हवाईमार्गांमुळे देशांतर्गत पर्यटनाबरोबरच स्थानिक बाजारपेठांमधील मागणीत वाढ होण्याची शक्यता असल्याचेही ढोके यांनी नमूद केले.

पुणे विमानतळावर दररोज ये-जा करणाऱ्या विमानांची संख्या २२० होती. पुणे विमानतळावरून १५ नवीन उड्डाणांना मंजुरी मिळाल्याने ये-जा करणाऱ्या विमानांच्या संख्येत वाढ होऊन ती २३५ झाली आहे. उड्डाणांमध्ये वाढ झाल्याने नवीन हवाई मार्ग सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्र सरकारच्या उडाण योजनेअंतर्गत पुणे विमानतळावरून मंगळुरू, सोलापूर आणि बागडोगरा या शहरांसाठी थेट विमान सेवा सुरू करण्यात येणार आहे. या सेवेमुळे रस्ते मार्गावरील प्रवाशांचा ४-५ तासांचा वेळ वाचणार आहे. दरम्यान, याच दरम्यान, गोवा ते सोलापूर असलेली विमानसेवा स्टार कंपनी हैदराबाद पर्यंत घेवून जाणार असल्याने आता सोलापूरकरांना लवकरच हैदराबादचाही हवाई प्रवास करता येणार आहे. याचा फायदा स्थानिक हॉटेल व्यावसायिक, उद्योजकांना आणि विशेषत: स्थानिक व्यापाऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात होणार आहे.

### सोलापुरात पर्यटनप्रेमींची संख्या वाढणार

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या मंदिराप्रमाणेच तुळजापूर, अक्कलकोट आणि गाणगापूर येथे भाविकांची आता मोठी गर्दी वाढू लागली आहे. पुणे येथून विमानसेवा सुरू झाल्याने पुणेकर पर्यटकांची गर्दी आता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. सोलापूरला लाभलेला ऐतिहासिक वारसा आणि येथील पर्यटनस्थळे यांचा मेळ घातल्यास भविष्यात सोलापूर हे उत्तम पर्यटनस्थळ म्हणून विकसित होऊ शकते. यासाठी आता जिल्हाधिकारी कार्तिकेयन हे पुढे सरसावले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सोलापूर शहर व जिल्ह्यातील १२० ठिकाणांची यादी यापूर्वीच तयार करण्यात आली आहे. या पर्यटनाच्या नवीन उपक्रमासाठी सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सकडूनही विशेष सहकार्य करू

**- राजू राठी, अध्यक्ष सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स**

### जिल्हाधिकाऱ्यांच्या 'टुरिझम सर्किट' संकल्पनेला मिळणार चालना

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी शहर आणि जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांचा आराखडा तयार करून 'टुरिझम सर्किट' निर्माण करणार असल्याची घोषणा २ दिवसांपूर्वीच केली होती. दरम्यान, या वाढत्या विमानसेवेचा फायदा सोलापूरच्या पर्यटन विकासाला नक्कीच होणार आहे. सोलापूरला धार्मिक, ऐतिहासिक, जलपर्यटन, कृषीपर्यटन आणि वन्यजीव पर्यटन मोठ्या प्रमाणात आहे. हे एकाच थीमवर आधारित अनेक पर्यटन स्थळांचे जाळे आहे, जे एका नियोजित मार्गाने जोडणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. याचा फायदा येणाऱ्या पर्यटकांनाही नक्कीच होणार आहे.

## श्री प्रसन्नेश्वर दत्त मंदिरातर्फे उद्यापासून हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

होटगी रोड भारत माता नगर येथील श्री प्रसन्नेश्वर दत्त मंदिराच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त १६ ते २३ एप्रिल या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सदस्य संजय महाराज इनामदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सप्ताहात दररोज पहाटे ५ ते ६ काकड आरती, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी २.३० ते ४ महिला भजनी मंडळाचे भजन, दुपारी ४.३० ते ५.३० हरिपाठ, सायंकाळी ६ ते ७ प्रवचन, रात्री ८ ते १० हरिकीर्तन व रात्री १० वाजता महाप्रसाद असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. प्रवचन मालिकेमध्ये हभप निवृत्ती महाराज ताकमोगे, मुकुंद महाराज ताकमोगे, श्रीकृष्ण पुकळे, वैशाली महाराज इनामदार, कांचनमाला महाराज लोहोकरे, अभिमान महाराज घंटे, नरसप्पा व्हनसुरे (गुरुजी) तसेच हरिप्रसाद महाराज धर्माधिकारी यांची प्रवचन सेवा होणार आहे. तर कीर्तन मालिकेमध्ये अनुक्रमे हभप संजय महाराज पाटील, सोहम महाराज देहूकर, सुधाकर महाराज इंगळे, नारायण महाराज गरड, ज्ञानेश्वर महाराज नामदास, चैतन्य महाराज रसाळ, प्रभाकर महाराज बोधले तसेच रमेश महाराज शिवापूरकर यांची कीर्तने आयोजित केली आहेत. १६ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता गोरख महाराज तुपे व आळंदी देवाची येथील संच यांचा सोंगी भारूड कार्यक्रम होणार आहे. तसेच २१ एप्रिल रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे. २३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता ग्रंथ दिंडी व पालखी सोहळा होणार असून सायंकाळी ५ ते ७ या वेळेत काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात येणार असल्याचे श्रीकृष्ण पुकळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस नितीन ढेरे, तुकाराम राऊत आदी उपस्थित होते.

## 'लाडकी बहीण' योजनेतील लाखो महिलांचा लाभ बंद

### त्रुटी दुरुस्तीसाठी 30 एप्रिलपर्यंत मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**

मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर महिलांना आर्थिक लाभ मिळाला; मात्र पडताळणी प्रक्रियेनंतर लाखो महिलांचा लाभ अचानक बंद झाल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक महिलांचा नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारीनंतर लाभ अचानक बंद झाला आहे. आता त्यांना थेट जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात जाऊन माहिती घ्यावी लागणार आहे.या त्रुटी दुरुस्त करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेचे संपूर्ण कामकाज थेट मंत्रालयातून चालवले जात असल्याने जिल्हा किंवा विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांकडे सविस्तर आकडेवारी उपलब्ध नसल्याचेही स्पष्ट झाले आहे.

### महिला व बालविकास विभागाकडेच माहिती

लाभ बंद होण्यामागील नेमके कारण संबंधित महिलांना कार्यालयातूनच समजेल. कोणत्या निकषांमुळे अपात्र ठरवण्यात आले, याची सविस्तर माहिती तेथे दिली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांकडील लॉगिनही महिला व बालविकास विभागाकडेच असल्याने ही माहिती थेट तेथूनच उपलब्ध होणार आहे.

**- प्रसाद मिरकले, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी**

### ६५ वर्षांवरील १५ हजार; ३ हजार तरुणी अपात्र

सोलापूर जिल्ह्यात सुरुवातीला सुमारे ११ लाख २० हजार महिलांना या योजनेचा लाभ मिळाला होता, तर राज्यभरात हा आकडा अडीच कोटींच्या घरात होता. मात्र, निकषांनुसार पडताळणी केल्यानंतर तब्बल ६५ ते ७० लाख महिलांचा लाभ बंद करण्यात आला आहे. जिल्ह्यातील तपासणीत काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. सुमारे ७१ महिलांकडे चारचाकी वाहने असल्याचे आढळले असून, त्या निकषांनुसार अपात्र ठरल्या आहेत. तसेच ६५ वर्षांवरील १५ हजार ५३० महिला आणि ३ हजार २८२ तरुणीही अपात्र ठरल्या आहेत. ९८ हजार २१ महिलांची 'ई-केवायसी' प्रक्रिया चुकीची आहे.

## पुण्यतिथी उत्सवाकरिता अक्कलकोट नगरी सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १४ एप्रिल -**



श्री दत्त गुरुचे अवतार श्री स्वामी महाराज याची १४८ वी पुण्यतिथी बुधवार १५ एप्रिल रोजी तीर्थक्षेत्र अक्कलकोट प्रज्ञापुर नगरीत मोठ्या उत्साहाने भक्ती भावाने मंगलमय वातावरणात साजरी होत असून यानिमित्याने भाविक प्रज्ञापुर नगरील दाखल झाले आहेत . प्रज्ञापुर नगरी स्वामी भक्तानी फुलली असुन आसमंतात स्वामी नामाचा गजर दुमदुमून गेला आहे .

पहाटे पासून अक्कलकोट प्रज्ञापुर नगरीत नागरिक सडा सामर्जन रांगोळी काढण्यात व्यस्त आहेत पहाटे २ वाजता वटवृक्ष मंदिरातुन नगर प्रदक्षिणा निघणार आहे शहरातील फत्तेसिंह चौक सावरकर चौक कारंजा चौक समर्था चेसमाधी मठ सुभाष गल्ली राम गल्ली भारत गल्ली देशमुख गल्ली स्वामी मंदिर प्रमुख मार्गावरून मार्गस्थ होणार आहे पहाटे २ पासूननच बोला श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ' बोला दिंगबरा बोला दिंगबरा श्रीपाद वल्लभ दिंगबरा ! च्या जयघोषाने आसमंत दुमदुमणार आहे . काकडारती होईल स्वामी दर्शनार्थ मंदिर पहाटे पासून खुले असणार आहे . दर्शनासाठी दर्शन बारी मंडप उभारण्यात आला आहे राजे फत्तेसिंह चौक मार्गा पर्यंत दर्शन मंडप उभा केला आहे . संस्थानिक राजघराण्याच्या वतीने दुपारी नैवेद्य आरती होणार आहे यानंतर भादिकाना प्रसाद वाटप ५ वा . शहरातील प्रमुख मार्गावरून पालखी मिरवणुक निघणार आहे . शहरात अनेक ठिकाणी पालखी चे स्वागत प्रसाद वाटप कार्यक्रम आयोजित केले आहेत.

## बीबीए-बीसीएसाठी आजपासून ११ दिवसीय मोफत कार्यशाळा

**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**

बारावीनंतर व्यवस्थापन आणि आयटी क्षेत्रात करिअर घडविण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हिराचंद नेमचंद महाविद्यालयाच्या व्यवस्थापन विभागातर्फे बीबीए आणि बीसीए अभ्यासक्रमांच्या एमएच-सीईटी प्रवेश परीक्षेची सर्वांगीण तयारी करून देण्यासाठी १५ ते २५ एप्रिलमध्ये ११ दिवसांची निःशुल्क कार्यशाळा आयोजित केली आहे. प्रवेश मर्यादित असल्यामुळे पूर्वनोंदणी अनिवार्य आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ९५६१८८६०४९ किंवा ८९८३६००६७८ या क्रमांकांवर संपर्क साधावा. दररोज सकाळी ९ ते ११ या वेळेत प्रत्यक्ष (ऑफलाइन) पद्धतीने होणाऱ्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना अल्पावधीत अभ्यासक्रमाचे प्रभावी पुनरावलोकन, संकल्पनांची सुस्पष्टता आणि प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाचा अचूक अंदाज मिळावा, यावर विशेष भर दिला जाणार आहे. या उपक्रमात अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार असून, रीजनिंग, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि संगणक मूलतत्त्वे या विषयांवर सखोल प्रशिक्षण दिले जाणार आहे.



### डॉ. आंबेडकर हायस्कूलमध्ये जयंती साजरी

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

डॉ.आंबेडकर मेमोरियल हायस्कूलमध्ये डॉ.आंबेडकर जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष भागवतजी सरवदे, सचिव प्रविण निकाळजे, स्कूल कमिटी चेअरमन बबनराव साबळे, रात्र प्रशालेचे मुख्याध्यापक सतीश शिंदे, वैदयकीय महाविदयालयाचे प्राध्यापिका डॉ. सरोज बोलदे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी सामुहिक बुद्धवंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. या प्रास्ताविक मुख्याध्यापिका संतोषी साबळे यांनी केले. विदयार्थ्यांची समायोचित भाषणे झाली, शिक्षक प्रतिनिधी सुशिल जानराव व वैदयाकीय प्राध्यापिका डॉ. सरोज बोलदे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी डॉ. बोलदे यांच्याकडून विदयार्थ्यांना खाऊ देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ कुलकर्णी यांनी केले चित्रा धारशिवकर यांनी आभार मानले.

## संत शिरोमणी सावता महाराज चंदन उटी उत्सव व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**

संत शिरोमणी सावता महाराज चंदन उटी उत्सव व पुरस्कार वितरण सोहळा अरण (ता. माढा) येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पुरस्कार वितरण नामदार ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

उत्सवानिमित्त सावता महाराजांच्या समाधीला चंदनउटी लेप पूजा करून पालकमंत्री गोरे यांनी दर्शन घेतले. त्यानंतर संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टतर्फे 'कर्मभूषण' प्रथम पुरस्कार ह.भ. प. ज्ञानेश्वर कदम माऊली महाराज यांना तर द्वितीय पुरस्कार विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर विभाग सुनील फुलारी यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी पालकमंत्री गोरे यांनी अरण येथील संजीवन समाधीचा 'अ' वर्ग तीर्थक्षेत्रात समावेश करण्याचा मुख्यमंत्री यांनी दिलेला शब्द पाळला असून, पहिल्या टप्प्यात ८९ कोटी निधीस मान्यता मिळाल्याचे सांगितले. लवकरच भूसंपादनाचे काम पूर्ण होऊन येत्या २४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. पालकमंत्री गोरे म्हणाले की, सावता महाराजांनी आपल्या कर्मातूनच पांडुरंगाची भक्ती करून समाजात समानतेचा संदेश दिला. संतांचे विचार हेच आपले स्फूर्तीस्थान असून, या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी सरकार निधी कमी पडू देणार नाही. पंढरपूर कॉरिडॉर, मंगळवेढ्यातील बसवेश्वर स्मारक व अरण येथील तीर्थक्षेत्राचा विकास प्राधान्याने पूर्ण करण्यात येईल. या सोहळ्यास उपविभागीय अधिकारी जयश्री आव्हाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर व वसेकर परिवार, प्रभू महाराज माळी, कल्याण काका, नूतन सभापती अमृता वाघे तसेच गावकरी व भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १४ एप्रिल-**



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी शहरातून रॅली काढण्यात आली होती. यामध्ये मोटार सायकल, रिक्षा, चारचाकी वरून तरूण, युवती, महिला व असंख्य भीमसैनीक हातात निळे झेंडे घेऊन जय भीम च्या घोषणा देत होते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मध्यवर्ती जयंती उत्सवाच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्याला माजी आमदार विनायकराव पाटील, मंडळाचे अध्यक्ष बापुसाहेब जगताप यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन व धम्म वंदना घेण्यात आली. दिवसभर अभिवादन करण्यासाठी बौद्ध उपासक, उपासिका व मान्यवरांनी रांग लावली होती.

यावेळी नगराध्यक्षा जयश्री भिसे, उपनगराध्यक्षा सविता जगताप, नगरसेवक अमरकुमार माने, गटनेते समीर मुलाणी, शकील तांबोळी, आनंद कदम, नितीन पवार, मोहसीन मकनू, हरिश्चंद्र कांबळे प्रा.आशिष रजपूत,वसीम मुलाणी, दर्शन काशीद अर्शाद मुलाणी, हरीश भराटे, चंद्रकांत वाघमारे, सचिन वाळके, जितेंद्र गायकवाड, भगवंत साळवे, प्रा.डॉ. राजेंद्र दास, प्रकाश गोरे, जयश्री माने, सीमा रजपूत यांच्यासह असंख्य अनुयायी उपस्थित होते.

मध्यवर्ती महोत्सव मंडळाच्या वतीने सोमवारी रात्री १३५ तोफांची सलामी देऊन जयंती उत्सवाला प्रारंभ केला. रोज सकाळी धम्म वंदना घेण्यात येणार आहे.

शहरात नगर परिषद कार्यालय, प्रांत कार्यालय, शाळा, महाविद्यालय,रेल्वे स्टेशन व कार्यालय, टिळक चौक, स्टेशन चौक पार्किंग, आंबेडकर नगर,पटेल चौक, भगवा झेंडा चौक, नवी काडादी चाळी समोर टेंभूर्णी रस्ता,माढा रोड आदी ठिकाणी मंडप उभारून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कुर्डूवाडी काँग्रेस अल्पसंख्यक सेलच्या वतीने महामानव विश्वभूषण डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली.

## अग्रलेख...

# समाजाच्या नसांत शिरतोय नशेचा कॅन्सर

कॅन्सर हा शब्द ऐकला की सर्वांच्या अंगावर काटा येतो. कर्करोग किंवा कॅन्सर हा दुर्धर आजार आहे. तो एकदम दिसत नाही. तो शांतपणे वाढतो, आतून पोखरतो आणि जेव्हा त्याची जाणीव होते, तेव्हा बराच उशीर झालेला असतो. बहुतेकदा तो जीवघेणा ठरतो. भारतात अमली पदार्थांचे व्यसन हा असाच एक 'सामाजिक कॅन्सर' बनत चालला आहे. तो वरवर दिसत नाही, पण समाजाच्या मुळावर उठला आहे. एकेकाळी पंजाब हे राज्य अमली पदार्थांच्या व्यसनामुळे 'उडता पंजाब' म्हणून कुप्रसिद्ध झाले होते. 'उडता पंजाब' नावाचा चित्रपटही या विषयावर आला होता. त्या वेळी अनेकांना वाटले होते की हा प्रश्न केवळ पंजाब या एका राज्यापुरता मर्यादित आहे. पण आज परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. ड्रग्जचा विळखा आता देशभर पसरला आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि औद्योगिक राज्यातही ड्रग्जचा अवैध व्यापार झपाट्याने वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमध्ये दररोज कोट्यवधींचे अमली पदार्थ जप्त होत असल्याच्या बातम्या येत आहेत. अशात एक साधा प्रश्न डोळ्यासमोर उभा राहतो आणि तो असा की, इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज पकडले जात असतील तर नजरेआड किती जात असतील?

जागतिक स्तरावर पाहिले तर ही समस्या दहशतवादाएवढीच गंभीर आहे. जागतिक संघटनांच्या अहवालानुसार, जगभरात कोट्यवधी लोक कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या अमली पदार्थांच्या आहारी गेलेले आहेत. त्यामुळे त्यांचे वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवन नासते आहे. ड्रग्जचा व्यापार हा अब्जावधी डॉलर्सच्या काळ्या अर्थव्यवस्थेचा भाग आहे. नैसर्गिक अमली पदार्थांच्या साथीने सिंथेटिक ड्रग्ज उदाहरणार्थ- मेथ (मेथॅम्फेटामाइन), एमडीएमए (मेथॅलिनडायॉक्सिमेथॅफेटामाईन), फेंटानिल यांचा वापर झपाट्याने वाढत आहे. अमेरिकेत 'झोंबी ड्रग्ज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमली पदार्थांनी तर भीषण स्थिती निर्माण केली आहे. त्याचे व्यसन करणारी माणसे जिवंत असूनही अक्षरशः निर्जीव वाटावीत, अशी अवस्था होते. भारतातही त्याची उदाहरणे दिसू लागली आहेत. तरुण लोकसंख्या हे आपले बलस्थान असताना, त्याच तरुणाईला या व्यसनाने ग्रासायला सुरुवात केली आहे. अंदाजे तीन कोटींहून अधिक भारतीय अमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेले आहेत. विशेषतः १८ ते ३५ या वयोगटातील तरुण याचा सर्वाधिक बळी ठरत आहेत. उत्तर भारतातून सुरू झालेली ही समस्या आता पश्चिम आणि दक्षिण भारतातही वेगाने पसरत आहे. तरीही हा सरकारला चिंतेचा विषय वाटत नसेल तर तो आपल्या सर्वांच्या चिंतेचाच विषय आहे.

महाराष्ट्रात या समस्येचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. भारतात आर्थिक क्षमता आहे, शहरीकरण आहे आणि 'लाईफस्टाईल'चा दबाव आहे. पूलसाईड पार्ट्या, फार्महाऊस गॅदरिंग्स, ईडीएम नाईट्स (इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक नाईट्स), अमुक मीट, तमुक जीटी अशा अनेक प्रकारांच्या आड ड्रग्जचा वापर होत असल्याचे ऐकायला मिळत आहे. गांजा, कोकेन, एमडी, एलएसडी यासारख्या पदार्थांची मागणी वाढते आहे. हे सगळे एका मोठ्या आणि संघटित साखळीच्या माध्यमातून चालते. आंतरराष्ट्रीय तस्कर, ड्रग्जचे वितरण करणारे लोक, स्थानिक वितरक, क्लब सर्किट आणि सरकारी व्यवस्थेतील भ्रष्ट मंडळींच्या भरवशावर हा कारभार दिवसागणिक वाढत चाललेला आहे. पोलिसांकडून किंवा अन्य तपास यंत्रणांकडून होणाऱ्या कारवाया, जप्ती या सगळ्या गोष्टी वरवर पाहता प्रभावी वाटतात. पण त्या पुरेशा नाहीत, हे सिद्ध झालेले आहे. लहान मासे पकडले जातात, पण मोठे मासे सापडत नाहीत किंवा तसा प्रयत्न केला जात नाही. त्यामुळे आपली व्यवस्था ड्रग्जविरोधी लढाईत पराभूत होत असल्याची भावना निर्माण होत आहे, याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

भारताने नक्षलवादासारख्या भीषण समस्येलाही मोठ्या प्रमाणात आटोक्यात आणले. नक्षलवाद इतिहासजमा होत असल्याचे चित्र आहे. मग ड्रग्जच्या विरोधात तितक्याच कठोर इच्छाशक्तीने लढा का दिला जात नाही, हा खरा प्रश्न आहे. पण याचे उत्तर सोपे नाही. कारण या व्यवसायात पैसा प्रचंड आहे, लब्धप्रतिष्ठितांचा सहभाग आहे आणि त्याला रोखण्यासाठी लागणारी राजकीय व सामाजिक इच्छाशक्ती अजूनही अपुरी आहे. ड्रग्जचा अवैध व्यापार हा अनेक इतर गुन्ह्यांशी जोडलेला आहे. महिला-बालकांचे लैंगिक शोषण, सायबर गुन्हे, दहशतवादासाठी निधी, संघटित गुन्हेगारी या सगळ्यांचा ड्रग्जच्या कारभाराशी संबंध आहे. म्हणजेच हा फक्त आरोग्याचा किंवा कायद्याचा प्रश्न नसून, तो सामाजिक आणि राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. तुम्ही कोणताही गंभीर गुन्हा घ्या, त्याचा संबंध ड्रग्जशी असतोच असतो. या सगळ्यात आपण एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित करतो आणि तो असा की, ड्रग्जची मागणी निर्माण होते कशी? त्याचे उत्तर असे की, आजचा तरुण प्रचंड तणावाखाली जगतो आहे. स्पर्धा, करीअरचा दबाव, सोशल मीडियावरचा दिखावा, एकटेपणा अशा अनेक गोष्टींमुळे तो मानसिकदृष्ट्या थकलेला आहे. त्याला या थकव्यापासून दिलासा हवा असतो आणि ड्रग्ज त्याला तात्पुरता दिलासा देतात. खरे तर ही त्याने स्वतःच्या आयुष्याला लावलेली आग असते. त्यात तो होरपळतो, त्याचे कुटुंब खाक होते आणि समाजाचेही नुकसान होते. वास्तव असे की, या समस्येने इतके गंभीर वळण घेतल्यावरही आपली शासन-प्रशासनाची व्यवस्था याबाबत फारशी गंभीर झालेली दिसत नाही. असा निष्कर्ष काढण्यासही हरकत नाही की, पोलिस किंवा नोकरशाही याबाबत फार काही करू शकणार नाही. त्याची कारणे अनेक आहेत. तरीही नक्षल्यांच्या विरोधात जशी सक्ती केंद्र सरकारने दाखविली, तशीच कठोरता याबाबत दाखविली जाणे आणि प्रतिबंधक यंत्रणांना कामाला जुंपणे आवश्यक आहे. मोठ्या ड्रग्ज सिंडिकेट्सवर थेट कारवाई झाली पाहिजे आणि त्यामागे असलेल्यांचे बुरखे फाडले पाहिजेत. छोट्या धाडींवर आणि जप्तीवर समाधान मानून हा प्रश्न संपणारा नाही. त्यासाठी निर्धारपूर्वक आणि दीर्घकालीन मोहीमच राबवावी लागणार आहे. यासंदर्भात सरकारची भूमिका जशी महत्त्वाची आहे, तशी प्रत्येक कुटुंबाचीही भूमिका महत्त्वाची आहे. आपली मुले कुठे जातात, कुणासोबत असतात, काय खातात-पितात, घरी आल्यावर कशी वागतात आणि कशी दिसतात, त्यांची पुरेशी झोप होते काय, अभ्यासात-कामात लक्ष आहे काय अशा सगळ्या गोष्टींवर लक्ष ठेवले पाहिजे. ड्रग्जच्या विळख्यापासून आपल्या युवा पिढीला वाचवायचे असेल तर मुलांच्या वर्तनातील बदल ओळखणे, त्यांच्या मित्रपरिवारावर लक्ष ठेवणे, संवाद कायम ठेवणे या गोष्टी अत्यावश्यक आहेत. स्पर्धा हे मानवी जीवनाचे वैशिष्ट्य आहे, हे मुलांना सांगतानाच यशाएवढेच अपयश देखील पचवण्याची शिकवण त्यांना देणे आता गरजेचे झाले आहे. यशाची व्याख्या केवळ पैसा, प्रतिष्ठा, पार्ट्या, नाईट आऊट्स आणि बाह्य दिखावा इतकीच मर्यादित असेल, तर हा प्रश्न कधीच संपणार नाही. स्पर्धेपेक्षा संतुलन, दिखाव्यापेक्षा समाधान आणि यशापेक्षा आनंद ही मूल्ये कुटुंबांत, मुलांमध्ये पुन्हा रुजवावी लागतील. परिस्थिती गंभीर आहे, पण हाताबाहेर गेलेली नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. परंतु, आपण सारे आता जागे झालो नाही, प्रतिकार सुरू केला नाही तर उद्या ही समस्या आपल्या नियंत्रणाबाहेर जाईल. कदाचित महाराष्ट्रही 'उडता' राज्य म्हणून कुप्रसिद्ध होईल. अमली पदार्थांविरुद्धची लढाई पोलिस व अन्य तपास यंत्रणांची तर आहेच. ती सरकारचीही आहे. सर्वांत महत्त्वाचे ती समाजाची लढाई आहे. कारण समाजाचे भवितव्य पणाला लागले आहे. अख्खी युवा पिढी नासवणारे हे व्यसन आहे आणि भविष्यातल्या अनेक पिढ्या नासवण्याची क्षमता त्यात आहे. त्यामुळे ड्रग्जविरुद्धची ही लढाई कायदेशीर यंत्रणांखेरीज प्रत्येक घरात, प्रत्येक मनात लढली गेली पाहिजे. समाजाच्या नसांमध्ये हा कॅन्सर शिरत असताना इतर कुणीही आपले घर, आपला मुलगा-मुलगी यांना वाचवायला येणार नाही आणि काही विपरीत घडले तर आपण कुणालाही दोष देऊ शकणार नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. ▮

## आंतरराष्ट्रीय

# वाटाघाटी फिसकटल्या, पुन्हा संघर्ष?

प्रा. जयसिंग यादव

अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चा संपल्यामुळे शस्त्रसंधी कधीही संपुष्टात येऊ शकते. त्यामुळे इराणमध्ये पुन्हा एकदा विद्ध्वंस होऊ शकतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, 'इराणने करार केला नाही, तर त्याचे परिणाम गंभीर असतील,' असा इशारा यापूर्वीच दिला होता. आता दोन्ही देशांमधील चर्चा अयशस्वी झाल्यामुळे अमेरिका शस्त्रसंधी मोडण्यास विलंब करणार नाही, हे स्पष्ट झाले. इस्लामाबादमधील बैठकीने अनेक प्रश्न निर्माण केले. अमेरिकेचे उपाध्यक्ष व्हान्स आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अराघची यांच्यातील वाद तसेच इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी युद्ध सुरू ठेवण्याचा घेतलेला निर्णय या घडामोडींमुळे शांतता प्रक्रियेपुढेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. इस्लामाबाद चर्चा अयशस्वी ठरल्यानंतर व्हान्स यांनी स्पष्ट केले की इराण अमेरिकेच्या अटी स्वीकारण्यास तयार नसल्यामुळे अमेरिका माघार घेत आहे. या पृष्ठभूमीवर, अमेरिका आपले हल्ले अधिक तीव्र करू शकते. अणु ठिकाणांवरील हल्ल्यांपासून जमिनीवरील कारवायांपर्यंत, अमेरिका इराणला प्रत्येक आघाडीवर घेरण्याचा प्रयत्न करेल. अमेरिकेने आधीच इराणच्या वीज प्रकल्पांवर नजर रोखली आहे आणि आता त्यांना संधी मिळाली आहे.

अलिकडेच ट्रम्प यांनी स्पष्ट केले की इस्लामाबादमधील चर्चा अयशस्वी झाल्यास अमेरिका हल्ला करण्यास तयार आहे. 'न्यू यॉर्क पोस्ट'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये ट्रम्प यांनी सांगितले, की अमेरिकेच्या युद्धनौकांवर अत्याधुनिक आणि प्रगत शस्त्रास्त्रांचा वेगाने साठा केला जात आहे, जेणेकरून गरज पडल्यास इराणवर हवाई हल्ले करता येतील. त्यांनी हेही स्पष्ट केले, की या शस्त्रांचा अत्यंत प्रभावी वापर केला जाईल आणि त्यामुळे इराणचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यांनी इराणी संस्कृती नष्ट करण्याचीही धमकी दिली असून वीज प्रकल्प, पूल आणि इतर पायाभूत सुविधांवर हल्ले करण्याचे संकेत दिले आहेत. आता होर्मुज सामुद्रधुनीवरील संघर्ष जागतिक परिणामांसह आणखी तीव्र होऊ शकतो. ट्रम्प यांनी सांगितले, की अमेरिकन सैन्याने आपला दारूगोळा पुन्हा भरला असून ते हल्ल्यासाठी सज्ज आहेत. खरा करार होत नाही, तोपर्यंत सर्व सैन्य इराणजवळच तैनात राहील. दरम्यान, इराणने होर्मुज सामुद्रधुनी उघडण्यास स्पष्टपणे नकार दिला, हे लक्षात घ्यायला हवे, कारण या मुद्द्यावरच यापुढील संघर्ष वाढणार आहे. दरम्यान, लेबनॉनमध्ये विनाशाचे चित्र अधिक गडद होत आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना युद्धविराम नकोच होता. त्यामुळे त्यांनी लेबनॉनमधील हल्ले सुरूच ठेवले. लेबनॉनमधील हल्ले थांबवावेत, ही इराणची अट होती; परंतु ती मान्य करण्यात आली नाही. अलिकडेच दक्षिण लेबनॉनमध्ये इस्रायली हल्ल्यांमध्ये किमान १८ जण ठार झाले. इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात गेल्या महिन्यापासून सुरू असलेल्या संघर्षातील मृतांचा आकडा दोन हजारांच्या पुढे गेला आहे.

याच सुमारास अमेरिकेतील 'मागा' समर्थकांमध्येही डोनाल्ड ट्रम्प यांची लोकप्रियता कमी होत असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे शांततेसाठी पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि मध्यावधी निवडणुकांमध्ये समर्थकांचे विभाजन टाळण्यासाठी त्यांनी वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला होता; परंतु त्यात अपेक्षेप्रमाणे काहीच हाती लागले नाही. वाटाघाटींमध्ये गुंतवून प्रत्यक्षात युद्धाची जय्यत तयारी करायची, हा ट्रम्प यांचा डाव असू शकतो, असा अंदाज होताच. या प्रक्रियेमागे अमेरिकेच्या अध्यक्षांचा एक मोठा कट आहे. त्याद्वारे इराणचे युरेनियम जप्त करणे आणि त्यांचा बॅलिस्टिक कार्यक्रम नष्ट करणे समाविष्ट आहे. ४० दिवसांच्या युद्धानंतर ट्रम्प आणि त्यांच्या कमांडरांच्या लक्षात आले आहे की, ते केवळ हवाई हल्ल्यांनी इराणमध्ये काहीही साध्य करू शकत नाहीत. इराणची संपूर्ण लष्करी पायाभूत सुविधा पर्वतांखाली बांधलेल्या बोगद्यांमध्ये आहे. इथेच इराणची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि असेम्ब्ली लाईन्स आहे. त्यांना कोणताही अमेरिकन बॉम्ब नष्ट करू शकत नाही. अशा परिस्थितीत, जमिनीवरील कारवाई हा ट्रम्प यांच्यापुढील शेवटचा उपाय आहे. तथापि, इराणच्या पर्वतांखाली शेकडो फूट खोल बांधलेल्या बोगद्यांमध्ये उतरणे आत्महत्येसारखेच ठरेल. इराणने झाग्रोस पर्वतांखाली अनेक बॅलिस्टिक मिसाईल शहरे बांधली आहेत, जी हवाई हल्ल्याने नष्ट करणे अत्यंत कठीण आहे.



वाटाघाटींमधून कोणताही तोडगा न निघाल्याने अमेरिका जमिनीवरील कारवाई सुरू करू शकते; परंतु ही कारवाई अत्यंत कठीण असेल. ही मिसाईल सिटी एखाद्या भुलभुलैयापेक्षा कमी नाहीत. येथे प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठी असंख्य दरवाजे आहेत आणि इराणी सैन्याने त्यांना मोठ्या प्रमाणात तटबंदीने सुरक्षित केले आहे. मिसाईल सिटीमध्ये सर्वत्र मोठ्या संख्येने इराणी सैनिक तैनात आहेत. त्यामुळे कोणाच्याही लक्षात न येता आत घुसणे अत्यंत कठीण आहे. मिसाईल सिटीच्या अनेक भागांमध्ये सुरुंग आणि ट्रिप-वायर बसवण्यात आले आहेत, जे केवळ घुसखोरांना अडकवण्यासाठीच तयार केले आहेत. जेणेकरून, ते चुकीच्या दिशेने गेले, तर ते तत्काळ मारले जातील. शिवाय, बोगद्यांमध्ये विषारी वायूंनी भरलेल्या वायुवीजन प्रणाली बसवण्यात आल्या आहेत. बोगद्याच्या कोणत्याही भागात घुसखोरी झाल्यास वायुवीजन प्रणाली बंद केली जाईल, ज्यामुळे विषारी वायू बाहेर पडून सर्व घुसखोर मारले जातील. हे अडथळे पार केल्यावरच बोगद्याच्या त्या भागात पोहोचता येते, जिथे मोठ्या प्रमाणात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन ठेवलेले आहेत. ट्रम्प यांच्यासोबत नुकत्याच झालेल्या बैठकीनंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी माध्यमांना सांगितले की २००३ मध्ये लिबियासोबत झालेल्या करारासारखाच करार त्यांना इराणसोबत करायचा आहे. नेतान्याहू यांचे हे विधान अमेरिकेचे रिपब्लिकन सिनेटर टॉम कॉटन यांच्या पूर्वीच्या विधानांशी मिळतेजुळते आहे. या करारानुसार, लिबियाची राजधानी त्रिपोलीने आपला अणुकार्यक्रम पूर्णपणे आणि कायमस्वरूपी बंद केला होता.

इराणसाठी ट्रम्प यांच्या योजना वेगळ्याच आहेत. अमेरिका आणि इस्रायल या मोहिमेत गुंतले आहेत. इराणने अमेरिकेचे लिबिया मॉडेल स्वीकारले, तर त्याला आपला अणुकार्यक्रम स्वेच्छेने बंद करावा लागेल. इराणला आपले समृद्ध युरेनियम आणि शस्त्रे सोपवावी लागतील. भविष्यात इराणला आपला अणुकार्यक्रम पुन्हा सुरू करण्याची कधीही परवानगी दिली जाणार नाही. लिबियन मॉडेलनुसार, आंतरराष्ट्रीय संस्थांना तपासणी करण्याची परवानगी दिली जाईल. याचा अर्थ असा की, अणुचाचण्या होत आहेत की नाही हे ठरवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्था इराणमध्ये जाऊन तपासणी करू शकतात. ते स्वीकारले, तर इराणला अणुकार्यक्रम बंद करण्याच्या बदल्यात आर्थिक मदत मिळेल. इराणला आंतरराष्ट्रीय निर्बंधांमधून पूर्णपणे सूट मिळेल. येथे आश्चर्यकारक गोष्ट ही आहे, की २००३ मध्ये लिबियाचे नेते गद्दाफी यांनी आपला अणुकार्यक्रम बंद करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाला सहमती दर्शवली होती. अणुकार्यक्रम बंद केल्यानंतर गद्दाफी यांची हत्या करण्यात आली. गद्दाफी यांचे जवळचे सहकारी कबूल करतात की अणुकार्यक्रम बंद करणे ही गद्दाफी यांची चूक होती. या पृष्ठभूमीवर इराणने लिबिया मॉडेल स्वीकारण्यास नकार दिला. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी अयशस्वी ठरलेल्या वाटाघाटींसाठी इराणला दोषी धरले. तब्बल २१ तास चाललेल्या चर्चेनंतरही कोणताही तोडगा निघाला नाही आणि शांतता चर्चा कोलमडल्यावर व्हान्स अमेरिकेला परतले. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी स्पष्ट केले की कोणतीही चर्चा यशस्वी होण्यासाठी दोन्ही बाजूंची प्रामाणिकता आणि संतुलित भूमिका आवश्यक असते आणि तीच येथे दिसली नाही. पहिली अट होती होर्मुज सामुद्रधुनी उघडण्याची. अमेरिकेने हा महत्त्वाचा समुद्री मार्ग खुला ठेवण्याची मागणी केली; मात्र इराणच्या मते या मार्गावर त्यांचा हक्क मान्य केला गेला पाहिजे. ऊर्जा पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याची रणनीती असल्याने इराणने ही अट ठामपणे नाकारली. दुसरी अट होती युरेनियमचा साठा कमी करण्याची. अमेरिकेने इराणला सुमारे ४०० किलो युरेनियम काढून टाकण्यास सांगितले. अमेरिका इराणचा अणुकार्यक्रम पूर्णपणे मर्यादित करू इच्छिते, तर इराणचा दावा आहे, की अणु संशोधन हा त्यांचा सार्वभौम अधिकार आहे. त्यांनी अणुबॉम्ब तयार करणार नसल्याचे सांगितले असले, तरी युरेनियम संवर्धनाचा कार्यक्रम सोडण्यास ते तयार नाहीत. हा मुद्दा सर्वात मोठा वादाचा केंद्रबिंदू ठरला. या मुद्द्यांमुळे चर्चेचा तिढा सुटू शकला नाही. एकूणच, या अपयशी वाटाघाटींनी केवळ एक राजनैतिक संधी गमावली नाही, तर ऊर्जा पुरवठा, जागतिक व्यापार आणि प्रादेशिक स्थैर्य यांवर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आता संवाद पुन्हा सुरू होतो की संघर्ष अधिक तीव्र होतो, हे येणारा काळच ठरवेल. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# दुष्काळाचे भाग्यविधाता!

जे माझे नाही, तरीही ते मला सहज मिळते. पण हावरटपणा इतका वाढला की, ते सगळंच ओरबडून घेण्यापर्यंत आमची मानसिकता गेली. मग काय? आज निसर्गावरही आम्ही वरचढ झालो. कदाचित निसर्गावर विजय मिळविल्याच्या क्षणिक आनंदात 'माणूस' आज आपल्याच कृतीचे भविष्यात होणारे दुष्परिणाम दुर्लक्षित करून समाधानाने जगतही असेल, परंतु येणारी पिढी 'त्या' परिणामांची 'भोगी' ठरेल हे नक्की! भूगर्भ कोरडा पडतो आहे. दुष्परिणाम डोळ्यापुढे आहेत. पण माणूस निसर्गाची ही देगणी त्याच्या मालकीची असल्यागत वागून स्वतःसाठी भविष्याच्या दुष्काळाची तजवीज करतो आहे. म्हणजेच आम्हीच आमच्या दुष्काळाचे भाग्यविधाता ठरू! महाराष्ट्र समृद्ध आहे. सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिक अशा सर्व बाबतीत महाराष्ट्राची समृद्धी अधोरेखित झाली आहे. निसर्गानेही महाराष्ट्राला भरभरून दिले. निसर्गाचे जे सौंदर्य पाहण्यासाठी लक्षावधी रुपये खर्च करून बाहेर जावे लागते, अशा अनेक सौंदर्यांनी महाराष्ट्र नटला आहे. याच महाराष्ट्रात निसर्गाची एक वेगळी कृपादृष्टी आहे. महाराष्ट्रात १००० ते १२०० मिली मीटर एवढे सरासरी पर्जन्यमान होते. पावसाळ्यात पडणारा हा पाऊस पाहिला तर अख्खा महाराष्ट्र ओलाचिंब करून टाकणारा आहे. पण तरीही आज महाराष्ट्रातील दुष्काळ संपत नाही, हे वास्तव आहे. महाराष्ट्रातील काही भागांची ओळखच दुष्काळी भाग म्हणून होत असेल तर आम्हीही आमच्या व्यवहारांचा, कृतींचा विचार करायला नको का?

निसर्गाने दिले, पण आपण ते किती टिकवितो यावर कधी कुणी मंथन केले आहे का? आज महाराष्ट्रातील एक दोन जिल्ह्यांची नव्हे तर बहुतांश जिल्ह्यांतील भूजलपातळी सातत्याने कमी होत आहे. आज महाराष्ट्रातील भूजल तणावाखाली आले आहे, याचा सांगोपांग विचार केलाच जायला हवा! खरं तर भूजलावर म्हणजे भूगर्भातील पाण्यावर तुमचा किती अधिकार आहे? तर तो शून्यच म्हणावा लागेल. ती तुमची मालकी नाही किंवा त्यासाठी तुम्ही पैसेही मोजत नाही. मान्य आहे, भूजलाचा उपसा करण्यासाठी असलेल्या साधनांची निर्मिती करण्यावर तुम्ही पैसे खर्च करता, म्हणून भूजल तुमच्या मालकीचे होत नाही. पण तरीही आज आपला मालकी हक्क असल्यागत कोणत्याही नियोजनाशिवाय आणि अवास्तव होत असलेला पाण्याचा वापर भविष्यातील संकटाची नांदी ठरत आहे. महाराष्ट्रातील भूजलापैकी ७५ टक्के पाणी हे सिंचनासाठी आणि ८५ टक्क्यांच्या आसपास ग्रामीण भागात पिण्यासाठी वापरले जाते. हे करताना अनियंत्रित उपसा आणि न होणारे पुनर्भरण निसर्गदत्त संपत्तीला संपविण्याचे काम करत आहे. वाढती विंधन विहिरींची संख्या, त्यासाठी असलेल्या नियमांना दिली जाणारी तिलांजली याचा परिपाक म्हणून आज ४०० फुटाहून अधिक खोदूनही विंधन विहिरीला पाणी लागत नाही. आम्ही जमिनीला पोखरतो आहे, पण तिच्या वास्तवाचे भान विसरलो हे तेवढेच खरे!

आज महाराष्ट्रातील ४२.५ टक्के भाग हा पाणी टंचाईग्रस्त म्हणजे दुष्काळप्रवण म्हणून ओळखला जातो. दरवर्षी राज्यात भूजल पातळी ३ ते ४ टक्क्यांनी घटत आहे. आज काही भाग असा आहे, जेथे ७०० ते ९०० फुटापर्यंत खोदूनही पाण्याचा एक थेंब बाहेर पडत नाही. एवढं होऊनही जर आमची ओरबडणारी मानसिकता बदलणार नसेल, तर भविष्यातील जलसंकटाची ही नांदीच म्हणावी लागेल. ज्यावर तुमचा काहीही अधिकार नाही, त्याची मालकी असल्यागत वापरणाऱ्या बुद्धिजीवींनी कधी तरी तासन्तास ओंजळीने पाणी भरून एखादा पाण्याचा हंडा घरी घेऊन जाणाऱ्यांच्या समाधानात समाधान मानून बघा. माझ्या घरी आहे म्हणून वाटेल तेवढे पाणी रस्ता आणि घराचा पोर्च धुण्यासाठी वाया घालविताना जरा शेजारी पाण्यासाठी चिंतेत असलेल्यांची व्यथा जाणून घेण्याचे सौजन्य दाखवा. आज आहे म्हणून अपव्यय करायचा आणि नाही म्हणून रडगाणे गात बसण्यापेक्षा असलेले उपाय प्रत्यक्षात उतरविण्याची गरज आहे. जलपुनर्भरणा म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रयोग किती जण करतात, हा प्रश्नच आहे? निसर्ग तुम्हाला पाऊस पाडून संधी देतो. मात्र त्या संधीचे सोने करण्याची बुद्धीच आमच्याजवळ नाही. नियम, कायदे सर्व काही आहेत. त्याच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणाही आहे. पण त्या यंत्रणेतील अधिकाऱ्यांनाही कदाचित अजूनपर्यंत पाणीटंचाईची झळ पोहचली नसावी. म्हणून प्रशासनही निर्विकार आहे. पाण्याच्या उपशावर प्रशासनाचे नियंत्रण नाही. काहीही घेणेदेणे नसल्यागत व्यवहार सुरू आहेत. अनेक वास्तू उभ्या होतात. जलपुनर्भरणाचा केवळ कागदोपत्री संकल्प सोडला जातो. आज आम्हाला मिळते आहे, म्हणून पाणी मुबलक वाटते. पण दिवसेंदिवस घटत चाललेली पाण्याची पातळी भविष्यात समृद्ध महाराष्ट्राला कधी वाळवंट बनवेल, याचा नेम नाही. अशावेळी भूजल आमच्या मालकीचे हा गैरसमज खोटा ठरेल, यंत्रणाही निष्प्रभ ठरतील आणि हतबल झालेला निसर्ग आपल्याला वाकुल्या दाखवीत असेल! ▮

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# सप्त चिरंजीव

प्रा. दिलीप जोशी

आपल्या हिंदू धर्मग्रंथात सप्त चिरंजीव सांगितले आहेत.

**अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च विभीषणः।**
**कृपः परशुरामश्च सप्तैते चिरंजीविनः॥**

अश्वत्थामा, बळीराजा, महर्षी व्यास, महाबली हनुमान, लंकापती बिभीषण, कृपाचार्य आणि परशुराम हे सप्त चिरंजीव आहेत. चिरंजीवित्व दोन अर्थांनी घेता येते. एक म्हणजे दिव्य शक्ती, वरदान किंवा शाप यामुळे ज्यांचे वास्तव्य भूतलावर कायम आहे त्यांना चिरंजीव म्हणतात. हिंदू धर्मात ही श्रद्धा सर्वत्र आहे.

दुसरा प्रकार म्हणजे ज्यांनी आपले कार्यकर्तृत्व, शाश्वत विचार यांची कधीही न मिटणारी छाप मानवी मनावर कायम उमटवली. ते त्यांच्या कार्यप्रभावाने चिरंजीव झालेत.

ज्याची जी क्षमता त्यानुसार त्यांनी त्यांनी तसा अर्थबोध घ्या, पण भूतलावर हे सप्त चिरंजीव असल्याचे आपण मानतो. मग ते स्थुल शरीराने भूतलावर आहेत असे मानणारा एक वर्ग किंवा कर्तृत्व शरीराने भूतलावर आहेत असेही मानणारा एक वर्ग आहे. चिरंजीव त्यांना म्हणतात ज्यांच्या मृत्यूचा कुठेही उल्लेख नाही असाही प्रघात आहे. चिरंजीव म्हणजे लोकांच्या मनात जे जिवंत आहेत.

चिरंजीव म्हणजे ते अमर नाहीत पण त्यांना हजारो वर्षांचे आयुष्य आहे म्हणजे जे दीर्घायु आहेत किंवा कलियुग संपेपर्यंत ज्यांचे आयुष्य आहे त्यांना चिरंजीव म्हणतात.

संत एकनाथांनी चिरंजीव पद नावाचे पद लिहिले त्यानुसार चिरंजीव म्हणजे अविनाशी मोक्षसुख. ज्यांनी अनुताप म्हणजे झालेल्या चुकांचा पश्चात्ताप करून इष्टमार्गक्रमण केले. देहविषयक सुखाची लालसा सोडली, मृत्यू शाश्वत सत्य असल्याची नित्य जाणीव ठेवत वागले. ज्यांनी शास्त्रसंमत शरणागती पत्करली. ते चिरंजीव असो.

सप्त चिरंजीवांबाबत काही गोष्टी चर्चेत असतात. जसे-

अश्वत्थामा किंवा भगवान परशुराम यांनी दर्शन दिल्याच्या, अनुभूती दिल्याच्या कथा नर्मदा परिक्रमा करणाऱ्या अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळतात. रामकथेच्या प्रसंगी हनुमंतरायाचे विशेष आसन ठेवतात. ते रोज कथा ऐकायला येतात हा आपला दृढविश्वास आहे. थोडक्यात सप्त चिरंजीव आजही भारतभूमीवर असल्याची आपली श्रद्धा आहे.

अश्वत्थामा यांनी युद्धप्रसंगी केलेले दुष्कृत्य आणि त्यामुळे भळभळणारी जखम कपाळी घेऊन कलियुग संपेपर्यंत यातनामय जीवन जगण्याचा शाप भगवान श्रीकृष्णांनी दिल्यामुळे तो शापित चिरंजीव ठरला आहे. महापराक्रमी पित्याचा पराक्रमी मुलगा असून भ्रूणहत्येचे पातक केल्यामुळे परमेश्वराने कठोर शिक्षा देऊन लोकांना अश्वत्थामा आणि त्यांचे पापकर्म कायम लक्षात ठेवण्यासाठी त्याच्या स्मृती चिरंजीव ठेवल्या. अश्वत्थामा आजही भूतलावर असल्याची आपली श्रद्धा आहे.

दुसरा चिरंजीव म्हणजे बळीराजा. राक्षस कुळातील असला तरी भक्तश्रेष्ठ प्रल्हादाचा नातू होता. त्यामुळे यज्ञादी कर्मामुळे इंद्राची गादीच धोक्यात आल्यामुळे देवतांच्या विनंतीवरून भगवान विष्णूंनी वामन अवतार घेतला आणि बळीराजाला तीन पाऊले जमीन दानात मागितली. त्यात तिसरे पाऊल त्याच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळात पाठविले. तेथेच त्याला कायम निवास दिला. बळीराजाची दानशूर वृत्ती, परमेश्वराप्रति निष्ठा लोकमनावर कायम कोरली जावी म्हणून बळीराजाला प्रासादिक चिरंजीवित्व श्रीहरी विष्णू कृपेने प्राप्त झाले. बळीप्रतिपदेला आजही प्रत्येक घरी बळीराणा मांडण्याची प्रथा आहे. रक्षाबंधनाला 'येन बद्धो बळीराजा, दानवेंद्रो महाबला:' हा मंत्र कायम स्मरण देतो.

महर्षी व्यास यांनी वेद, पुराणादी वाङ्मय निर्माण करून 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वं' हा बहुमान मिळवला. त्यामुळे ते सर्वांचेच मोक्षगुरू ठरले. व्यास पौर्णिमेला त्यांचे स्मरण सर्वत्र होते. त्यांचा ठसा कायम आहे म्हणून त्यांना पदेन चिरंजीवित्व मिळाले. भगवान वेदव्यास सर्वांचे आद्यगुरू असून 'केशवं बादरायणम्' म्हणत त्यांना पुन्हा पुन्हा वंदन केले जाते.

भगवान हनुमान यांना स्वत: सीतामाईंनी चिरंजीवित्व प्रदान केले. त्यामुळे हनुमंतराय कृपापात्र चिरंजीव आहेत. त्यांना तर संकटमोचक म्हणून लोकमानसात अढळ स्थान आहे. आसेतुहिमाचल गावागावात ज्यांची मंदिरे आहेत ते एकमेव मारुतीराय आहेत.

बिभीषण यांचेही स्थान ध्रुवस्थान आहे. राक्षस कुळात जन्मास येऊनही "देवाच्या सख्यत्वासाठी, पडाव्या जीवलगांच्या तुटी, सर्वकाही वेचावे शेवटी, प्राण तो ही वेचावा" हे तंतोतंत बिभीषण महाशयांना लागू पडते. म्हणूनच भगवान श्रीरामांनी त्यांना चिरंजीवी भवचा आशीर्वाद दिला. कृपाचार्य यांनाही चिरंजीव पद प्राप्त आहे. महर्षी शरद्वान यांचे पुत्र असलेले कृपाचार्य कुरुवंशाचे कुलगुरू होते. कठोर तपश्चर्येच्या योगाने भगवान विष्णूंनी त्यांना चिरंजीवित्व प्रदान केले. भगवान परशुराम देखील चिरंजीव आहेत. ते तर स्वत: विष्णूचे अवतार आहेतच पण ते राम अवतार, कृष्ण अवतार, बौद्ध अवतार आणि पुढे कल्की अवतारापर्यंत असणार आहेत. महापराक्रमी भगवान परशुराम म्हणजे जमदग्नी ऋषी आणि रेणुका मातेचे पुत्र. कल्की अवताराचे मार्गदर्शन केल्यानंतर कलियुगाचा अंत होईपर्यंत त्यांना चिरंजीवित्व आहे. अन्यायाविरुद्धचा त्यांचा लढा, एकविस वेळा दुष्टशक्तीचा नि:पात आणि महापराक्रमी योद्ध्यांचे गुरू यामुळे ते अजरामर झालेत.

याच मालिकेत मार्कंडेय ऋषींचेही नाव घेतले जाते. सप्त चिरंजीव त्यांच्या कार्यामुळे, पराक्रमामुळे चिरंजीव झालेत. त्यांची अनुभूती आजही येते. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### हिंदू मुलींनी सदैव सतर्क राहावे

आपला हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती म्हणजे संस्कारांच्या सुंदर शिदोरीचा अमूल्य ठेवा. वर्षभर साजरे होणारे आपले पारंपरिक देखणे, अनुकरणीय सण देखील परंपरेची मोठी शिकवण देत असतात. यातून होणारे हिंदू घरातील हिंदुत्ववादी संस्कार मोलाचे ठरत असतानाच, दुसरीकडे लव्ह जिहादचा भयाण हिरवा अजगर हिंदू मुलींना अलगद फसवून त्यांच्या भोवती विषारी विळखा घालीत आहे. आता तर हे घाणेरडे हिरवे लोण कॉर्पोरेट सेक्टरपर्यंत येऊन धडकलेय हे मोठे दुर्दैवच. पण हे लोण का वाढले? याचे हिंदूंनी देखील आत्मचिंतन केले पाहिजे.

मुळात आपले थोर हिंदू संस्कार आपल्याच हिंदू मुलींवर ठामपणे बिंबवण्यात आपणच तर घरातून कुठे तरी कमी पडतोय का? बाहेरची समाजातील वाईट संगत हा तर नंतरचा विषय. मुळात हिंदुत्ववादी भगवी कट्टरता हिंदू मुलींच्या कोमल मनावर ठासून बिंबवली तर कुठल्याही परधर्मीय मुलांच्या ढोंगी प्रेमातून, धर्मांतराच्या आमिषाला हिंदू मुली बळी पडणारच नाहीत. माझ्या हिंदू धर्मासारखा थोर धर्म नाही ही एकदा का मनाशी खूणगाठ बांधली गेली तर फोफावत चाललेला हिरवा लव्ह जिहाद ठेचायला फारसा वेळ लागणार नाही. सोशल मीडिया वापरताना हिंदू मुलींनी सदैव सतर्क राहणे महत्त्वाचे आहे.

**आनंद बेंद्रे**/पुणे

●● ●●

### ज्वारी उत्पादन वाढवण्याची गरज

एकेकाळी मोठ्या प्रमाणावर घेतली जाणारी ज्वारी आता कमी होत चालली असून, तिच्या दरात मोठी वाढ झाली आहे. मार्केटमध्ये ज्वारीकरिता ग्राहकांची गर्दी होत असे. सध्या ज्वारीचे दर ४० ते ४५ रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. गहू २०-२२ रुपये किलोला उपलब्ध असल्याने सर्वसामान्यांचा कल गव्हाकडे वळत आहे. पूर्वी दगडी, गोटी, मालदांडी यासारख्या ज्वारीच्या जाती शेतकरी मोठ्या प्रमाणात घेत होते. त्या जाती खाण्यास चवदार होत्या. मात्र गेल्या काही वर्षांत शेतकरी नगदी पिकांकडे वळल्याने ज्वारीचे उत्पादन घटले आहे. परिणामी मागणी वाढून ज्वारी महागली आहे. दूध मोगरा ही जात नवीन आहे. ती पांढरी शुभ्र असते व दिसायला चमकदार आहे. तर मालदांडी, गोटी, दगडी या ज्वारी जातीच्या भाकरी चवदार व पौष्टिक आहेत, असे ज्येष्ठ ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सरकारकडून रेशनवर स्वस्त दरात गहू उपलब्ध होत असल्याने नागरिक ज्वारीऐवजी गहू वापरण्याकडे वळले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील पारंपरिक भाकरीची जागा हळूहळू चपातीने घेतली आहे. ज्वारीची भाकरी पचायला हलकी व पौष्टिक मानली जाते. मात्र वाढत्या किमतीमुळे रोजच्या वापरात सर्वसामान्यांकडून मर्यादा येत आहेत.

ज्वारीची भाकरी अत्यंत पौष्टिक असून, त्यामध्ये फायबर, लोह आणि आवश्यक खनिजे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे पचन सुधारते व शरीराला दीर्घकाळ ऊर्जा मिळते. चपातीच्या तुलनेत भाकरी पचायला हलकी असून, मधुमेह आणि लठ्ठपणा नियंत्रणात ठेवण्यासाठीही उपयुक्त आहे. संतुलित आहारासाठी ज्वारीसारख्या धान्याचा समावेश आवश्यक आहे आहाततज्ज्ञ सांगतात. ज्वारीच्या वाढत्या किमतीमुळे विक्री कमी होत असून, गव्हाचा वापर वाढला आहे. ही स्थिती बदलण्यासाठी ज्वारी उत्पादन वाढवण्याची गरज सर्वसामान्य नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

●● ●●

### वाढत्या उन्हासमोर आधुनिक यंत्रणा अपुऱ्या

सध्या राज्यभरात वाढत्या उन्हाचा कहर जाणवत आहे. तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढत असून, नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे. मात्र या सगळ्या परिस्थितीत एक वेगळी आणि गंभीर बाब समोर येत आहे. उन्हाच्या तीव्रतेसमोर आधुनिक यंत्रणाही आता कमी पडताना दिसत आहेत. एकेकाळी उष्णतेवर मात करण्यासाठी निसर्गाचे साधन वापरणारा माणूस आज पूर्णपणे यंत्रांवर अवलंबून झाला आहे. कूलर, पंखे, एअर कंडिशनर ही साधने जणू जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. पण वाढत्या तापमानामुळे हीच साधने आता अपुरी ठरत आहेत.

एसी सतत चालवूनही अपेक्षित थंडावा मिळत नाही, कूलर पाण्याअभावी निष्क्रिय ठरतात, तर विजेच्या लोडशेडिंगमुळे पंखेही थांबतात. ही परिस्थिती केवळ तांत्रिक मर्यादांची नाही, तर अतिवलंबित्वाची धोकादायक जाणीव करून देणारी आहे.

वीज पुरवठ्यावर वाढलेला ताण, उपकरणांचे वारंवार होणारे बिघाड, आणि वाढत्या मागणीमुळे निर्माण होणारा ताण या सर्व गोष्टी स्पष्ट करतात की आधुनिक यंत्रणा निसर्गाच्या प्रचंड शक्तीसमोर मर्यादित आहेत. यंत्रणा वापरणे चुकीचे नाही, पण त्यावर पूर्ण अवलंबून राहणे धोकादायक आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे, झाडे लावणे, पाण्याची योग्य व्यवस्था करणे आणि ऊर्जा बचतीकडे लक्ष देणे हीच खरी गरज आहे. प्रशासनानेही वीज व पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासोबतच जनजागृतीवर भर देणे आवश्यक आहे. ▮

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सकपाळ नगरातील जि.प. शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**लातूर दि. १४ एप्रिल-**
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सकपाळ नगर येथे साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे सुरुवातीस इ. चौथी वर्गातील विद्यार्थिनी मानसी शिंदे हिच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी पुष्प अर्पण करून, अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक किशोर शिंदे, प्रशिक्षिका कनिज फातेमा पठाण उपस्थित होत्या.



### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त झोन क्र. ४ च्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रभाग क्रमांक १८ चे नगरसेवक प्रशांत पल्ली यांच्यावतीने महापालिका विभागीय कार्यालय (झोन) क्रमांक ४ च्या कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. झोन क्रमांक ४ अंतर्गत गुरुनानक चौक येथील महानगरपालिकेचे कार्यालय तसेच उजनी कॉलनी येथील झोन कार्यालयातही जयंती मोठ्या उत्साहाने साजरी झाली. या सोहळ्याला झोन क्रमांक ४ चे झोन अधिकारी जगधनी, झोनचे कर्मचारी तसेच भाजप व्यापारी सेलचे अध्यक्ष मनोज पिस्के, भाजप ओबीसी सेलचे अध्यक्ष विजय महिंद्रकर, उद्योजक श्रीनिवास गुंडेली, सनी बगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



### श्री शिवजन्मोत्सव महामंडळाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पद्माकर नाना काळे, श्रीकांत डांगे, राजनभाऊ जाधव, मतीन बागवान, सुशील बनपट्टे, जयवंत सलगर, अंबादास शेळके, प्रकाश ननवरे, ब्रह्मदेव पवार, महादेव गवळी, जितू वाडेकर, जीवन यादव, सदाशिव पवार, दादा सुरवसे, नागेश वडणे, विजय भोईटे, नगरसेविका मृणाल गवळी, लक्ष्मण महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.




### लॉर्ड बुद्धा प्रतिष्ठान रिक्षा स्टॉपच्या वतीने जयंती साजरी

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती लॉर्ड बुद्धा प्रतिष्ठान रिक्षा स्टॉपच्या वतीने साजरी करण्यात आली. सर्व प्रथम रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक शहर अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेची पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रिक्षा स्टॉपचे अध्यक्ष करण गजधाने, उपाध्यक्ष अजय लोंडे, सचिव सुमीत बनसोडे, विजय भंडारे, अमर बडवणे, राजेश निंबाळकर, गपुळ देवकते, शोभा गंट्टी, आदी रिक्षा मालक चालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सुर्यदेवाचा कोप; सोलापूरचा पारा '४३ पार'!

**सकाळी १० ते ४ काळात उन्हाचे असह्य चटके**
**नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याची गरज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१४ एप्रिल-**
शहरासह जिल्ह्यात उन्हाचा तडाखा तीव्र झाला असून, आज मंगळवारी (दि. १४) तापमानाने यंदाचा उच्चांक गाठला आहे. आजचे कमाल तापमान ४३.२ अंश सेल्सियस इतके नोंदवले गेले असून, वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. कोरड्या हवेमुळे (आर्द्रता २५%) अंगाची लाहीलाही होत असून, दुपारच्या वेळी रस्ते ओस पडू लागले आहेत. यामुळे शहर-जिल्ह्यातील नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.



हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका वाढला असून, प्रशासनाने नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. उन्हाचा तडाखा आणि वाढते तापमान लक्षात घेता आरोग्य विभागाने काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यामध्ये तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३ ते ४ लिटर पाणी प्यावे, लिंबू सरबत, ताक, लस्सी किंवा शहाळ्याचे पाणी घेतल्यास शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकून राहते. दुपारची वेळी उन्हात फिरणे टाळावे. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नका. बाहेर जाताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे वापरा. गडद रंगाचे आणि सिंथेटिक कपडे उष्णता शोषून घेतात, त्यामुळे ते टाळावेत. दरम्यान, चक्कर येणे, मळमळणे, डोकेदुखी किंवा जास्त घाम येणे ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. असे वाटल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्या आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असेही आवाहन करण्यात आले आहे. तर उन्हाळ्यात पचायला हलके अन्न घ्या. जास्त तेलकट, तिखट आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा. ताज्या फळांचा आहारात समावेश करावा.

लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि गरोदर महिलांनी उष्णतेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. मुक्या प्राण्यांसाठी आणि पक्ष्यांसाठी गॅलरीत किंवा अंगणात पाण्याची सोय नक्की करा. एकंदरीत, सोलापूरसह राज्यात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत चालला असून, यामुळे सोलापूरचे नागरिक अक्षरशः घामाघूम झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

आजची आकडेवारी पाहता उन्हाच्या तीव्रतेने यंदाचा हा उच्चांक गाठला आहे. राज्यातील सर्वात उष्ण शहर म्हणून ओळख असलेल्या सोलापूरमध्ये उन्हाचा तडाखा आता असह्य होऊ लागला आहे. तर हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील आठवडाभर उष्णतेची ही लाट कायम राहण्याची शक्यता आहे.



### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आरोग्यसेवेचा नवा आदर्श : महापौर विनायक कोंडयाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाने सामाजिक बांधिलकीचा आदर्श जपला आहे. मोफत आरोग्य शिबिर ही आजच्या काळाची गरज असून अशा उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळतो. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंडयाल यांनी केले.

श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयाच्या गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागाच्या वतीने पोट, आतडे, लिव्हर व पचनसंस्थेशी संबंधित आजारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे प्रभावी आयोजनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, चेअरमन डॉ. माणिक गुर्रम, संचालक डॉ. विजयकुमार आरकाल, अशोक आडम, लक्ष्मीनारायण कुचन, रायेशम येमुल, मनोहर अन्नलदास, पार्वतय्या श्रीराम, कमटम, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, किसन श्रीराम, डॉ. श्रीकांत माकम, डॉ. अभिजीत चिंचोली आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच श्री मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

### भीम जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धेत ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**डॉ. सचिन खरात यांनी थेट केले चित्रकला प्रात्यक्षिक सादरीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळ व चित्रस्पर्श कलाविहार यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ला बगीचा येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीतील ३०० स्पर्धकांनी आपली कलाकृती सादर केली. डॉ. आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या जीवनातील एक प्रसंग हा स्पर्धेचा विषय होता.



विशेष म्हणजे, ख्यातनाम चित्रकार डॉ. सचिन खरात यांचे नाव ऐकून पुण्याहून एक पालक आपल्या मुलींना घेऊन खास स्पर्धेसाठी उपस्थित राहिले होते. महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पर्धास्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना महापुरुषांचे विचार समजून घेण्याची प्रेरणा मिळते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना विविध माध्यमांतून अभ्यास करण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. सचिन खरात यांनी थेट चित्रकला सादरीकरण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या लाईव्ह डेमोमुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. मी कोणाचा? मी सर्वांचा... ही संकल्पना घेऊन त्यांनी डॉ. आंबेडकर यांचे चित्र साकारले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासनाधिकारी मल्हारी माने, महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे यांची उपस्थिती लाभली. यासाठी पर्यवेक्षक सुरेश कासार व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये सामाजिक समतेचा संदेश; फुले-आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे सामाजिक न्यायाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच महान समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी स्वतंत्रपणे विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यावर आधारित मनोगते व विचार मांडले. सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव संजय नवले यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात महात्मा फुले यांच्या शिक्षणप्रेमी व स्त्रीशिक्षणातील योगदानाचा गौरव करत विद्यार्थ्यांना समता, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली अर्पण करून झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्याला अभिवादन केले.




दोन्ही कार्यक्रम सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज आणि एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात साजरे झाले. यावेळी शौर्य नवले, प्रसन्न रत्नाकर, यशोदीप शिंदे आदी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. यावेळेस सिंहगडच्या सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. एस एच पवार, पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख , उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, ग्रंथपाल जी. एच. घोगले, विद्यानंद बाबर, क्लर्क नवनाथ भडंगे, जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे, कर्मचारी सचिन भानवसे आदी उपस्थित होते.

### मार्डीच्या भिमरत्न प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
श्रीक्षेत्र मार्डी येथे भिमरत्न प्रतिष्ठानच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तथागत गौतम बुद्धांच्या मुर्तीला अभिवादन करून भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी भीमरत्न प्रतिष्ठानचे अध्यक्ष संकेत कटरमल, उपाध्यक्ष अजय नागटिळक यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना (उबाठा) चे शाखाप्रमुख विनोद जगताप, विशाल जगताप, नाना मस्के, लक्ष्मण शिंदे, राम शिंदे, अनिकेत नागटिळक, सुनील मस्के, पांडुरंग मस्के, सागर कांबळे, दशरथ कांबळे, गौतम कटरमल, बाळू सुरते, पिंटू सुरते उपस्थित होते. शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन पोलिस पाटील अमोल कदम यांनी केले. अनिकेत नागटिळक यांनी आभार मानले.





### समता सैनिक दलातर्फे डॉ. बाबासाहेबांना मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूरच्या वतीने बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर मानवंदना देण्यात आली.

समता सैनिक दलाच्या जीओसी सुमित्रा जाधव यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर समता सैनिक दलातील पुरुष व महिला सैनिकांच्या वतीने मानवंदना देऊन भीम गीत सादर करण्यात आले.

यावेळी समता सैनिक दलाचे ज्येष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर, महासचिव अनिल जगझाप, तसेच विठ्ठल थोरे , अंगद जेटीथोर, चंद्रकांत कोळेकर, बाळासाहेब मस्के , विनोद जाधव ,वर्षा जाधव ,प्रीती जाधव ,प्रीपोवेल जाधव, ज्ञानेश्वर प्रक्षाळे मुकुंद चंदनशिवे ,संभाजी तळभंडारे, रत्नदीप कांबळे ,सुचित्रा थोरे, सुनील डांगे, सुनिता गायकवाड, शांतीकुमार कांबळे, कुणाल जानराव ,अरुण भालेदार ,अंकुश बनसोडे, अशोक सिदगणेश, रेखा पात्रे, शिवकुमारी कांबळे ,कल्पना सुरवसे, अरुण गायकवाड, दिनेश सुरवसे, सुरज प्रक्षाळे, सविजेता जाधव, संविधा जाधव, सूर्यकांत शिवशरण, विजयकुमार शिरसागर, बी. एस. गायकवाड , एम. बी. कांबळे, चंद्रकांत गायकवाड, भारत मस्के, पोथलीकर आणि पुरुष व महिला सैनिक उपस्थित होते.

पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद जाधव यांनी परेड संचलन आदेश दिले.

## डॉ. बाबासाहेबांना सोलापुरात तीन वेळा मानपत्र प्रदान

### स्वतःच्या पायावर उन्नतीचा दिला क्रांतिकारी संदेश

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**
सोलापूर शहरात विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तीन वेळा सन्मानपूर्वक मानपत्र प्रदान करण्यात आले. प्रत्येक भेटी प्रसंगी त्यांनी क्रांतीकारी संदेश दिला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या-ज्यावेळी सोलापूरला आले, त्या सर्व घटना सोलापूरकरांसाठी स्फूर्तीदायी ठरल्या. सोलापूर शहरात नगरपालिकेच्या वतीने २ वेळा आणि तत्कालीन अस्पृश्य जनतेतर्फे एकदा असे तीन वेळा डॉ. बाबासाहेबांना थाटात मानपत्र अर्पण करण्यात आले. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सोलापूरशी अतूट ऋणानुबंध होता.सोलापूरकरांनी वेळोवेळी केलेला हा सन्मान केवळ एका महान व्यक्तिमत्त्वाचा गौरव नव्हे, तर त्यांच्या विचारांचा स्वीकार असल्याचेच यावरून स्पष्ट होते.



#### सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ सोलापुरात

येथील हरिभाई देवकरण हायस्कूलच्या कै. रा. ब. मुळे स्मारक मंदिरात दि. १४ जानेवारी १९४६ रोजी जिल्हा लोकल बोर्ड व नगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेबांना मानपत्र अर्पण करण्यात आले. तत्कालिन नगराध्यक्ष रावबहादुर नागप्पा अण्णा अब्दुलपूरकर यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करण्यात आले. तसेच जिल्हा लोकल बोर्डाचे मानपत्र तत्कालिन बोर्डाध्यक्ष जी. डी. साठे यांनी प्रदान केले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजूर मंत्री होते. सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ मी सोलापुरात रोवली, असे डॉक्टर आंबेडकर यांनी त्यावेळी अभिमानाने सांगितले. मजूरमंत्री या नात्याने मजुरांच्या हिताकडे अधिक लक्ष देत आहे. मजूरांच्या हिताचे दहा कायदे करीत आहोत. ज्यामुळे देशाचे सामाजिक व आर्थिक दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न असल्याचे डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

#### अस्पृश्य जनतेतर्फे गौरव सोहळा

सोलापूर येथील थोरला राजवाडा (सध्याचे मिलिंद नगर) २४ मे १९३२ रोजी तत्कालीन अस्पृश्य जनतेच्या वतीने प्रथमच डॉ. बाबासाहेबांना मनोभावे मानपत्र प्रदान करण्यात आले. बेंच मॅजिस्ट्रेट पापय्या बाबाजी बेलपवार यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. यावेळी म्युन्सिपल कौन्सिलर धर्माजी नरसु खरटमल, कौन्सिलर मोहनदास अन्याबा बाबरे, विश्राम जिना भंगी, पंढरी सखाराम बंदसोडे, सिद्राम बाबुराव जाधव, दत्तू तात्या सर्वगोड, नामदेव बुधाजी बंदसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. अस्पृश्यांनी स्वत:च्या पायावर सर्वांगीण उन्नती करावी, असा स्फूर्तीदायी मंत्र त्यावेळी डॉ. आंबेडकर यांनी उपस्थितांना दिला.

#### लोकशाहीत अतिरिक्त श्रद्धाळू वृत्ती मारक

भागवत चित्रमंदिर येथे १ जानेवारी १९३८ रोजी नगरपालिकेच्या वतीने रावबहादुर डॉ. व्ही. व्ही. मुळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. संसदीय लोकशाहीत अतिरिक्त श्रद्धाळू वृत्ती मारक आहे. पक्षाचे विचार आणि कृती या विषयी लोकांनी कठोर चिकित्सा करून न्यायनिष्ठा केली पाहिजे, असा प्रेरक संदेश त्यांनी याप्रसंगी दिला होता.

**जाहिर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११४३/२०२५
नि.नं.६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **श्रीमती कुसूम सुरेश गायकवाड**
वय - ६५ वर्षे, धंदा - घरकाम
२) **श्री गोविंद सुरेश गायकवाड**
वय - ५० वर्षे, धंदा - मजूरी
३) **श्री युवराज सुरेश गायकवाड**
वय - ४७ वर्षे, धंदा - मजूरी
सर्व रा. घर नं. १०१९, लिमयेवाडी, इंदिरा नगर, सोलापूर — **अर्जदार**
विरूध्द
**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सुरेश भिमराव गायकवाड यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सदर कै. सुरेश भिमराव गायकवाड यांचे दिनांक १४/०२/२०२२ रोजी निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी असून, अर्जदार क्र.२ व ३ मुले आहेत. सदर अर्जदार हे कै. सुरेश भिमराव गायकवाड यांचे वारस असल्याबाबत कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा मे. न्यायायलयाने नमलेली तारीख दिनांक १७/०५/२०२६ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून, म्हणणे द्यावे. अन्यथा मे. न्यायालय पुढील योग्य ते आदेश पारीत करेल याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले तारीख :- २५.०३.२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, सोलापूर**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, सोलापूर**

**जाहीर नोटीस**

आमचे अशिल श्री. श्रीनिवास नरसय्या यंगल, रा. घर नं. १४५, दत्त नगर, सोलापूर यांनी दिलेल्या अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना विशेषतः ता.द. सोलापूर व ता. उत्तर सोलापूर येथील लोकांना कळविणेत येते की, डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत येथील का. गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (अ) कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर बामधील गट नं.३९० पैकी घरकुल क्लस्टर क्र. अ-५८१/४ (सभासद क्र.अ-१०७६) असे असून ही घरकुल या जाहीर नोटीशीचा विषय आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलाचे आई मयत के. मल्लम्मा नरसय्या यंगल हिचे दि. ०३/०९/२०२२ रोजी निधन झाले आहे. तसेच मयताचे पती कै. नरसव्या इय्या यंगल यांचे सुध्दा दि. ०३/०९/१९९० रोजी मयत झाले आहे. तेव्हा मयताचे वारसदार यांनी सदर घरकुल मिळकतीवर मयताचे जनक मुलगा वारसदार म्हणून आमचे अशिल श्रीनिवास नरसय्या यंगल यांचे एकट्याचेच नावाची मयताचे पश्चात वारसदार म्हणून नोंद करण्यास मयताचे इतर वारसदार बांनी म्हणजे १) जया लक्ष्मण गोटीमुकुल, २) कमला बलप्पा यनगंदुल, ३) अर्चना लक्ष्मीदास भंडारी यांनी लेखी स्वरुपात स्वतंत्रपणे नोटरी संमतीपत्र दिली आहे. तेव्हा सदरचे आमचे अशिल श्रीनिवास नरसय्या यंगल यांचे एकटयाचेच नावाची वरील घरकुलच्या संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डला वारस नोंद होण्यास कोणाचेही हरकत अथवा तक्रारी असल्यास त्याबद्दल त्यांनी खालील नमूद पत्यावर सदर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत-तक्रार कळवावी., या मुदतीत कोणाचेही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास वर नमूद मिळकतीबाबत मयताचे पश्चात घरकुलवर वारस/सभासद म्हणून आमचे अशिलाचे नावाची नोंद करण्यात येईल. त्यानंतर त्याबाबत कोणाचेही, कसलेही प्रकारचे तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिली. तारीख दि. १४/०४/२०२६

**सही-**
**ॲड. जगदीश व्ही. कोंडी**
**बी.एस.एल., एल.एल.बी., एम.एस.डब्ल्यू**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर-४१३००२**
**मो.नं. ९८६०२०५०७८**
**अशिलतर्फे ॲडव्होकेट**




## महत्त्वाचे

### युद्धजन्य परिस्थितीतही इराणचा संघ जेद्दात दाखल

**जेद्दा** : युद्धजन्य परिस्थिती असतानाही इराणचा क्लब ट्रॅक्टर संघ सौदी अरबच्या जेद्दा शहरात दाखल झाला आहे. तेथे आपण एएफसी चॅम्पियन्स लीग एलीटच्या राऊंड ऑफ १६ मध्ये खेळणार असल्याचे या संघातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मार्च महिन्यात पश्चिम आशियाचे प्लेऑफ सामने रद्द करण्यात आले होते. त्यानंतर अंतिम १६ च्या सामन्यांचा कार्यक्रम नव्याने तयार करण्यात आला होता. या कार्यक्रमानुसार इराणच्या क्लब ट्रॅक्टरचा संयुक्त अरब अमिरातमधील शबाब अली अहली संघाविरुद्धचा सामना सौदी अरबच्या जेद्दा येथे खेळविण्याचे ठरविण्यात आले होते. या निर्णयानंतर प्रश्न उपस्थित झाला होता की, काय इराणमधील क्लबचा हा संघ जेद्दामधील सामना खेळेल का? अखेर लांबचा का होईना प्रवास करून ट्रॅक्टरचा संघ जेद्दा येथे पोहोचला आहे. हा संघ उत्तर-पश्चिम इराणमध्ये असलेले आपले गृहनगर तबरीज येथून रस्ता मार्गे तुर्कीला पोहोचला आणि नंतर मग इस्तंबुल येथून हवाई मार्गाने जेद्दात दाखल झाला.

### मला धैर्याने खेळावे लागेल : बॅडमिंटनपटू आयुष

**नवी दिल्ली** : मला जर जागतिक दर्जाच्या स्पर्धेत अव्वल खेळाडूंविरुद्ध खेळाचे असेल तर कोर्टवर आणखी धैर्य दाखववे लागेल. प्रतिस्पर्ध्यांना लांब चालणाऱ्या रॅलीत गुंतवून ठेवावे लागेल आणि आपल्या पायांना आणखी मजबुती द्यावी लागेल, असे प्रतिपादन बॅडमिंटन आशिया अजिंक्यपद (बीएसी) स्पर्धेतील उपविजेता व युवा भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टी याने केले आहे. २० वर्षीय शेट्टीने चीनच्या निंगबो येथे झालेल्या या बीएसी स्पर्धेत चांगली कामगिरी बजावली. क्रमवारीत स्थान नसतानाही त्याने अनेक दिग्गज खेळाडूंना धक्का देत स्पर्धेत खळबळ उडवून दिली होती. त्याच्या या प्रभावी खेळाची सांगता अंतिम सामन्यातील पराभवाने झाली. त्याला अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानी असलेल्या शी युकीकडून मात खावी लागली. गेल्या सहा दशकांपासून या स्पर्धेत पुरुष एकेरीचे सुवर्णपदक पटकाविण्याचे भारताचे स्वप्न थोडक्यात साकार होऊ शकले नाही. शी युकीने अचूक फटके हाणले. त्याने मला आक्रमण फटके हाणण्याची अनेकदा संधी दिली. त्याने वेगवान खेळाचे प्रदर्शन करीत मला नेटवर कोणतीही संधी उपलब्ध होऊ दिली नाही. त्यामुळे मला आक्रमक खेळ खेळता आला नाही, अशी कबुलीही या युवा खेळाडूने दिली.



### भारतीय सेनादलातील मुष्टियोद्ध्यांना आठ पदके

**नवी दिल्ली** : भारतीय सेनादलात कार्यरत असलेल्या मुष्टियोद्ध्यांनी मंगोलिया येथे नुकत्याच पार पडलेल्या आशिया मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत तीन सुवर्णपदकांसह आठ पदकांची कमाई केली आहे. या कामगिरीची माहिती सेनादलातील अधिकाऱ्यांनी नुकतीच जाहीर केली आहे. पुरुष विभागात विश्वनाथ सुरेश (५० किलो गटात सुवर्ण), सचिन सिवाच (६० किलो गटात रौप्य), आकाश (७५ किलो गटात कांस्य), लोकेश (८५ किलो गटात कांस्य) आणि नरेंद्र बेरवाल (९० किलो गटात कांस्य) हे पदक विजेता स्पर्धक ठरले. महिलांमध्ये प्रीती पवारने ५४ किलो गटात, तसेच अरुंधती चौधरीने ७० किलो गटात सोनेरी यश संपादन केले, तर जास्मीन लंबोरियाला ५७ किलो गटात रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. भारतीय सेनादलाच्या मिशन ऑलिम्पिक कार्यक्रमांतर्गत सेना क्रीडा संस्थेत प्रशिक्षण घेतलेल्या या खेळाडूंच्या कामगिरीमुळे पथकात उत्साह संचारला असल्याचे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जखमी कार्सच्या जागी मदुशंका सनरायझर्स संघात

**नवी दिल्ली** : श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज दिशान मदुशंका याला जखमी ब्रायडन कार्स याच्या जागी आयपीएलच्या सनरायझर्स संघात स्थान देण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीगच्या उर्वरित सामन्यात तो आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करणार आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या पहिल्या सामन्याच्या आदल्या दिवशी नेटमध्ये सराव करताना कार्सच्या हाताला दुखापत झाली होती. मध्यमगती गोलंदाज असलेल्या मदुशंकाने श्रीलंकडेकडून एक कसोटी सामन्यासह २८ वनडे आणि १९ टी-२० सामने खेळले आहेत आणि एकूण ७० गडी बाद केले आहेत. आयपीएलद्वारे जारी करण्यात आलेल्या माहितीनुसार मदुशंकाला ७५ लाख रुपयांमध्ये सनरायझर्स संघात सहभागी करून घेण्यात आले आहे. याआधी त्याने आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

# अभिषेक, दीप्ती टी-२० चे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू

## विस्डेन पुरस्कारामध्ये भारतीयांचा दबदबा ● नऊपैकी सात पुरस्कार पटकाविले

◆ **लंडन, १४ एप्रिल**

भारतीय क्रिकेटपटूंनी यंदाच्या विस्डेन अल्मनॅक-२०२६ या पुरस्कार समारंभात आपला दबदबा कायम राखत नऊ पैकी सात पुरस्कार पटकाविले आहेत. दीप्ती शर्मा व अभिषेक शर्मा यांनी अनुक्रमे महिला व पुरुष विभागात टी-२० प्रकारातील सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटूचा मान मिळविला आहे. शुभमन गिल, मोहम्मद सिराज, ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांनी मागील वर्षी इंग्लंडमध्ये झालेल्या मालिकेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्यामुळे त्यांना या विस्डेनच्या वर्षातील अव्वल पाच क्रिकेटपटूंमध्ये सहभागी करून घेण्यात आले आहे.



भारतीय क्रिकेटपटूंशिवाय या पुरस्कारांसाठी निवड झालेल्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क याचाही समावेश असून त्याची सर्वोत्कृष्ट पुरुष क्रिकेटपटू म्हणून निवड झाली आहे. याशिवाय इंग्लंडचा फलंदाज हसीब हमीद याची अन्य चार भारतीय खेळाडूंसह वर्षातील सर्वोत्कृष्ट पाच क्रिकेटपटूंमध्ये निवड करण्यात आली आहे.

मागील वर्षी झालेल्या आयसीसी वनडे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सर्वाधिक २२ फलंदाज बाद केले म्हणून दीप्तीची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या अष्टपैलू खेळाडूच्या कामगिरीमुळेच भारतीय महिला संघाने मुंबईत झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला नमवून जागतिक विजेतेपद पहिल्यांदा आपल्या नावावर केले होते. गोलंदाजीप्रमाणेच फलंदाजीतही आपली फळीची चमक दाखवित दीप्तीने नऊ सामने खेळताना तीन अर्धशतकांच्या मदतीने २१५ धावा नोंदविल्या होत्या.



अभिषेकने २०२५ च्या सत्रात खेळताना लक्षणीय कामगिरी केली होती. या सत्रात खेळताना त्याने २१ सामन्यांमध्ये १९३ च्या स्ट्राईक रेटने ८५९ धावा कुटल्या होत्या. यात एक शतक आणि पाच अर्धशतकांचा समावेश होता. मागील वर्षी इंग्लंड दौऱ्यावरील कसोटीत मालिकेत भारतीय कसोटी संघाचा कर्णधार गिल याने ७५४ धावा काढल्या होत्या आणि पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत रोखण्यात मोलाची कामगिरी बजावली होती. त्याने एकट्याने एजबेस्टन कसोटी सामन्यात ४३० धावा केल्या होत्या. वेगवान गोलंदाज सिराजने ॲण्डरसन-तेंडुलकर चषकासाठी खेळल्या गेलेल्या या कसोटी मालिकेत सर्वाधिक २३ फलंदाज बाद केले होते, तर पंतने चौथ्या कसोटीत जखमी झाल्यानंतर पाच कसोटीत बाहेर बसण्याआधी ४७९ धावांची नोंद केली होती. मँचेस्टर येथील कसोटी सामन्यात पायाला फ्रॅक्चर होण्याआधी त्याने दुसऱ्या डावात ५४ धावांचे योगदान दिले होते. ◂(वृत्तसंस्था)

# बंगळुरूला फलंदाजीची धार दाखवावी लागणार

## लखनौविरुद्ध आज लढत

◆ **बंगळुरू, १४ एप्रिल**

विद्यमान विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाला आपल्या चांगल्या कामगिरीचे सातत्य कायम राखायचे असेल तर उद्या बुधवारी येथे होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात फलंदाजीची धार दाखवीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करावे लागणार आहे. बंगळुरू संघाचा हा साखळी सामना सध्या गोलंदाजीत चांगली कामगिरी करीत असलेल्या लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) संघाविरुद्ध खेळला जाणार आहे.

बंगळुरू संघ सहा गुणांसह गुणतालिकेत सध्या तिसऱ्या स्थानावर आहे. अन्य चार संघ प्रत्येकी चार गुणांसह त्यांचा पाठलाग करीत आहेत. बंगळुरू संघ सध्या गुणतालिकेत आघाडीवर असलेल्या राजस्थान रॉयल्सपेक्षा दोन गुणांनी तर पंजाब किंग्जपेक्षा एक गुणाने मागे आहे. अशा बंगळुरू संघातील फलंदाजांनी यंदाच्या आतापर्यंतच्या सामन्यात आपल्या फलंदाजीची चुणूक दाखवून प्रतिस्पर्धी संघाच्या गोलंदाजांच्या मनात धडकी भरलेली आहे. हे अजूनपर्यंत यंदाच्या स्पर्धेत इतर कोणत्याही संघाला जमलेले नाही. बंगळुरू संघाच्या फलंदाजांनी एकत्रित कामगिरी बजावत उत्कृष्ट फलंदाजीची प्रदर्शन केले आहे. सर्वच फलंदाजांना महत्त्वपूर्ण योगदान देण्यात यश आले आहे, हे त्यांच्या स्ट्राईक रेटवरून दिसून येते. विराट कोहली (स्ट्राईक रेट १६२), फिल साल्ट (१७८), रजत पाटीदार (२१४), टीम डेव्हिड (२२१) आणि देवदत्त पलिक्कल (२०१) यांनी आपल्या फलंदाजीत कमाल करीत सर्वच संघांच्या गोलंदाजांसमोर एक कडवे आव्हान उभे केले आहे. या पाचही फलंदाजांनी चार सामन्यांमध्ये ५२ षटकार हाणले आहेत. या कामगिरीमुळेच बंगळुरू संघाने यंदाच्या स्पर्धेत आतापर्यंत सर्वाधिक षटकारांची नोंद केली आहे आणि त्यांनी 'रेंज हिटिंग'ला एका नव्या उंचीवर नेले आहे. परिणामस्वरूप त्यांनी आतापर्यंतच्या सर्वच सामन्यात २०० चा पल्ला पार केला आहे, यावरूनच त्यांच्या आक्रमक फलंदाजीचा अंदाज लावता येईल.

बंगळुरू संघ पुढील तीन सामने स्वत:च्या मैदानावर खेळणार असल्यामुळे त्याचा ते पुरेपूर फायदा घेऊ शकतात. घरच्या मैदानावर त्याचे हे तीन सामने लखनौपाठोपाठ दिल्ली कॅपिटल्स (१८ एप्रिल) आणि गुजरात टायटन्स (२४ एप्रिल) संघाविरुद्ध होणार आहेत.

उद्या बुधवारी येथील चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या सामन्यात बंगळुरूला लखनौच्या वेगवान गोलंदाजीच्या माऱ्याचा सामना करावा लागणार आहे. लखनौकडून भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीसोबतच प्रिन्स यादव आणि दिग्वेश राठी यांनी आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. सध्या स्पर्धेत शमीची कामगिरी दुर्लक्षून चालणार नाही. आपल्या गोलंदाजीचा तोफखाना कायम राखताना या लखनौच्या तिकडीला बंगळुरूच्या सपाट पिचवर प्रतिस्पर्धी संघाच्या आक्रमक फलंदाजांना रोखावे लागणार आहे. गोलंदाजीत चांगली कामगिरी होत असली तरी लखनौ संघाला गुणतालिकेत सातव्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे. कारण, त्यांच्या फलंदाजांनी अजूनपर्यंत लक्षवेधक कामगिरी बजावलेली नाही. ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील फलंदाजांना अजून तरी स्पर्धेत सूर गवसलेला नाही. स्वत: कर्णधारही असलेल्या पंतला आतापर्यंत झालेल्या चार सामन्यांमध्ये १३० च्या स्ट्राईक रेटने केवळ १०३ धावा काढता आल्या आहेत. मिचेल मार्श, एडन मार्क्रम, निकोलस पूरन सारखे आघाडीचे फलंदाज तसेच आयुष बडोनी आणि अब्दुल समदसारखे युवा फलंदाज सूर गवसण्यासाठी धडपड करीत आहेत. मुकुल चौधरीने थोडी आशा जागविली आहे मात्र त्यालाही आपल्या या चांगल्या कामगिरीचे सातत्य राखावे लागणार आहे. बंगळुरू संघाच्या गोलंदाजीला अजून स्थैर्य लाभले नसून त्यांची कामगिरी खाली-वर होत आहे. त्यांच्या या कमजोरीचा फायदा लखनौचे फलंदाज कसे उचलतात, यावरच सामन्याचे चित्र स्पष्ट होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

> **आजचा सामना**
>
> **रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. लखनौ सुपर जायंट्स**
>
> **स्थळ :** चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
>
> **वेळ :** सायं. ७.३० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# संजू सॅमसन मार्चचा सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू

## आयसीसीने केली निवड

◆ **दुबई, १४ एप्रिल**

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील भारतीय संघाच्या विजेतेपदाचा शिल्पकार ठरलेल्या संजू सॅमसन याची मंगळवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून निवड जाहीर केली आहे.

स्पर्धेच्या सुरुवातीला सॅमसनला भारतीय संघाच्या अंतिम अकरात खेळाडूंमध्ये स्थान मिळालेले नव्हते. नंतर मात्र त्याला संघात स्थान दिल्यानंतर त्याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्याने न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात ४६ चेंडूंमध्ये ८९ धावा ठोकून भारताला वर्षाच्या सुरुवातीलाच सलग दुसऱ्यांदा टी-२० स्पर्धेचे जेतेपद पटकावून देण्यात मोलाची भूमिका पार पाडली होती.

मागील चार महिन्यांमध्ये या पुरस्काराचे मानकरी इतर देशांचे खेळाडू राहिले असल्यामुळे सॅमसनची ही निवड भारतासाठी महत्त्वाची ठरली आहे. गेल्या चार महिन्यांमध्ये हा मान दक्षिण आफ्रिकेचा सायमन हार्मर, ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क, न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल व पाकिस्तानचा साहिबजादा फरहान यांना मिळालेला होता.



हा मान माझ्या कारकीर्दीतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याची प्रतिक्रिया सॅमसनने व्यक्त केली आहे. आयसीसीचा महिन्याचा मानकरी होण्यासाठी झालेली माझी निवड अविश्वसनीय आहे. माझ्या क्रिकेट कारकीर्दीतील ही एक अविस्मरणीय घटना आहे. पुरुषांच्या टी-२० स्पर्धेतील भारतीय जेतेपदामध्ये मोलाचे योगदान देणे माझ्यासाठी स्वप्न साकार होण्यासारखे आहे. त्या क्षणाचे महत्त्व लक्षात येण्यासाठी मला काही काळ लागला, असेही सॅमसन म्हणाला. टी-२० विश्वचषक स्पर्धेत सॅमसनने न्यूझीलंडविरुद्ध ८९ धावा काढण्याआधी वेस्ट इंडीजविरुद्ध नाबाद ९७ आणि इंग्लंडविरुद्ध उपांत्य सामन्यात ८९ धावा केल्या होत्या. मार्च महिन्यात खेळल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय टी-२० तीनही सामन्यात सॅमसनने १३७.५० च्या सरासरीने आणि १९९.२७ च्या शानदार स्ट्राईक रेटने २७५ धावा केल्या होत्या.

आयसीसीचा महिन्याचा मानकरी पुरस्कार सॅमसनला पहिल्यांदा प्राप्त झाला आहे. महिला विभागात न्यूझीलंडची कर्णधार मेली केर हिने झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चांगली कामगिरी बजावत तिसऱ्यांदा हा महिन्याचा मानकरी होण्याचा मान पटकाविला आहे. तिने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत १६ फलंदाज बाद करताना १४० धावाही काढल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)



उत्तर प्रदेशातील वाराणसी शहरात युपी ॲडव्हेंचर स्पोर्ट्स क्लबतर्फे गंगा नदीच्या काठावर आयोजित बीच हॅण्डबॉल स्पर्धेत सहभागी खेळाडू आपले कौशल्य दाखवताना. नदी किनाऱ्यावरील वाळूत असा खेळ खेळणे मोठे हिमतीचे आणि मेहनतीचे काम असते, त्यावर मात देत हे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

## राष्ट्रीय ज्युनियर टेटे स्पर्धा उत्तराखंडमध्ये

◆ **डेहराडून, १४ एप्रिल**

उत्तराखंड पहिल्यांदा ८७ व्या आंतर राज्य ज्युनियर आणि युवा राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद भूषविणार आहे. १९ वर्षे गट मुलींची स्पर्धा उद्या बुधवारपासून परेड मैदानावर असलेल्या परिसरात होणार आहे.

मुलांचे सांघिक आणि इतर गटांचे सामने सहाव्या दिवसानंतर सुरू होतील. देशातील २९ संघ या स्पर्धेत भाग घेत आहेत. सहभागी संघांना त्यांच्या तीन अव्वल तीन खेळाडूंच्या रँकिंगच्या आधारे क्रमवारीत स्थान देण्यात येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापूरची पुण्याच्या 'युनायटेड'वर मात

## १६ वर्षांखालील क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सोलापुरने पुण्याच्या युनायटेड स्पोर्ट्स क्लबचा ८२ धावांच्या आघाडीवर विजय प्राप्त करून तीन गुण प्राप्त केले.



सार्थक कन्ना

पुणे येथे झालेल्या या स्पर्धेत सोलापूरचा कर्णधार संदेश गाडे याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. प्रथम फलंदाजी करताना सोलापूरने सर्व बाद १९७ धावा केल्या. यात ययाती देवकते ५४, ऋग्वेद पाटील ४४ व सार्थक कन्ना याने ३९ धावा केल्या.



ययाती देवकते

युनायटेड स्पोर्ट्स संघाकडून गोलंदाजी मध्ये समीन शुक्ला व आयुष ठाकरेने प्रत्येकी २ बळी व ध्रुव जाधवने ३ बळी टिपले.

युनायटेडने पहिल्या डावांत सर्व बाद ११५ धावा केल्या. यामध्ये आयुष ठाकरे याने ३० धावा केल्या. सोलापूर संघाने दुसरा डाव ८ बाद १५० धावांवर घोषित केला. यामध्ये ऋग्वेद पाटील २२, सार्थक कन्नाने ३२, मोहम्मद जैद शेखने नाबाद ३४ व श्रवण माळी याने नाबाद १६ धावा केल्या.



श्रवण माळी

युनायटेडने दुसऱ्या डावात ६ गडी गमावून १७४ धावा केल्या. यामध्ये आराध्य नजरे २७, अर्णव श्रीवास्तव ३३, अमन कारकडे नाबाद ५० व ध्रुव जाधव नाबाद १८ धावा केल्या.

दुसऱ्या डावात सोलापूरकडून श्रवण माळी याने ४ तर सार्थक कन्ना व राज सांगळे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. सोलापूरचा पुढील सामना जालनाबरोबर १६ व १७ एप्रिल रोजी होणार आहे.

# एसआय संघास विजेतेपद, शिक्षक संघ उपविजेता

## महापालिका डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीची 'महामानव चषक' स्पर्धा : व्हॉलीबॉल स्पर्धेत झोन सात विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

एस.आय. संघाने महापालिका डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या 'महामानव चषक' स्पर्धेचे क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. शिक्षक टीमने द्वितीय तर झोन क्रमांक सातने तृतीय क्रमांक संपादिला. व्हॉलीबॉल स्पर्धेत झोन क्रमांक सातने प्रथम तर झोन क्रमांक पाचने द्वितीय क्रमांक मिळवला. विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. 'बेस्ट बॉलर' म्हणून पवार तर 'मालिकावीर' म्हणून मनोज सोनवणे यांचा सन्मान करण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिका कर्मचारी अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व एस. एस. फाउंडेशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रभवन प्रशासकीय इमारत येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी 'महामानव चषक' स्पर्धेचे पारितोषिक वितरण आणि आदर्श पालकांचा गौरव महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती अध्यक्षा रंजीता चाकोते, माजी महापौर श्रीकांचन्ना यन्नम, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, जंगम मॅडम, नगरसेवक बडूरवाले, नगरसेविका श्वेता खरात व कल्पना कदम यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



प्रारंभी बाबासाहेबांच्या मूर्तीस अभिवादन करण्यात आले. यानिमित्त महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व पदाधिकारी यांच्यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यावेळी महापालिकेतील ज्या कर्मचाऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजिनिअर, वकील, उद्योजक अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत, अशा आदर्श माता-पित्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट, विभागीय अधिकारी तळिखेडे, आरोग्य निरीक्षक हमीद हिरोली, उत्सव अध्यक्ष बाळासाहेब गोतसुर्वे, क्रांती युनियन अध्यक्ष लिंबराज जेठीथोर, दत्ता गायकवाड, कुमार मोरे, पांडू दुपारगुडे, सागर शिरसे, आकाश मोरे, सनी बनसोडे, विष्णू तळभंडारे, सचिन आवारे, गणेश डेंगळे, श्रीनिवास रामगल, शुभम रणखांबे, मुख्य आरोग्य निरीक्षक जय कांबळे तसेच समता सैनिक दलाचे अनिल जगझाप, सुमित्रा केरबा जाधव, प्रभूलिंग पुजारी, रवी बनसोडे, राहुल बनसोडे, दादा शिंगे, सुरेखा बाळशंकर आदींचे सहकार्य लाभले. यावेळी समता सैनिक दल महार बटालियनच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

## महत्वाचे...



### मंगळवेढा पोलिसांनी शहरातून काढला रुटमार्च

**मंगळवेढा, दि. १४ एप्रिल-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व बसवेश्वर जयंती उत्सव साजरा होणार असल्याने या पार्श्वभूमीवर मंगळवेढा पोलीस प्रशासनाने शहरात रुट मार्च काढून कायदा सुव्यवस्था अबाधीत असल्याचे दाखवून दिले. दि. १४ एप्रिल पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सुरु होत आहे. तसेच दि.१९ एप्रिल रोजी बसवेश्वर जयंती उत्सव होत असल्याने या पार्श्वभूमीवर मंगळवेढा पोलीसांनी शहरातील दामाजी चौक, शिवप्रेमी चौक, चोखामेळा चौक, बसस्थानक असा रुटमार्च काढण्यात आला. दरम्यान यामध्ये ४ पोलीस अधिकारी १५ पोलिस अंमलदार पंचवीस होमगार्ड व एक शासकीय वाहनाचा समावेश होता. रुटमार्च काढते प्रसंगी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा पाहण्यासाठी नजरा लावल्या होत्या.



### जिल्हास्तरीय कृतीनिष्ठ पुरस्काराने नवनाथ कोडग यांचा गौरव

**वेळापूर, दि. १४ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात मानाचा समजला जाणारा जिल्हास्तरीय कृतीनिष्ठ पुरस्कार २०२५-२६ हा पुरस्कार नवनाथ ज्ञानेश्वर कोडग यांना प्रदान करण्यात आला. छत्रपती परिवार मरवडे यांच्या वतीने आयोजित या गौरव सोहळ्याचा कार्यक्रम मंगळवेढा येथील जोगेश्वरी मंगल कार्यालयात पार पडला. याप्रसंगी माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत नवनाथ कोडग यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. नवनाथ कोडग हे हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, तांदुळवाडी येथे २४ वर्षे सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, तसेच छत्रपती परिवार मरवडेचे संस्थापक सुरेश पवार उपस्थित होते. यावेळी त्यांची पत्नी, आई-वडील, मुले, मित्रपरिवार, वस्ताद सोलापूर जिल्हा मराठा सेवा संघ संघटक भारत सांगडे, प्रशालेचे प्राचार्य देवकर, पर्यवेक्षक कुचेकर उपस्थित होते.



# बार्शी-परांडा रोडवरील जीवघेणा खड्डा ठरतोय 'मौत का कुआँ'

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे तरुणाचा भीषण अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१४ एप्रिल-**

शहरातील परांडा रोड परिसरात मुस्लिम कब्रस्तानाजवळील रस्त्यावरील कंबरेएवढा खोल उघडा खड्डा सध्या नागरिकांच्या जीवावर उठला असून, तो अक्षरशः ङ्गमौत का कुआँङ्ग बनला आहे. नगरपरिषद प्रशासनाच्या बेजबाबदार व निष्काळजी कारभारामुळे रविवार दि.१२ एप्रिल रात्री या ठिकाणी दुचाकीवरुन जाणाऱ्या एका निष्पाप तरुणाचा भीषण अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर तरुण रात्रीच्या वेळी दुचाकीवरुन परांडा रोडने जात असताना रस्त्याच्या मध्यभागी असलेला मोठा आणि खोल खड्डा त्याला दिसला नाही आणि तो थेट या खड्डयात कोसळला. हा अपघात पाहून स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. स्थानिक नागरिकांच्या मते, हा अपघात अचानक घडलेला नसून, नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या निष्क्रियतेचा हा परिणाम आहे. मागील दीड महिन्यांपासून नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही प्रशासनाने या खड्डयाकडे दुर्लक्ष केले. जलदाय विभागाचे अभियंता यांना देखील अनेक वेळा फोनद्वारे कळिवण्यात आले होते, मात्र, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, या परिसरातील रस्त्यावरील वीज व्यवस्था देखील अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे. रस्त्याच्या कडेला असलेले बरेचसे वीज दिवे बंद आहेत. तर काही ठिकाणी झाडांच्या फांद्यांमुळे सुरु असलेल्या दिव्यांचाही प्रकाश अडवला जात आहे. परिणामी, संपूर्ण परिसर रात्रीच्या वेळी अंधारात बुडालेला असतो. अशा परिस्थितीत रस्त्यावर असलेले मोठे खड्डे दिसत नसून अपघातांचा धोका अधिकच वाढत आहे.

### ६२ लाखांच्या सोन्याचा अपहार

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

सोन्याचे दागिने बनविण्यासाठी लागणारे कच्चे मटेरियल दिले असता ६२ लाखांचा सोन्याचा अपहार करून त्या ऐवजी तांबे पितळ मिश्रित धातूचे कच्चे मटेरियल बनवून ते एका व्यक्तीला देऊन सोन्याचे आहेत असे भासवून फसवणूक केली. दि. १९ जून २०२४ रोजी ते ११ डिसेंबर २०२५ च्या दरम्यान रिजवान रियाज हुंडेकरी, (रा. ११३ न्यू तिर्हे गाव, चांदणी चौक, सोलापूर) हे रिदान ज्वेलर्स या दुकानातील नोकर अकबर मन्सूर शेख, (रा. ४३२ मंगळवार पेठ, सोलापूर) याने ६२० ग्रॅमचे ६२ लाख रुपयाचे २४ कॅरेट सोन्याचे दागिने बनविण्यासाठी लागणारे कच्चे मटेरियल दिले. या सोन्याचा अपहार करून त्या ऐवजी तांबे पितळ मिश्रित धातूचे कच्चे मटेरियल बनवून ते रिजवान हुंडेकरी यांना सोन्याचे आहेत असे भासवून फसवणूक केली. शुद्ध सोने घेऊन अकबर शेख पळून गेला आहे. याबाबत दि. १२ एप्रिल रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास काटे करत आहेत.

# पंढरीत गुलाबी रिक्षा चालक महिलेच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन



### विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचा अनोखा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ एप्रिल -**

महाराष्ट्र शासन समाज भूषण पुरस्कार प्राप्त विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवतीर्थ येथे साजरी केली जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या गुलाबी रिक्षा चालक सोनाली अरुण दळवी या महिलेच्या हस्ते करून समाजातील वंचित घटकाला न्याय देण्याचे काम प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आले.

याप्रसंगी प्रतिष्ठानचे संस्थापक माजी नगरसेवक डी.राज सर्वगोड, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष प्रणिता भालके तर प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषद सदस्य दुर्गाताई अंकुशराव, पंचायत समिती सदस्य अक्काताई लोखंडे, नगरसेविका उज्वलाताई भालेराव, नगरसेविका अनिता ढवळे, माजी नगरसेविका शकुंतला नडगिरे, श्वेताताई डोंबे, राजश्री सर्वगोड या उपस्थित होत्या.

महाराष्ट्र शासनाची गुलाबी ई-रिक्षा योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर व सक्षम करण्यासाठी, प्रदूषणात घट करणे आणि हरित ऊर्जेला प्रोत्साहन देणे, रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी आणि महिला प्रवाशांना सुरक्षित वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे.

# मनोमार्गे गेला तो तिथे मुकला, हरिपाठे स्थिरावला तोची धन्य

### बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर; मोडनिंब येथे श्रीमद्‌ भागवत कथा सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १४ एप्रिल-**

मनोमार्गे गेला तो तिथे मुकला, हरिपाठे स्थिरावला तोची धन्य. मनाच्या मागे शरीर गेले तरी सुखाची अपेक्षा ठेवू नये; जीवनात कर्म असले पाहिजे, बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी भागवत कथेच्या विवेचनात सांगितले. मोडनिंब (ता.माढा) येथे भागवत कथेचा सोहळा भाविकांच्या प्रचंड प्रतिसादात सुरू आहे. कथेच्या विवेचनात त्यांनी साधक अवस्थेत कर्माचे महत्त्व अधोरेखित करत प्रापंचिक जीवनातही कर्म अनिवार्य असल्याचे सांगितले.

मोडनिंब (ता.माढा) येथे बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांची भागवत कथा भाविकांच्या प्रचंड प्रतिसादात सुरु आहे. राष्ट्रसंत सद्गुरू श्रीपादबाबा



यांच्या २८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रोज सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात हजारो भाविक सहभागी होतात.

**भागवत कथा सप्ताहचा आज समारोप**

येथे सुरू असलेल्या संगीतमय भागवत कथेचा आज समारोप होणार असून, या सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. आठवडाभर चाललेल्या या कथेच्या माध्यमातून बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांनी विविध अध्यात्मिक विषयांवर मार्गदर्शन केले.

## निधन वृत्त...

### मोहनराव माळवदकर

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**



सम्राट चौका जवळील बसवंती मंगल कार्यालयाच्या पाठीमागे राहणारे भावसार समाज जेष्ठ नागरिक संघटनेचे सल्लागार, भावसार समाज श्री विठ्ठल रुक्मिणी-मंदिराचे प्रमुख विश्वस्त, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळातून अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले मोहनराव मारुतीराव माळवदकर (वय वर्ष ८०) यांचे आज मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी त्यांच्या राहत्या घरापासून आज सकाळी १० वाजता निघणार असून जुना पुणे नाक्या जवळील हिंदू स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. ते भावसार प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश माळवदकर यांचे वडील होत.


### सुमन माने-देशमुख



**वेळापूर, दि. १४ एप्रिल-**

वेळापूर शेरी (ता. माळशिरस) येथील श्रीमती सुमन चंद्रकांत माने-देशमुख यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या सोलापूर जिल्हा परीषद माजी जिल्हा उपाध्यक्ष कै. सूर्यकांतदादा माने-देशमुख यांच्या मोठ्या वहिनी होत, तसेच कै.चंद्रकांत माने-देशमुख यांच्या सुविद्य पत्नी होत. याशिवाय त्या भाजपाचे कार्यकरते अमृत माने-देशमुख व सोसायटी चेअरमन अमरसिंह माने-देशमुख यांच्या थोरल्या चुलती होत.

### सुरेश फुलपाटी



**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**

गोधूताई विडी घरकुल येथील सुरेश बालय्या फुलपाटी ( वय ६८) यांचे मंगळवारी सकाळी आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुले, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सायंकाळी ५ वाजता अक्कलकोट रोडवरील पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सोलापूर व महाराष्ट्रात त्यांनी क्रिकेट पंच व सांख्यिकी म्हणून अनेक वर्ष काम पाहिले होते. अनेक वृत्तपत्रातून त्यांचे क्रिकेटवर लेखही प्रसिद्ध झाले आहेत.


### कैलासम सिद्राल



**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

भवानीपेठ येथील प्रसिध्द कारखानदार कैलासम मल्लय्या सिद्राल यांचे मंगळवारी सकाळी ९ वाजता निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८७ वर्षे होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली व नातू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता भवानीपेठ येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पार्थीवावर पद्मशाली स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

# संत दामाजीनगर ग्रामपंचायत हद्दीत पथदिवे रात्रंदिवस सुरू



### विजेचा अपव्यय; कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष

**तथा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १४ एप्रिल-**

तालुक्यातील संत दामाजीनगर ग्रामपंचायत हद्दीत रात्र दिवस पथदिवे सुरु ठेवल्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात आढळून येत असून त्यामुळे विजेचा अपव्यय होत आहे. दिवसा नैसर्गिक प्रकाश असतानाही पथदिवे चालू असल्याने संबंधित प्रशासनाला आर्थिक फटका बसत आहे.

एकीकडे विजेची कमतरता असल्याने वारंवार लोड शेडिंग करावे लागत आहे. पथदिवे सतत चालू राहिल्यामुळे त्यांच्या आयुष्यमानावर ही परिणाम होत असून दिवे लवकर निकामी होत आहेत. परिणामी वारंवार दुरुस्ती व बदलासाठी खर्च वाढत आहे. त्यामुळे आधीच मर्यादित उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

स्थानिक नागरिकांकडून या प्रकारावर नाराज व्यक्त केली जात असून संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. पथदिव्यांसाठी स्वयंचलित टायमर किंवा योग्य योग्य ती प्रणाली बसून ही समस्या सोडवता येऊ शकते. विजेची कमतरता पाहता संबंधित विभागाने नियमित तपासणी करून दिवसा सुरू असलेले पथदिवे तात्काळ बंद करण्यासाठी उपाय योजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे.

### रिक्षा घेण्यासाठी पैसे न दिल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

लग्नात मानपान केला नाही. रीक्षा घेण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये दिले नाहीत म्हणून विवाहितेचा मारहाण, शिवीगाळ, दमदाटी करून शारीरिक मानसिक त्रास दिला.

दि. १४ जानेवारी २०२६ ते ७ मार्च २०२६ च्या दरम्यान किरण (पती), शांती (सासू) (रा. १४३ अविनाश नगर, कलावती नगर जवळ, सोलापूर) यांनी मिळून दिव्या किरण अनंतकर, वय २१ (रा. १४ सिद्धरामेश्वर नगर, एमआयडीसी सोलापूर) हिला लग्नात मानपान केला नाही. रीक्षा घेण्यासाठी माहेरून वडिलांनी पाच लाख रुपये दिले नाहीत म्हणून मारहाण, शिवीगाळ, दमदाटी करून शारीरिक मानसिक त्रास दिला आहे. याबाबत दि. १२ एप्रिल रोजी पति व सासूविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उडगी करत आहेत.

# भगवंत महोत्सवाच्या मुख्य रंगमंचाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ एप्रिल-**

शहरातील भगवंत मैदान येथे दि.२१ ते २८ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या श्री भगवंत महोत्सव २०२६ निमित्त मुख्य रंगमंचाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. या महोत्सवात भारतभर गाजलेले विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी बार्शीकरांना अनुभवायला मिळणार असून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हा महोत्सव श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट, बार्शी नगरपरिषद, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि श्री भगवंत बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. मुख्य रंगमंचाचे भूमिपूजन विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

दि.२१ एप्रिल रोजी होणाऱ्या क्रांती नाना मळेगावकर प्रस्तुत 'न्यू होम मिनिस्टर' या कार्यक्रमाच्या पोस्टरचे प्रकाशन.

बार्शीतील माता-भगिनींसाठी



हा कार्यक्रम विशेष मनोरंजनाचा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. मुख्य रंगमंचाच्या भूमि पूजन कार्यक्रमास माजी आमदार राजेंद्र राऊत, सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, बाजार समिती सभापती विजय गरड, माजी नगराध्यक्ष ॲड. आसिफ तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, भगवंत देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष दादा बुडूख, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरुगुटे, बार्शी नगरपालिकेचे मुख्याधिकारी मुलाणी, बाजार समिती उपसभापती बाबा गायकवाड, प्रशांत कथले, दिलीप गांधी उपस्थित होते.



# सुयश विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ एप्रिल-**

येथील सुयश विद्यालयामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली.

यावेळी शाळेचे संस्थापक शिवदास नलावडे, मुख्याध्यापिका श्रीमती अलका जगताप तसेच उपमुख्याध्यापक येवले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याप्रसंगी संस्थापक शिवदास नलावडे यांनी मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा आढावा घेतला. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व, समानतेचा संदेश आणि समाजातील परिवर्तनासाठी आंबेडकरांच्या विचारांचे अनुसरण करण्याची गरज यावर प्रकाश टाकला. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे उपस्थितांना नवी ऊर्जा व दिशा मिळाली.


# जय मल्हार वाचनालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १४ एप्रिल-**

येथील जय मल्हार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. गावातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत महामानवाच्या विचारांना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आणि प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पोलीस पाटील नंदकुमार आवटे, बाळासाहेब जाधव, पंकज आवटे, धनंजय जलकुटे, सदाशिव खांडेकर, भालचंद्र आवटे उपस्थित होते. कार्यक्रमात एकता महिला मंचच्या रेश्मा मुकटे, कल्पना वाघमोडे, सुकमल खंडागळे आणि बशीरा रंगरेज आदी महिला पदाधिकारी उपस्थित होते. आभार राम वाघमोडे यांनी मानले.


नारी शक्ति नेतृत्व का नवयुग
'नारी शक्ति वंदन' सम्मेलन
15 अप्रैल, 2026 | रवीन्द्र भवन, भोपाल
मुख्य अतिथि
डॉ. मोहन यादव
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश
"प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी के दूरदर्शी नेतृत्व में संसद और विधानसभाओं में महिलाओं को 33% आरक्षण सुनिश्चित करने वाला 'नारी शक्ति वंदन अधिनियम' नारी शक्ति के सम्मान, स्वाभिमान और सशक्त भविष्य का ऐतिहासिक संकल्प है। इस युगांतरकारी निर्णय के लिए प्रधानमंत्री जी का हृदय से अभिनंदन एवं आभार"
डॉ. मोहन यादव
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश
सशक्त नारी, सशक्त देश
राज्य स्तरीय नारी शक्ति वंदन पखवाड़ा
(10 -25 अप्रैल 2026)
डॉ. मोहन यादव का अभ्युदय मध्यप्रदेश
सीधा प्रसारण
@Cmmadhyapradesh
@jansampark.madhyapradesh
@Cmmadhyapradesh
@jansamparkMP
JansamparkMP
मध्यप्रदेश जनसम्पर्क द्वारा जारी
आकल्पन : म.प्र. माध्यम/2026

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



### 'विद्यानिकेतन'मध्ये विद्यार्थ्यांची भीमगीते

**सोलापूर :** बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये डॉ. आंबेडकर जयंती मुख्याध्यापक गोपीनाथ नवले, पर्यवेक्षक शंकर गिरी, हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी निर्भय कांबळे, प्रतिक बासुतकर, अजहरअली चांदा या विद्यार्थ्यांनी भीम गीत गायिले. सहशिक्षिका शोभा कटारे यांनी मनोगत व्यक्त केले. सहशिक्षिका रुपादेवी राजगे यांनी सूत्रसंचालन केले.

# उध्दरली कोटी कुळे... भिमा तुझ्या जन्मामुळे..!

## रखरखत्या उन्हात प्रज्ञासूर्यास अभिवादनासाठी लोटला जनसागर









### निळे फेटे, झेंडे घेऊन तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग

जयंतीनिमित्त तरुणाई मोठ्या अभिवादनासाठी येत होते. निळे फेटे, झेंडे, बाबासाहेबांचे फोटो असलेले टी-शर्ट परिधान करून तरुण-तरुणींनी अभिवादन केले. या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

सोलापूर शहरात भीम जयंती सप्ताहास उत्साही वातावरणात मध्यरात्रीपासून प्रारंभ झाला. यानिमित्ताने अवघे शहर नटले आहे. मध्यरात्रीपासूनच प्रज्ञासूर्यास अभिवादनासाठी जनसागर लोटला होता. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह विविध पक्ष, सामाजिक - संस्था संघटनांच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. रखरखत्या उन्हातही अभिवादनासाठी मोठी गर्दी झाली होती.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरात विविध शेकडो मंडळांच्या वतीने मध्यरात्री १२ वाजता डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना सजवलेल्या आकर्षक अशा मंडपामध्ये करण्यात आली. त्रिशरण, पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. शहरात विविध भागांमध्ये विद्युत रोषणाईचा लखलखाट दिसून आला. ''जय भीम''च्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.

महिलांसह अबाल वृद्ध अनुयायांचे जथेंच्या जथें पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी मध्यरात्रीपासूनच जनसागर लोटला होता.विविध संस्था, संघटना, राजकीय पक्षांच्या वतीने प्रज्ञासूर्यास अभिवादन करण्यात आले.

''बोलो रे बोलो, जय भीम बोलो'', ''ताकत से बोलो, जय भीम बोलो'', ''हिम्मत से बोलो, जय भीम बोलो'', ''जोर से बोलो, जय भीम बोलो'' असा नारा देत हातात निळा झेंडा घेऊन भीम अनुयायी डॉ. आंबेडकर चौकाकडे येत होते. डॉ. आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास मनोभावे जनसागर नतमस्तक झाला. निळ व गुलालांची मुक्त उधळण करण्यात आली. उत्साही वातावरणात भीम जयंती सप्ताह प्रारंभ झाला.

यावर्षी दिनांक १४ ते १९ एप्रिल २०२६ दरम्यान भीम जयंती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. रविवार दि.१९ एप्रिल २०२५ रोजी भीम जयंती सप्ताहाची भव्य अशा विराट मिरवणुकीने सांगता होणार आहे. या जयंती सप्ताहास उत्साही वातावरणात मध्यरात्री १२ वाजल्यापासून प्रारंभ झाला. सुमारे ४५० मंडळांनी आकर्षक सजवलेल्या व विद्युत रोषणाईने नटलेल्या मंडपामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना मध्यरात्री केली. जयंतीनिमित्ताने अवघे सोलापूर शहर नटले आहे. दोन्ही मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने विश्वस्त समिती व पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले.



भीम जयंती निमित्त आज सकाळपासूनच पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. आंबेडकर यांचा पुतळा आणि मिलिंद नगर येथील भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथे अभिवादनासाठी अलोट गर्दी झाली होती. त्रिशरण - पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अनुयायांनी अभिवादन केले. सकाळी समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. तसेच भारतीय बौद्ध महासभेअंतर्गत समता सैनिक दलाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. विविध पक्ष, सामाजिक - संस्था संघटनांच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने मध्यरात्री प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत सन १९५५ मध्ये रेखाटलेल्या प्रतिमेची या मंडपात प्रतिष्ठापना करण्यात येते. त्रिशरण पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी सतीश सरवदे, ॲड. अश्विन बनसोडे, डॉ. शैलेश सुरते, किरण जाधव, तळभंडारे, सुरज आबुटे, सिद्धार्थ तळभंडारे , बाळू गायकवाड, मनीष तळभंडारे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### पुस्तकांसह विविध स्टॉल्सवर गर्दी

डॉ. आंबेडकर चौकात पुस्तक, तथागत बुद्ध, डॉ. आंबेडकर यांची मूर्ती, कॅलेंडर , टोप्या व इतर चळवळीतील साहित्यांच्या विविध स्टॉल्सवर खरेदीसाठी मोठी गर्दी झाली होती. या स्टॉल्सवर मोठ्या प्रमाणात पुस्तक विक्री झाली असल्याचे दिसून आले.

### सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव

जयंतीचा उत्साह केवळ प्रत्यक्षातच नव्हे तर सोशल मीडियावरही दिसून आला.फेसबुक , इंस्टाग्राम , (ट्विटर) आणि व्हाट्सअँप स्टेटसवर दिवसभर शुभेच्छांचा वर्षाव झाला. प्रत्येकजण बाबासाहेबांच्या विचारांचे संदेश शेअर करत जयंती साजरी करत होता.

### सह्यांची मोहिम व मोफत सीम वितरण

अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला विरोध दर्शवण्यासाठी पुतळा परिसरात सह्यांची मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच भारत संचार निगम लिमिटेडच्या वतीने जयंतीनिमित्त मोफत सिम कार्डचे वितरण करण्यात आले.

### सामाजिक उपक्रमांनी अभिवादन

विविध संस्था व मंडळांच्या वतीने रक्तदान शिबिरे, १८ तास अभ्यास उपक्रम आदी कार्यक्रम राबवून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. समाजातील सर्व घटकांनी यात सहभाग घेतला.

### शेकडो पोलिसांचा चोख बंदोबस्त

जयंतीनिमित्त कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी सोलापूर शहर पोलीसांनी संपूर्ण शहरात कडक बंदोबस्त ठेवला होता. प्रमुख ठिकाणी पोलिसांची मोठी फौज तैनात करण्यात आली होती.

## शाळांमध्ये डॉ.आंबेडकरांना अभिवादन



### नू.म.वि.मराठी शाळा

नू.म.वि.मराठी शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सुवर्णा आळसंदे यांनी आपल्या काव्यातून व कथेतून डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच प्रभावती कोथिमिरे यांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या जीवन चरित्राचे विश्लेषण कवितेच्या माध्यमातून सादर केली. रेणुका हिरेमठ यांनीही आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या शील, समता, बंधुता या विषयावर विचार व्यक्त केल शर्वरी कांबळे इ.३ री आ च्या विद्यार्थ्यांनीनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सुवर्णा आळसंदे यांनी केले.



### शहा-कोठारी हायस्कूल

श्री नवलबाई फुलचंद शहा-कोठारी हायस्कूलमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरा करण्यात आली. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रशालेतील गौतमी जानराव, वैभवी सोलनकर, सुमित शिंदे या विद्यार्थ्याने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी माहिती आपल्या मनोगतात सांगून कविता सादर केले. जानराव एस. एस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आचार विचार आपल्या मनोगतात सांगितले. सूत्रसंचालन डी. बी. भांजे तर आभार एस. व्ही. काळे यांनी मानले.

### मेहता शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

नूतन प्रशालेच्या सहशिक्षिका लता बिराजदार यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. श्रावणी मस्के हिने आंबेडकरांविषयी गीत गायले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले मयुरी दुरूगकर यांनी अतिथींचा परिचय करून दिला. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी मनोगतातून आंबेडकरांचे कार्य विशद केले. शिक्षिका सुनेत्रा मोहोळकर यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीमती बिराजदार यांनी चांगला माणूस होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. नियामक मंडळाचे सदस्य सुरेश मंकणी यांनी शुभेच्छा दिल्या. भारती शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सुजाता यादव यांनी आभार मानले.

## सामाजिक समता सप्ताहनिमित्त डॉ. आंबेडकरांना अभिवादन

### संविधान उद्देशिकेचे झाले सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्थ जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या समता सप्ताहानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले.




सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर कार्यालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापौर विनायक कोंडयाल, आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते व समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंध कायदा अंतर्गत खून प्रकरणातील वारस आनंद भारत लोंढे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शासकीय नोकरीबाबत नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या व त्यांच्या विचारांचा प्रसार व सामाजिक समतेच्या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

## डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे अनुसरण करणे हेच खरे अभिवादन

### पालकमंत्री गोरे यांना केले डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे देशाच्या लोकशाहीचा पाया असून, त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे हीच खरी त्यांना अभिवादनाची भावना आहे. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. सोलापूर हे चळवळीचे केंद्र असून येथे येऊन डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्याचे भाग्य लाभल्याची भावना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केली.



डॉ. आंबेडकर यांची १३५ वी जयंती जगभरात उत्साहात साजरी होत असताना सोलापुरात पालकमंत्री गोरे यांनी महामानव बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण सामूहिक बुद्ध वंदना घेऊन डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. त्यावेळी पालकमंत्री गोरे बोलत होते. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी,आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, नगरसेवक गणेश वानकर, किसन जाधव, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, रॉकी बंगाळे आदी उपस्थित होते. यावेळी समाजकल्याण विभागाच्या माहिती पुस्तकेचे लोकार्पण करण्यात आले.

### नगरसेवकांना शिस्तीचे धडे देण्यासाठी विशेष शिबिर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात बोलताना, नगरसेवकांना शिस्तीचे धडे देण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार असून गरज भासल्यास शिस्तपालन समिती स्थापन केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

### सोलापुरातील भीम जयंती मिरवणुकीत सहभागी होणार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सोलापुरात येऊन त्यांच्या पुतळ्याचे दर्शन घेण्याचा वेगळाच आनंद आहे. रविवारी होणाऱ्या सांगता मिरवणुकीला आपण उपस्थित राहणार आहे, कारण राज्यातील सर्वात मोठी आंबेडकर जयंती मिरवणूक सोलापुरात निघते, असे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

### मोदी सरकारने महिला विधेयक संसदेत आणले

खरात प्रकरणी पोलिसांनी चौकशी केली असून कोणत्याही तक्रारीअभावी त्याला भोंदू ठरवले गेलेले नाही, असे त्यांनी सांगितले. काँग्रेसला महिला विषयावर बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. काँग्रेस पक्षाने आपल्या कार्यकाळात महिला विधेयकाला मंजुरी दिली नव्हती. त्यामुळेच केंद्रातील मोदी सरकारने महिला विधेयक संसदेत आणले. आधुनिक काळातील महिला आणि मुलींच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन करत त्यांनी मोदी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. ड्रग रॅकेट प्रकरणात संबंधित प्रत्येक व्यक्तीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व अटक झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

### खा. प्रणिती शिंदे यांचे वक्तव्य वस्तुस्थितीला धरून नाही

खासदार प्रणिती शिंदे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना, लोकशाही जिवंत असल्यामुळेच अशा प्रकारची वक्तव्ये केली जातात, असे गोरे म्हणाले. तसेच आम्ही सत्तेत आलो की लोकशाही धोक्यात येते आणि ते सत्तेत राहिले की लोकशाही जिवंत राहते, असे म्हणणे अयोग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डीपीसी निधीच्या मुद्द्यावर खासदार शिंदे यांनी केलेले वक्तव्य वस्तुस्थितीला धरून नसल्याचे पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४१३

**बोलो नेणें मुकें ।**
**वेडें वाचाळ काय निकें ।।**

इतर प्राण्यांच्या तुलनेत वाचा ही मानवाला मिळालेली फार मोठी नैसर्गिक देणगी आहे. ही देणगी मिळाली नसती तर मानवात आणि इतर पशूत कांहीच फरक राहिला नसता. केवळ वाचेमुळे माणूस इतर प्राण्यापेक्षा श्रेष्ठ झाला आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. पण कधी कधी माणसाकडून या वाचेचा एवढा दुरुपयोग होतो की, त्यावेळी या माणसापेक्षा पशू बरा असे वाटू लागते. काही लोकांच्या तोंडून एकही शब्द निघू नये असे वाटते. त्याचप्रमाणे कांही लोकांनी सातत्याने बोलतच रहावे व आपण त्यांचे बोलणे ऐकतच राहावे असेही आपणाला वाटत असते. यावरून वाचेचा सदुपयोग करायचा की दुरुपयोग हे ज्याचे त्यावर अवलंबून आहे, हे आपल्या लक्षात येते. जन्मतः काही लोक मुकी असतात म्हणून त्यांना आपले विचार हवे तसे व्यक्त करता येत नाहीत. मुके होणे हे मानवाच्या हाती नाही. त्यामुळे मुकेपणाला दोष देणे उचित नाही. पण ज्याला वाचा आहे आणि तो सतत व्यर्थ बरळत असतो, अशांचे जीवन व्यर्थ गेले असे म्हणणे संयुक्तिक होईल. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**बोलों नेणें मुकें । वेडे वाचाळ काय निकें ।।**

आपण दैनंदिन जीवनात पाहात असतो की, कांही लोक प्रसंगाचा विचार न करता त्यांना वाट्टेल ते बोलत असतात. सुख-दुःखाचा प्रसंगही त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाही. स्मशानात टिंगल-टवाळी करणारे तसेच मंगलप्रसंगी दुःखद, क्लेशकारक बोलणारे कांही कमी नाहीत. त्याचबरोबर कसलाही प्रसंग असला तरी आपले तोंड बंद ठेवणारेही कमी नाहीत. प्रसंगानुरूप तोंड बंद ठेवणे योग्य असले तरी सातत्याने बंद ठेवणे योग्य नसते. सासू-सासरे वाट्टेल ते आरोप करीत असतील तर सुनेने गप्पच राहावे असेही अपेक्षित नाही. नम्रपणे का होईना पण आपली बाजू मांडायला हवी. वरीष्ठ आहेत किंवा त्यांना बोलण्याचा अधिकार आहे म्हणून गप्प राहून कांहीही आरोप स्विकारणे चुकीचे असते. समोरच्याचा राग शांत होइपर्यंत गप्प बसणे योग्य असले तरी आपली बाजूच मांडूच नये असे मात्र नाही. आपल्या जीवनात असे अनेक प्रसंग येतात की ज्यात आपण आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतो. ज्याच्याबद्दल आपण सातत्याने अपशब्द बोलत आहोत, त्याचे जागेवर आपण असतो तर? असा विचार आपण करायला हवा. निसर्गाने आपणाला चांगले विचार, भावना व्यक्त करण्यासाठी वाचा दिली आहे. वाचेने होणारे शाब्दीक घाव हे शस्त्राने होणाऱ्या घावापेक्षा भयानक व तीव्र असतात. शस्त्राचे घाव औषधपाणी करून बुजवता येतात पण शब्दाने होणारे घाव बुजवता येत नाहीत. शस्त्राने शरीरावर जखमा होतात आणि शब्दाने हृदयावर, मनावर जखमा होतात हे लक्षात असू द्यावे. तसेच आपल्या प्रमाणे इतरांनाही आनंदाने जगण्याचा अधिकार आहे, याची जाणीव असावी. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीला डिजिटल गती

## ८ तासांत मंजुरी, रुग्णालयातूनच अर्ज प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**




राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने मिळावी, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाईन प्रणाली लवकरच सुरू होणार आहे. या नव्या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया केवळ कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार असून, उपचारासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

या प्रणालीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आता रुग्णाला स्वतः अर्ज करण्याची गरज राहणार नाही. रुग्णाने संबंधित रुग्णालयात आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर त्या रुग्णालयामार्फतच अर्ज थेट मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे.

कागदपत्रे नियमानुसार पूर्ण असल्यास अर्जावर तातडीने निर्णय घेतला जाणार असून, मंजुरीची प्रक्रिया आठ तासांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना कार्यालयीन प्रक्रियेची धावपळ करावी लागणार नाही आणि उपचाराला तत्काळ सुरुवात होऊ शकणार आहे.


गेल्या काही वर्षांपासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत रुग्णस्नेही बदल करण्यावर भर दिला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही नवी डिजिटल प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या माध्यमातून प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार असून, वेळेची बचत होणार आहे. गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना एकूण ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. या आकडेवारीवरून या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला जात असल्याचे स्पष्ट होते.

### ऑनलाईन प्रणाली विकसित होणार

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे मंजुरी प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. या नव्या प्रणालीचे उद्घाटन लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### स्वतःला ओळखा, जीवन आपोआप सुंदर होईल



स्वतःला ओळखा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि आपल्या अनंत क्षमतेला जागृत करा, आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात माणूस यश, आनंद आणि समाधानाच्या शोधात सतत धावत आहे; मात्र या शर्यतीत मी कोण आहे? हा मूलभूत प्रश्न अनेकदा दुर्लक्षित राहतो. याच प्रश्नाच्या उत्तरात जीवनाची खरी दिशा दडलेली असल्याचे प्रतिपादन परमपूज्य मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी आपल्या प्रेरणादायी अमृतवाणीतून व्यक्त केले.

स्वर्गीय भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वालचंद शिक्षण समूहाच्या वतीने डब्ल्यू.आय.टी. जैन टेम्पल येथे आयोजित ग्रीष्मकालीन वाचन कार्यक्रमात ते प्रबोधनपर विचार मांडत होते. जैन तत्त्वज्ञानातील आत्मओळखीची संकल्पना ही केवळ तात्त्विक नसून जीवनाला दिशा देणारी प्रक्रिया आहे.भीती, तुलना आणि लोक काय म्हणतील? या विचारांच्या ओझ्याखाली माणूस स्वतःची खरी ओळख हरवतो. आत्मा स्वतंत्र, शक्तिशाली आणि अनंत गुणांनी युक्त आहे, ही जाणीव आत्मविश्वास निर्माण करते, असे त्यांनी सांगितले.

आचार्य १०८ विद्यासागरजी महाराज यांचा कोऽहं? कति गुणाः? किम् मम सामर्थ्यम्? हा मंत्र आत्मचिंतनाचा मूलमंत्र आहे. गरुड आणि कोंबडीची कथा तसेच भिकाऱ्याच्या सुवर्णकथेच्या माध्यमातून त्यांनी आत्मज्ञानाच्या अभावामुळे माणूस स्वतःच्या क्षमतेपासून कसा दूर राहतो. दररोज आत्मचिंतन, स्वतःचे निरीक्षण आणि ध्येयाशी प्रामाणिक राहणे आवश्यक असल्याचा संदेश देत त्यांनी तरुणांना आवड आणि ध्येय यातील फरक समजून घेण्याचे आवाहन केले.



# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परीक्षा मानधनाचे दर सुधारित करा

### कॉलेज कर्मचारी युनियनची विद्यापीठाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परीक्षा मानधनाचे दर सुधारित करावे, अशी मागणी कॉलेज कर्मचारी युनियने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडे केली आहे.

याचे निवेदन विद्यापीठाचे परीक्षा व मुल्यमानपन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांना युनियनच्या वतीने देण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी, सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सचिव राजेंद्र गिड्डे, हनुमंत कारमकर आदी उपस्थित होते.

युनियनने दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, आय.टी. समन्वयक, लिपीक, परिचर, बेलमन व नाईट वॉचमन तसेच गोपनीय भत्त्यामध्ये २०१९-२० पासून या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधनात कोणतीही वाढ अथवा सुधारणा केलेली नाही. दरम्यानच्या काळात महागाई, कामाचा वाढलेला व्याप व जबाबदाऱ्या लक्षात घेता विद्यमान दर कालबाह्य ठरत आहेत. तरी वर्तमान परिस्थितीचा सखोल विचार करून सुधारित दर निश्चित करावे.

# ...तर आरोग्य सेवा सक्षम होऊ शकते

### साथी पुणे व अस्तित्व संस्थेतर्फे महिला आरोग्य समितीची कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

शहरातील आरोग्य प्रश्न प्रभावीपणे सोडवण्यासाठी महिलांचे संघटन अत्यंत महत्त्वाचे असून, यामध्ये महिला आरोग्य समित्या (मास) केंद्रस्थानी आहेत. मासचा योग्य आणि सक्रिय वापर झाला तर शहर पातळीवरील आरोग्य सेवा अधिक सक्षम होऊ शकतात, असे मत साथी संस्थेच्या शकुंतला भालेराव यांनी व्यक्त केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने अनुसंधान ट्रस्ट 'साथी' संस्था आणि अस्तित्व संस्था, सोलापूर यांच्या माध्यमातून सोलापूर शहरातील विडी घरकुल, रामवाडी, जिजामाता आणि दाराशा या चार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील ५० महिला आरोग्य समिती सदस्यांचे सक्षमीकरण आणि सक्रिय करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून महिला आरोग्य समित्यां संदर्भात आशांचे प्रशिक्षण समाजकल्याण केंद्र येथे आयोजित करण्यात आला होते. अस्तित्व संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते शहाजी गडहिरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी तब्बू नगारे यांनी महिला आरोग्य समित्यांनी केलेल्या कामाचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन पल्लवी वडणे यांनी केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. १५ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - चैत्र कृ. त्रयोदशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पू भाद्रपदा (१५.२२)
योग - ब्रम्हा (१३.२४)
करण - गरज (११.२७)
राहू काल : बुधवार
दु. १२.०० ते १.३०

दिनविशेष :
१७९४: मराठी पंडित कवी मोरोपंत यांचे निधन.
१९२३: मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी इन्सुलिन सामान्य वापरासाठी उपलब्ध झाले.
१९३२: सुप्रसिद्ध मराठी कवी आणि गझलकार सुरेश भट यांचा जन्म.
१९६३: माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज प्रभाकर यांचा जन्म.
२०१३: संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक वि. रा. करंदीकर यांचे निधन.

# लोकशाही हाच जीवन जगण्याचा मार्ग : डॉ. राक्षसे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**




लोकशाही हाच आपला जीवन जगण्याचा मार्ग असावा, असे प्रतिपादन टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, तुळजापूर येथील संचालक डॉ. बाळ राक्षसे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा' अंतर्गत विशेष व्याख्यान व पुस्तक प्रकाशन समारंभ पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बाळ राक्षसे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, समन्वयक डॉ. गौतम कांबळे, परीक्षा विभाग संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, डॉ. प्रभाकर कोळेकर तसेच विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. केदारनाथ काळवणे उपस्थित होते. तर राजाभाऊ सरवदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सोलापूरशी असलेले ऐतिहासिक व सामाजिक ऋणानुबंध विषद केले. यावेळी निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. य



# अण्णासाहेब पाटील योजनेच्या धोरणामध्ये केलेले बदल मागे घ्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय एम.डी., संचालक यांनी ऑक्टोंबर २०२५ नंतर योजनेचा लाभ घेण्याच्या प्रक्रियेत केलेले बदल मागे घेण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन करु, असा इशारा मराठा समाजाच्यावतीने देण्यात आला आहे.

मराठा समाजाच्या लाभार्थ्यांना LY लवकर मिळत नाही. महामंडळाकडून वाहन कर्ज बंद करण्यात आले आहे आणि व्याज परतावा वेळेत मिळत नाही.

पात्रता प्रमाणपत्र देण्यासंदर्भात दि. ८ ऑक्टोंबर २०२५ पूर्वी कार्यान्वित असलेली नियमावलीच लागू करावी.

प्रमाणपत्रासाठी लागू केलेली विशिष्ट उत्पन्न मर्यादेची अट तात्काळ रद्द करावी. वाहन कर्ज व्यवसायासाठी अर्ज करणाऱ्या लाभाथ्यर्थ्यांना योजनेचा लाभ द्यावा व लाभार्थ्यांना व्याज परतावा कमीत कमी वेळेत मिळण्यासाठी योग्य नियोजन करावे. अश्या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी राम जाधव, युवराज पाटील, किरण क्षीरसागर, अमित जाधव, शुभम खाटमोडे उपस्थित होते.



# कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक महापुरुषांचे विचार

### डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संत गाडगेबाबा, बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केले आणि शिक्षणाची गंगोत्री समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविली. कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक महापुरुषांचे विचार एकवटलेले दिसून येतात; असे गौरवोद्गार संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी काढले.

कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड आयोजित तिसरे राज्यस्तरीय कर्मवीर भाऊराव पाटील साहित्य संमेलन संमेलनाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्घाटक माधव गादेकर, माजी आ. बब्रुवान खंदाडे, अध्यक्ष बी.आर. कलवले, स्वागताध्यक्ष लक्ष्मण कारले, ललिता सबनीस, सत्कारमूर्ती कुमार करजगी, डॉ. ऋत्विक जयकर, दिगंबर ढेपे, संयोजक पत्रकार भरतकुमार मोरे, महापौर नलिनी चंदिले, प्रा. भीमाशंकर बिराजदार, विजयकुमार कांबळे, श्रीकांत बोराडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी भरतकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उद्योजक डॉ. कुमार करजगी यांना जीवनगौरव पुरस्काराने तर डॉ. ऋत्विक जयकर (वैद्यकीय), ह.भ.प. विठ्ठल माने (धार्मिक), दिगंबर ढेपे (शैक्षणिक) यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला यामप्रसंगी दत्तात्रय इंगळे, विजयकुमार सोनवणे, प्रिया चौधरी, किशोर जाधव यांच्या साहित्यकृतीचे प्रकाशन झाले. दुपारच्या वेळेत 'कर्मवीर भाऊराव पाटील यांची शैक्षणिक दृष्टी व सध्याचे शैक्षणिक धोरण' या विषयावर डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला यात प्रा.डॉ. अनिता शिंदे, प्रा. डॉ. जयदथ जाधव, प्रा.डॉ. जयदेवी पवार, हे सहभागी झाले दुपारी कवी दत्तात्रय इंगळे यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाकवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी नरेंद्र गुंडेली, दस्तगीर जमादार, भगवान चौगुले, राजश्री जाधव, सुरेश निकंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. सायंकाळी राजेंद्र पाराध्ये (शैक्षणिक), नानासाहेब मोरे, देविदास कसबे (समाजभूषण,) अगंद जाधव (सामाजिक), ॲड. कोमल ढोबळे, ॲड. गोविंद सूर्यवंशी (विधी), नागनाथ गायकवाड, उत्तरेश्वर मठपती, किशोर जाधव (सर्व साहित्यिक), डॉ. सिद्धेश्वर करजखेडे (वैद्यकीय), दत्ता वाघमारे (उद्योग) यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंजना गायकवाड, आभार प्रदर्शन बी. आर. कलवले यांनी केले.

# १६ एप्रिलला जिल्हा परिषद सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

जिल्हा परिषद सोलापूर यांच्यावतीने नव्याने निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. १६ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद येथे पार पडणार आहे.

कार्यशाळेत विविध मान्यवर तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.वि.) जिल्हा परिषद सोलापूर श्रीमती स्मिता पाटील, डॉ. मल्लिनाथ कळसंगे (उपसंचालक तथा संचालक, यशदा, पुणे), सुरेश पाटील (मा. सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद पुणे), गिरीश पिंपळनेर (अति. मुख्य कार्यकारी अधिकारी), आनंद पुरसवळे (उपसंचालक, रा.ग्रा.वि.सं.), तसेच रमेश जाधव (उपसंचालक वित्त व सहायक प्राध्यापक) यांचा समावेश आहे.

# आजपासून निराळे वस्ती येथे शिव महापुराण कथा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

निराळे वस्ती येथील श्री विठ्ठल मंदिर - श्री संत तुकाराम भजनी मंडळ यांच्यातर्फे ह.भ.प. सावता बाबा जांभळे महाराज यांच्या १६ व्या पुण्यस्मरणार्थ १५ ते २२ एप्रिल दरम्यान कथाकार गुरुदासी परमेश्वरी महाराज परभणे यांच्या शिवमहापुराण कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे विश्वस्त दत्तात्रय महाराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कथा सोहळ्यानिमित्त आज (मंगळवारी) १४ एप्रिल रोजी दुपारी तीन ते सहा ग्रंथ दिंडी काढण्यात आली.या ग्रंथदिंडीचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख, माजी महापौर मनोहर सपाटे, नगरसेवक अमोल शिंदे, क्रांती तालीम तरुण मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, नगरसेविका मनोरमा सपाटे, नगरसेवक मनीष केत, संकेत पिसे, विशाल कणसे आदींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. उद्या (बुधवार) पासून या कथेस प्रारंभ होणार असून कथाकार गुरुदासी ह.भ.प. परमेश्वरी परभणी महाराज या शिवमहापुरान कथा सांगणार आहेत .यानिमित्त ग्रंथ पूजनाचा कार्यक्रम निळोबा महाराज जांभळे, सुधाकर महाराज इंगळे, लक्ष्मण महाराज चव्हाण, हनुमान महाराज पोटरे, पांडुरंग महाराज जांभळे, बळीराम महाराज जांभळे यांच्या हस्ते होणार आहे.

यानिमित्त बुधवारी शिव महात्मे या विषयावर कथा होणार असून १६ रोजी नारद कथा ,१७ रोजी शिव पूजन विधी अठरा रोजी उत्पत्ती १९ रोजी शिव पार्वती विवाह कार्तिक व गणपती जन्म, २१ रोजी बारा ज्योतिर्लिंग कथा करण्यात येणार आहे. तसेच २२ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तन केसरी ह. भ. प. अक्रूर महाराज साखरे यांचे गुलालाचे कीर्तन होणार असून याच दिवशी सायंकाळी पाच ते सात या वेळेत हभप गुरुवर्य साध्वी सोनाली दीदी करपे यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता केली जाणार असल्याचे शिंदे महाराज यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस युवा नेते ज्ञानेश्वर सपाटे, पांडुरंग महाराज जांभळे, उत्तम महाराज कुटे, शिवाजी भोसले, महादेव खरसाडे, संजय केसरे, अनिल शिंदे आदी उपस्थित होते.



# हिराचंद नेमचंद कॉलेजमध्ये महात्मा फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथे आज क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीनिवास जगताप, प्रा. डॉ. वरुण हसबनीस, प्रा. पी. वाडकर, ग्रंथपाल डॉ. लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन विद्यार्थी प्रतिनिधी निहार घाडगे, आकीब शेख व महेश गुजरे यांनी यशस्वीपणे पार पाडले.

## महत्वाचे...



### डोंगरगाव येथे शिवणकलेच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

**सांगोला, दि.१४ एप्रिल-**

समता प्रशिक्षण केंद्र, डोंगरगाव (ता.सांगोला) येथे प्रथम कम्युनिटी कौशल्य प्रशिक्षण कॅम्प अंतर्गत शिवणकला प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सुधाकर सर, बापूसाहेब ठोकळे, ललित बाबर, शहाजी गडहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नंदा रोकडे, राजेश ठोकळे, सुरेश बाबर, शर्मिला केदार, सीमा गवळी, प्रभा यादव, भावना बाबर उपस्थित होत्या.

### शारदा गजभिये यांना मोहोळचा पंचशील रत्न पुरस्कार

**मोहोळ, दि. १४ एप्रिल-**



येथील पंचशील मंडळाच्या वतीने प्रत्येक वर्षी दिला जाणारा पंचशील रत्न पुरस्कार यावर्षी सोलापूरच्या धम्म प्रचारक शारदाताई गजभिये यांना देण्यात येणार असून१६ एप्रील रोजी त्यांना सन्मानित केले जाणार असल्याची माहिती पंचशील मंडळाचे अध्यक्ष शशीकांत ठोकळे, जयंती उत्सव मंडळ अध्यक्ष विशाल रोडे यांनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पंचशील क्रीडा शिक्षण व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने प्रत्येक वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने बौद्ध धम्म प्रचाराचे प्रचाराचे काम करणाऱ्या एका व्यक्तीची निवड करून त्यांना या मंडळाच्या वतीने पंचशील रत्न पुरस्कार, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन सन्मान केला जातो. मोहोळ विधान सभा मतदार संघाचे आमदार राजू खरे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित केले जाणार असल्याची माहिती मंडळाचेवतीने शशीकांत ठोकळे विशाल रोडे यांनी जाहीर केले यावेळी संस्थापक अशोक पाचकुडवे, धनंजय जगताप, हनुमंत भडकवाड, सुनील गायकवाड, संजय आठवले, आदर्श ढवळे अक्षय आठवले दीपक मडीखांबे, सुरज पाचकुडवे आदी उपस्थित होते.



### जळोली जिल्हा परिषद शाळेस आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

**करकंब, दि. १४ एप्रिल-**

जळोली जि.प.प्रा.शाळेस मरवडे येथील श्री.छत्रपती परिवाराचा जिल्हा स्तरावरील आदर्श शाळा पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षिका, शाळांनी आणखी जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने मरवडे येथील श्री. छत्रपती शिवाजी परिवाराच्या वतीने आदर्श शाळा, आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या शाळेमध्ये सर्व पालक, पदाधिकारी, शिक्षक यांच्या माध्यमातून शाळेचा कायापालट झाला असून शाळेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी शाळेने राबविलेल्या विविध उपक्रामांच्या वार्षिक अंकाचे प्रकाशनही करण्यात आले. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापक जयवंत कापसे, शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे, नागनाथ गायकवाड, सिध्देश्वर लोंढे, कैलास नरसाळे, बाळासाहेब खांडेकर, शिक्षिका देवकी कलढोणे-दुधाणे अधिक परिश्रम घेत आहेत.



### निर्भय पथकाची माचणूर शाळेस भेट; मुलींच्या अडचणी जाणून घेतल्या

**मंगळवेढा, दि. १४ एप्रिल-**

मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या निर्भया पथकाने माचणूर येथील श्री सिध्देश्वर प्रशालेला अचानक भेट देवून तेथील उपस्थित मुलींच्या अडीअडचणी समजून घेतल्या. दरम्यान मुलींच्या काही तक्रारी असल्यास त्यांनी गुप्तपणे शाळेच्या तक्रार पेटीत टाकाव्यात असे आवाहन पथक प्रमुख महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ.आरती कणेरी यांनी केले आहे. मंगळवेढा पोलीस प्रशासनाने शालेय मुलींच्या तक्रारीसाठी खास निर्भया पथक स्थापन केले असून हे पथक शहरातील व ग्रामीण भागातील शाळा कॉलेजवर जावून मुलींना कोण त्रास देत आहे का? या बाबत शहनिशा या पथकाकडून केली जात आहे. सोमवार दि.१३ रोजी या पथकाने श्री सिध्देश्वर हायस्कूल माचणूर,दामाजी हायस्कूल मंगळवेढा,मंगळवेढा एस.टी.बसस्थानक आदी ठिकाणी भेटी देवून मुली बाबत कोणाची तक्रार आहे का? याबाबत प्रत्यक्ष पडताळणी केली. यावेळी शालेय विद्यार्थिनींना डॉ.आरती कणेरी यांनी डायल क्रमांक ११२ बद्दल माहिती दिली व मुलींच्या तक्रारी जाणून घेतल्या. काही अडचणी असल्यास शाळेतील तक्रार पेटीत तक्रारी लिखीत स्वरुपात टाकाव्यात. अन्य कोण छेडछाड करत असेल तर निर्भया पथकाशी तात्काळ संपर्क करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सोमवार आठवडी बाजार असल्याने आठवडी बाजारातून या पथकाने पेट्रोलींग केले.

# जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. १४ एप्रिल–**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध सामाजिक संस्था, राजकीय संघटना आणि शैक्षणिक संस्थांच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. 'जय भीम'च्या जयघोषाने आणि निळ्या ध्वजांनी संपूर्ण जिल्हा भारावून गेल्याचे चित्र पाहायला मिळाले. केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत यावर्षी अनेक विधायक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काही संघटनांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करून गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला, तर काही संस्थांनी गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या.



### करकंबच्या न्यू. इंग्लिश स्कूलमध्ये दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन

न्यू इंग्लिश स्कूल करकंब (ता.पंढरपूर) येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लहानपणापासून त्यांच्या महापरिनिर्वाण दिनापर्यंतच्या दुर्मीळ अशा ४०० छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. नाविन्यपूर्ण प्रदर्शनाबद्दल प्रशाला तसेच या प्रदर्शनाचे संकल्पक अविनाश देवकते यांचे अभिनंदन केले. या प्रदर्शनास भेट देण्यासाठी आंबेडकर प्रेमी नागरिकांनी गर्दी केली होती. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल आमदार सावंत यांनी समाधान व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील दुर्मिळ अशी छायाचित्रे करकंबसारख्या ग्रामीण भागामध्ये बघावयास मिळाली याचा मनस्वी आनंद वाटला, असे मनोगत व्यक्त केले.



### महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बाळे

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळा निमित्त महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध शाखेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महा, इंदिरा प्रशाला तसेच राजीव प्राथमिक शाळा, शरद बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने हा जयंती सोहळा साजरा करण्यात आला. भारतरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन बाळे प्रभागाचे नगरसेवक बिजूअण्णा प्रधाने, नगरसेविका मंदाकिनी ताई तोडकरी, नगरसेविका अलका भवर, आनंद भवर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मोहनराव घोडके मुख्याध्यापक मधुकर मुळे, मुख्याध्यापक शिवाजी आतकरे, जगताप आदींनी अभिवादन केले. अशोक एडके, आनंदी कनकधर, धनश्री कदम, समृद्धी कदम आदी विद्यार्थ्यांनी मनोगती व्यक्त केली. नगरसेविका मंदाकिनीताई तोडकरी यांनी क्रांतीसुर्य, भारतीय संविधानाचे शिल्पकार, मानवी हक्कांचे कैवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा सांगितला. तसेच प्रमुख वक्ते संतोष काळुके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन निवृत्ती दळवी यांनी केले तर आभार विद्या पुजारी यांनी मानले.

## मंगळवेढ्यात सायकलस्वारांकडून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन



येथील वारी परिवार सायकल क्लबमधील सायकलस्वारांकडून मंगळवेढा-पंढरपूर-मंगळवेढा अशी सायकल राईड काढून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. दि. १४ एप्रिल रोजी जयंतीचे औचित्य साधून वारी परिवार सायकल क्लबच्या सदस्यांनी पंढरपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मंगळवेढा येथील दोन्ही जयंती उत्सव मंडळाच्या डॉ आंबेडकरांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यावरण प्रेमी होते. अशा महापुरुषास त्यांच्याच विचारातून नमन करण्यासाठी ५० किलोमीटर सायकलिंग करून खरोखरच कृतियुक्तआणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, हर घर संविधान, घर घर संविधानचा नारा देत महाराष्ट्र सरकारच्या घर घर संविधान उपक्रमाचा जागर घालण्यात आला. यावेळी जयंती उत्सव मंडळाचे पंकज पराध्ये,अजय गाडे यांनी सर्व रायडर्सचे स्वागत केले. या अभिवादन सायकल राईडमध्ये सागर लंगोटे, राहुल सावंजी, चंद्रजित शहा, प्रफुल्ल सोमदळे, नंदकुमार नागणे, नागेश डोंगरे, रवि जाधव, अविनाश जाधव, राहुल बनसोडे, विवेक वाले, कमलेश माळी, डॉ. राहुल शेजाळ, प्रा. विनायक कलुबर्मे, सतिश दत्तू आदी यांनी सहभागी होते.

### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वीरेश थळंगे तर श्री शंकरलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा वळसंग गावचे माजी सरपंच श्रीशैल दुधगी यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. शिक्षक गंगाधर बिराजदार व कलाशिक्षक अजय माणकोजी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



जीवनावर आधारित काव्याचे गायन करून उपस्थितांची मने जिंकली. पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. या दिनानिमित्त घेण्यात आलेल्या भाषण स्पर्धेत श्रावणी माशाळ, ऋतुजा पारे व राधिका काळमंडे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. यशस्वी व इतर सहभागी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, सिद्धारूढ हिरेमठ, बसवराज दुधगी,विरेश थळंगे,संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, प्राध्यापक संतोष शिंदे, शिवराज अष्टगी, प्रा. शरणय्या मसुती, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी, सुनिता कुर्ले उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार तानाजी जमादार यांनी मानले.

## टायगर ग्रुप, अक्कलकोट



विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त अक्कलकोटमध्ये टायगर ग्रुपच्यावतीने गरजू मुलींना सायकल वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अक्कलकोट नगर परिषदेचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, नगरसेवक यशवंत धोंगडे, नगरसेवक अशोक जाधव, उद्योगपती सिद्धाराम टाके,बालाजी पाटील,अतिष पवार, अभि लोकापुरे, प्रवीण देशमुख, प्रवीण घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी जयंतीच्या माध्यमातून टायगर ग्रुपने केलेल्या सामाजिक कार्याचे स्तुती केली व उपस्थितांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. मंडाळाच्या वतीने या शालेय मुलींना सायकल वाटप करण्यात आले. प्रज्ञा घटकांबळे, दिव्या दत्तात्रय गायछोडे, विजयालक्ष्मी घटकांबळे, पोर्णिमा कोळी, रुपाली बनसोडे, साक्षी दसाडे, प्रतिक्षा नडगेरी, विजयालक्ष्मी कदम यांना सायकल देण्यात आले. यावेळी सागर शिरसाट, अमर भाऊ शिरसाट, निशांत निंबाळकर, इरु गवंडी, उमेश गवंडी, सिद्धू वाले, राहुल वाले, बिरू सरवदे, ऋषी गवंडी, आशिष चव्हाण, यल्लाप्पा माशाळकर, शरनु किणीकर, अभी जगताप, फरहान शेख, गणेश पवार, शिवम माने, सूरज जगताप , महादेव आडवीतोटे, चंद्रु कलाल, पिंटू शिंदे, शुभम बहिरेवार, शैलेश गवळी, आदित्य कलाल, समर्थ गवळी, दत्ता गवंडी, साई बनसोडे, राहुल तालिकोटे, योगेश कांबळे, रवी तालीकोटे, सनी कांबळे, प्रभू गवंडी, विशाल मोहिते, सचिन बिराजदार, रेहान नदाफ, फैजान शेख, स्वामीनाथ राजापूर, सत्यम शिरसाट, शिवम शिरसाट, राहुल जाधव, विजय गवंडी, सुमित माळी, काशिनाथ गवंडी, शिवशंकर गवंडी, समर्थ सोनके, रोहित सरसंबे, रोहन सरसंबे, समर्थ जमादार, शिवराज माळी, पवन सरसंबे उपस्थित होते.



### वखारिया विद्यालय, बार्शी

तालुक्यातील उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, ग्रामस्थ शिक्षणप्रेमी मयूर ताटे, कुरुंद यांचे हस्ते बोधीसत्व, भारतरत्न, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, समतेचे तत्व देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभागाचे सहशिक्षक डॉ. प्रशांत काशीद यांनी केले होते.



### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बार्शी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बार्शी तालुक्याच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त पुतळा पार्क येथील पुतळ्यास समोर सघोष मानवंदना देण्यात आली. यावेळी जिल्हा कार्यवाह ऋषीकेश कुलकर्णी, तालुका संघचालक आनंद सोमाणी, तालुका कार्यवाह अरुण ग्रामोपध्ये तसेच घोष प्रमुख ॲड. राहुल देशमुख, कार्तिक गुरव व संघाच्या स्वयंसेवकातरफे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन मानवंदना देण्यात आली. त्यानंतर संघ कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन स्वयंसेवकामारफत अभिवादन करण्यात आले. यावेळी बहुसंख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.



### लोकविकास संस्था, वेळापूर

वेळापूर येथील लोकविकास मराठी मिडियम स्कूल, इंग्लिश मिडियम स्कूल व लोकविकास ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शिवन्या बनकर, वरद शिनगारे, शिवसृष्टी पताळे व अनुष्का पांढरे या विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या समता, शिक्षण व सामाजिक न्यायाच्या विचारांवर भाष्य केले. तर शिक्षक राया वाघमारे यांनीही विद्यार्थ्यांना बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास प्राचार्य अमोल पांढरे, मुख्याध्यापक सुनिल पताळे, सुनिल शिनगारे उपस्थित होते. सूत्रसंचालन वैभव जगताप यांनी केले तर आभार विद्या जंगम यांनी मानले.



### वेळापूर जि.प. शाळा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शांतता आणि समानतेचे मूल्य शिकवले असे मत वक्ते राजाराम गुजर यांनी वेळापूर जिल्हा परिषद मुली शाळेत आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सौ मनीषा भानवसे या होत्या. प्रमुख पाहुणे औदुंबर माने व पत्रकार बाळासाहेब बनसोडे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी यांनी केले यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली विविध स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन नितीन चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन किरण घाडगे यांनी केले. कार्यक्रमासाठी आसराबाई जैन, पांडुरंग कुलकर्णी, कविता आवटे उपस्थित होते.



### पाटील स्वायत्त महाविद्यालय, पंढरपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पंढरपूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती व प्राध्यापक प्रबोधिनी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून झाली. यावेळी डॉ. बाळासाहेब बलवंत, उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, डॉ. समाधान माने, उपप्राचार्य डॉ. सुशीलकुमार शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे, डॉ. दत्तात्रय डांगे, डॉ. उमेश साळुंखे, चौरंगनाथ वाघमारे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय डांगे, आभार डॉ. उमेश साळुंखे यांनी मानले.

# करकंब येथे विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१४ एप्रिल-**
करकंब (ता. पंढरपूर) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एसटी बसस्थानकाच्या पटांगणात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला.

डॉ.बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन मध्यरात्री मध्यवर्ती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले. जय भीम व डॉ .बाबासाहेबांच्या नामघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी विविध राजकीय पक्ष, संघटना यांचे पदाधिकारी,अधिकारी व कार्यकते उपस्थित होते. त्यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रामपंचायत व तलाठी कार्यालय, रामभाऊ जोशी हायस्कूल, अमोल पब्लिक स्कूल, आदर्श प्रशाला, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



## डॉ. बाबासाहेबांना अभिवादन



### हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद (ता.सांगोला) येथे साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस किशोर बनसोडे, वाचनालयाचे व जय हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तात्यासाहेब केदार-सावंत, दलित मित्र साबळे गुरूजी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास शिवदास चंदनशिवे, दादासाहेब ऐवळे, सदानंद सावंत, अरूण ऐवळे, यश ऐवळे, भास्कर ऐवळे, कुंदन ऐवळे, उदय ऐवळे, रोहन चंदनशिवे, सौरभ चंदनशिवे, समाधान भोसले, आदित्य सावंत, साहिल ऐवळे, भिमराव ऐवळे, नवनाथ ऐवळे, संतोष सावंत, मायाप्पा ऐवळे, आशिष ऐवळे, अक्षय चंदनशिवे, राहुल ऐवळे, अशोक ऐवळे, संतोष ऐवळे, सचिन ऐवळे, दयानंद चंदनशिवे, मृणाल सावंत, कुमार ऐवळे, अतुल चंदनशिवे, आकाश सातपुते, क्रांती सातपुते, मोहन ऐवळे, दगडू ऐवळे, मुकेश ऐवळे, सागर ऐवळे, शैलेश ऐवळे, स्वप्नील ऐवळे, समाधान ऐवळे, शहाजी लांडगे उपस्थित होता. ग्रंथालय कर्मचारी संतोष मोरे यांनी आभार मानले.



### बागल विद्यालय, कुंभेज

दिगंबरराव बागल विद्यालय कुंभेज (ता. करमाळा) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक हनुमंत पाटील यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमात शिक्षक कल्याणराव साळुंके, सीताराम बनसोडे, संतोष शिंदे व विष्णू पोळ, दादा जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. शिक्षक कल्याणराव साळुंके यांच्या वतीने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शालोपयोगी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. मुख्याध्यापकांचे हस्ते हे साहित्य वितरित करण्यात आले. प्रस्ताविक संतोष शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन सीताराम बनसोडे यांनी केले. शेवटी कल्याणराव साळुंके यांनी आभार मानले. कार्यक्रमास किशोर कदम, बलभीम वाघमारे, संतोष घोरपडे, नंदू कांबळे यांनी परिश्रम घेतले.




### पंढरपुरात डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास प्रशासनाच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, मध्यवर्ती जयंती समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, उपाध्यक्ष विशाल मांदळे, कार्याध्यक्ष महेश मोटे उपस्थित होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिता भालके व प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पूजन व पंचशील ध्वज लोकार्पण करण्यात आले. तसेच महाड (जि. रायगड) येथील चवदार तळे येथून पायी आणलेल्या भीम ज्योतीचे स्वागत आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत ढगळे यांच्यावतीने अभिवादन स्थळी करण्यात आले.



### वर्धमान जैन वाचनालय, बार्शी

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात म हामानव भारतरत्न, बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वाचनालयाचे ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक प्रमोद भंडारी व श्री जैनाश्रमचे ऑ. सेक्रेटरी ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. वाचनालयाचे पदाधिकारी व संचालक मंडळ उपस्थित होते. ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बी.एम.जाधव, भारत गोणेकर, सलीम शेख, मधुकर गोणेगावकर उपस्थित होते. संचालक प्रमोद भंडारी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, सहा. ग्रंथपाल शितल लुकडे, क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## भीमगीतांनी रंगला सोहळा; लाभार्थ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा परिषदेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. 'जय भीम'च्या घोषणांसह आणि प्रेरणादायी भीमगीतांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले.

जिल्हा परिषद आवारातील संविधान कोनशिलेला अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती ॲड. अमृता वाघे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित मुख्य कार्यक्रमात दीपप्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भीमशाहीर संदीप शिंदे प्रबोधन मंच, सोलापूर यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या भीम गीतांनी सभागृह दणाणून गेले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. पुणे येथील व्याख्याते निलेश विमल धायरकर यांनी 'राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर प्रबोधनपर मार्गदर्शन करताना बाबासाहेबांच्या विचारांचा विविध अंगांनी ऊहापोह केला. त्यांनी भाषावाद, प्रांतवाद टाळण्याबाबत बाबासाहेबांची दूरदृष्टी स्पष्ट केली. कार्यक्रमात समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांतील लाभार्थ्यांचा तसेच आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी बाबासाहेबांनी लिहिलेल्या हिंदू कोड बिलाचा उल्लेख करत महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची तसेच जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध समाजकल्याण योजनांची माहितीही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास गुरव यांनी केले. कल्याण श्रावस्ती यांनी आभार मानले.



### सर्व क्षेत्रात बाबासाहेबांचे योगदान : सीईओ जंगम

देशाच्या सर्वांगीण विकासात डॉ. आंबेडकर यांचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले. त्यांना एका सम ाजापुरते मर्यादित न ठेवता सर्वसमावेशक दृष्टीने पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यात बाबासाहेबांचे योगदान अधोरेखित करत त्यांनी त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवून दिले.

### शिक्षण हे वाघिणीचे दूध' : अध्यक्ष दीपक वैद्य

अध्यक्ष दीपक वैद्य यांनी बाबासाहेबांचा प्रसिद्ध विचार उद्धृत करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; ते पिल्यानंतर अन्यायाविरुद्ध आवाज उठतो, असे सांगत त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला.

### कास्ट्राईब संघटनेच्या वतीने मिठाईचे वाटप

जयंती निमित्त कास्ट्राईब संघटनेचे वतीने उपस्थित सर्वांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे हस्ते मिठाईचे वाटप करणेत आले. कास्ट्राईब संघटनेचे जिल्हा अरूण क्षिरसागर यांनी ही परंपरा अनेक वर्षा पासून कायम ठेवली आहे. संघटनेचे उमाकांत राजगुरू, योगेश कटकधोंड, शंकर चलवादी, धन्यकुनार राठोड यांनी मिठाई वाटप करणे साठी परिश्रम घेतले.

### भिमगितांनी दणाणले सभागृह

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात भिम शाहिर संदिप शिंदे प्रबोधन मंच सोलापूर, सादरकर्ते प्रा. जिवन संदिप शिदे व संच यांनी भीम गीत गायन केले. समाज कल्याण विभाग व कास्ट्राईब संघटनेचे वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. बाबासाहेब यांचे जीवनावरील कार्याची भिमगिते या वेळी सादर करून सभागृह दणाणून सोडले.

# चंद्रभागा नदीत आत्महत्या करणाऱ्या महिलेचे वाचविले प्राण; पोलिसांकडून समुपदेशन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ एप्रिल -**
घरातील किरकोळ कौटुंबिक वादातून तालुक्यातील गोपाळपूर येथील एका महिलेने चंद्रभागा नदीत आत्महत्या करण्यासाठी पात्रात उतरलेली होती. मात्र कोळी समाज बांधवानी ( जीवरक्षकांनी ) संबंधित महिलेचे प्राण वाचविले. ऐवढ्यावरच जीवरक्षक थांबले नाहीत तर त्यांनी ही माहिती येथील पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांकडून संबंधित महिलेचे समुपदेशन करण्यात आले.

येथील चंद्रभागा नदी पुंडलिक मंदिर जवळ स्वप्नाली विवेक गुरव (रा.गोपाळपूर, ता.पंढरपूर) ही महिला घरामध्ये झालेला किरकोळ कौटुंबिक वादामुळे पाण्यामध्ये आत्महत्या करण्यासाठी पाण्यात उतरली होती अशी माहिती पाण्यात बुडणाऱ्यांना वाचवणारे जीव रक्षक लीडर गणेश अंकुशराव यांनी दिली. यावेळी या जीवरक्षकांनी संबंधित महिलेचे प्राण वाचविले. त्या नंतर ही माहिती या जीवरक्षकांनी येथील पोलिसांना कळविली.



दरम्यान येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या आदेशानुसार शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे व सोबत महिला फौजदार खडके यांनी चंद्रभागा नदीच्या ठिकाणी पोहचुन या महिलेस मन परिवर्तन करून त्या ठिकाणी महिलेला ताब्यात घेऊन तिचे समुपदेशन करण्यात आले.

समुदेशानंतर संबंधित महिलेस पुन्हा तिच्या कुटुंबाच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती येथील शहर पोलिसांनी दिली. या वेळी सामाजिक कार्यकर्ते गणेश अंकुशराव, राजाभाऊ बळवंतराव, सुरज कांबळे, आप्पा कांबळे उपस्थित होते.




# माढा येथे भारतरत्न डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**
भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कंपनी ग्रुपच्या वतीने तर संविधान चौक येथे बीबीएस मंडळाच्या वतीने बाबासाहेबांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले

याप्रसंगी माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे, दादासाहेब साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, राजाभाऊ चवरे, झुंजारनाना भांगे, गुरूराज कानडे, गंगाराम पवार, राहुल लंकेश्वर,शहाजी साठे,आनंद भांगे, डॉ. विकास मस्के, सुधीर लंकेश्वर, दिनेश जगदाळे, आजिनाथ माळी, विकास साठे, नितीन साठे, सचिन साबळे नगरसेविका संजीवनी भांगे अर्चना कानडे, रेश्मा लंकेश्वर, शबाना बागवान, मोहिनी नेटके, निर्मला थोरात, वंदना लंकेश्वर, सुनिता राऊत, गणेश मोरे, शहाजी ढावरे, किरण पवार, अशोक माने, रवी सरवदे यशपालन लंकेश्वर उपस्थित होते. बीबीएस मंडळाचे सुधीर लंकेश्वर व सभापती रेश्मा लंकेश्वर यांच्या वतीने संविधान चौकात निळ्या झेंड्याचे मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शहरामध्ये माढा नगरपंचायत, राजरत्न नगर येथे मध्यवर्ती मंडळ, इंदिरानगर पंचशील मंडळ, वादळ ग्रुप , रमाई तरूण मंडळ कुटे प्लॉट शिवाजीनगर,बाबासाहेब आंबेडकर वाचनालय आदी ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

## गोवी गल्ली येथे नगरपालिकेने गतिरोधक करण्याची मागणी

**मंगळवेढा, दि. १४ एप्रिल-**
मंगळवेढे शहरातील गोवी गल्ली येथे नगरपालिकेने गतिरोधक करावेत अशी मागणी एका दिव्यांग महिलेने निवेदनाद्वारे केली आहे. गोवे गल्ली येथे जावळे, नागणे, सातपुते यांच्या घरासमोर कॉर्नर आहे. त्यामुळे टू व्हीलर वेगाने येतात. इथे गतिरोधक करावीत. या ठिकाणी लहान मुले खेळत असतात, शाळा सुटली व क्लास सुटले की रोडरोमिओ यांची टू व्हीलर स्टाईलने फास्ट असते. त्यामुळे याचा त्रास गल्लीतील लहान मुलांना होतोय. दिव्यांग महिलेने मंगळवेढा नगरपालिकडे ४ मार्च रोजी नगरपालिकेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना अर्ज देवून मागणी केली आहे.

# विविध स्पर्धांमधून महामानवाला अभिवादन

## एकता महिला मंचचा स्तुत्य उपक्रम; महिलांच्या कलागुणांना मिळाला वाव

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १४ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून एकता महिला मंच, शेळगाव (आर) यांच्या वतीने विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम ांचे जंगी आयोजन करण्यात आले होते. स्थानिक जिल्हा परिषद प्राथमि क शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यात महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांच्या म ार्गदर्शनाखाली शेळगाव (आर) मध्ये पहिल्यांदाच अशा स्वरूपाच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पंचशीला बनसोडे यांनी स्वखर्चातून सर्व महिलांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. त्यांना पूजा बादगुडे आणि दिपाली व्यवहारे यांनी मोलाचे सहकार्य केले. याप्रसंगी वैशाली नावगुडे, शाहीर सय्यद (मालबार गोल्ड), सुमित नवले, अनुराधा हडपद, पोलीस कॉन्स्टेबल किसन कोलते यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच एकता महिला मंचाच्या गीतांजली जोशी, लक्ष्मी सुतार, आशा विभुते, सविता काटे, पंचशीला बनसोडे,रत्नप्रभा गायकवाड, सारिका जाधव, रंजना गवळी, राणी गवळी, गंगा गोडगे, मनीषा गवळी, सोनाली गायकवाड, राजश्री बादगुडे, संगीता कदम, पूजा कुशवाह, सुरेखा कोळी,मंजुळा गवळी,जयश्री गवळी, वैशाली साळूंखे, लक्ष्मी मोरे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सविता काटे यांनी केले, प्रास्ताविक वैशाली नावगुडे यांनी मांडले, तर गीतांजली जोशी यांनी आभार मानले. महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी यावेळी लिंबू-चमचा, प्रश्नमंजुषा आणि लकी ड्रॉ अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

### स्पर्धेतील अंतिम विजेते (प्रथम तीन)

मालबार गोल्ड लकी ड्रॉ स्पर्धा: रंजना गवळी, अविदा गायकवाड, वैशाली शिंदे. प्रश्नमंजुषा स्पर्धा: सविता काटे, रंजना गवळी, रेश्मा वानखरे. लिंबू-चमचा स्पर्धा राजश्री बादगुडे, सोनाली गायकवाड, राणी गवळी, अश्विनी काशीद (उत्तेजनार्थ).

# जिल्हा परिषद 'स्वीकृत सदस्य' नियुक्तीला विलंब; इच्छुकांची वाढली धाकधूक

## प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी अजूनही प्रतीक्षाच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**
राज्य सरकारने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६ मंजूर करून जिल्हा परिषदांमध्ये 'स्वीकृत सदस्य' नियुक्तीचा मार्ग मोकळा केला असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी अजूनही प्रतीक्षाच करावी लागणार आहे. किमान दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने या पदासाठी इच्छुकांम ध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

१९९२ मधील ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर बंद झालेली 'स्वीकृत सदस्य' पद्धत तब्बल ३४ वर्षांनंतर पुन्हा सुरू होणार आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक मांडले होते. या निर्णयामुळे निवडणुकीत थोडक्या मतांनी पराभूत झालेले उमेदवार किंवा पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संधी मि ळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या पदांसाठी राजकीय इच्छुकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



सध्या हे विधेयक राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी प्रलंबित असून, त्यांची मंजुरी मिळाल्यानंतरच त्याचे कायद्यात रूपांतर होणार आहे. त्यानंतर प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळेल. मात्र, या प्रक्रियेसाठी लागणारा वेळ लक्षात घेता प्रत्यक्ष नियुक्त्या होण्यासाठी आणखी काही महिने जावे लागणार आहेत. कायद्यात रूपांतर झाल्यानंतर ग्रामविकास विभागाकडून सविस्तर नियमावली तयार केली जाणार आहे.

या नियमावलीसाठी किमान ३० ते कमाल ९० दिवसांचा कालावधी लागू शकतो. नियमावलीत सदस्यांची पात्रता, निवडीचे निकष आणि स्वीकृत सदस्यांची संख्या याबाबत स्पष्टता दिली जाणार आहे. ही नियमावली जाहीर झाल्यानंतरच प्रत्यक्ष नियुक्ती प्रक्रिया सुरू होईल. दरम्यान, सर्व जिल्हा परिषद निवडणुकांची वाट न पाहता ज्या १२ जिल्ह्यांमध्ये निवडणुका पूर्ण झाल्या आहेत, तेथे प्रथम या कायद्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. उर्वरित १७ जिल्ह्यांमध्ये निवडणुका पूर्ण झाल्यानंतरच तेथे स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

एकूणच, स्वीकृत सदस्य पदासाठी इच्छुकांना अजून काही काळ प्रतीक्षा करावी लागणार असून, राज्यपालांची मंजुरी आणि नियमावली जाहीर झाल्यानंतरच या प्रक्रियेला प्रत्यक्ष गती मिळणार आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात उत्सुकता आणि धाकधूक दोन्ही वाढलेली दिसत आहे.